विषय
सं. क्र.
९८

# प्राचीन मराठी कविता

## खंड २ रा

संपादक : ज. शा. देशपांडे

REFBK 0014060
REFBK-0014060
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

१९६४
1245
१९५५ ३।०२।
७५१३९
१७।३।७९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धि योजना
१९७७
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रमांक ७५१३९ वि: काव्य
स्थळांक १९५५ नोंद दि: १७।३।७९

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन

# प्राचीन मराठी कविता

ग्रंथ संग्रहालय
१४०२०

## खंड २ रा

## नामा पाठकांचे स्फुट काव्य

REFBK-0014060
REFBK-0014060

संपादक : ज. शा. देशपांडे

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रकाशक :
वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
दादर, मुंबई १४

आवृत्ति १ ली : १९६४

सर्व अधिकार संपादकाधीन

किंमत चार रुपये

मुद्रक :
वासुदेव विष्णु भट
साहित्य सहकार मुद्रणालय
१७२ नायगांव क्रॉस रोड,
दादर, मुंबई १४

# प्रास्ताविक

प्राचीन मराठी कविता खंड १ ला या ग्रंथांत नामा पाठकांची 'चन्द्रहास-कथा' समाविष्ट झाली. त्यांतील कविपरिचयांत नामा पाठकांची तेव्हां उपलब्ध होती तेवढी माहिती दिली आहे. श्रीधर व राममुतात्मज विश्वनाथ या कवीसमोर हें कथानक होतें, अश्वमेधाचें आधुनिकीकरण कसें झालें इत्यादि विवेचन त्यांत आढळेल. 'अश्वमेध' हें त्यांचें मुख्य काव्य मोठें असल्यामुळें सध्या तें हातीं घेतां येणें कठीण दिसतें. आतां त्यांची स्फुट काव्यें तेवढी या ग्रंथांत एकत्रित केली आहेत.

प्रथम खंड प्रसिद्ध झाल्यावर नामा पाठकांचे वंशज श्री. रामचन्द्र हरी राज-पाठक यांचेकडून अकस्मात् पत्र आलें. त्यांच्या माहितीनुसार नागेश शिष्य कान्हो पाठक यांचे पुत्र हरी पाठक व नातू नामा पाठक. कान्हो पाठकापासून नववे दामोदर पाठक यांना इ. स. १७६६ मध्यें देवी अहिल्याबाईनी मांजरगांवची सनद दिली. कान्हो पाठकापासून रामचन्द्र पाठक पंधरावे. दामोदर पाठकापासून नंतरच्या आतांपर्यंतच्या ६ पिढ्यांत सरासरीनें सुमारें ३२ वर्षे दर पिढीची होतात. असेंच मागें गेलें तर नामा पाठक सुमारें इ. स. १५०० च्या आसपास झाले असा तर्क करतां येईल. यामुळें कान्हो पाठक इ. स. १४५० च्या सुमारचे ठरतात. पाठक घराण्यांत पूर्वापार चालत असलेला एक अभंग खालीलप्रमाणें आहे:—

जेथें जेथें मन जाये । तेथें नागनाथ आहे ॥
म्हणवुनी पाहे । मन गुंतलें नागेशपायें ॥
सुख सोहोळा भोगीयेले । भोगभोग नागेश तेणें ॥
कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ॥

या अभंगावरून कान्हो पाठकांचे नागनाथ गुरु असावेत असें दिसतें. कै. गो. का. चांदोरकरांनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या शके १८३६ च्या इतिवृत्तांत कान्हो त्रिमलदासांचें पाताळखंड यावर लेख लिहिला. हे पाताळखंड कुठें पाहाण्यास मिळालें नाही. तथापि त्या लेखावरून पिला पाठक कान्हो पाठकांचा गुरु व वडवाळ आजागुरु असें कळतें. वडवाळ सिद्ध नागनाथ बहिरंभटाचेहि गुरु होते व त्यांचा काळ इ. स. १४०० च्या सुमाराचा मानला जातो. तेव्हां कान्हो पाठक साधारण इ. स. १४००–१४५० या दरम्यानचे

असावेत व पाताळखंडाची भाषाहि या कालांतली आहे. यास्तव नामा पाठक साधारणतः इ. स. १४५०–१५०० च्या सुमाराचे मानता येतात. वरील पिला पाठक कोण तें कळत नाहीं. रामचंद्र पाठकांच्या मतें कान्हो पाठक ज्ञानेश्वर कालीन होते, पण नागेशशिष्य कान्हो पाठक ज्ञानेश्वरकालीन असणार नाहींत, हें उघड दिसतें. एक कान्हो पाठक ज्ञानेश्वरकालीन असल्यास कान्हो पाठक दोन असावेत असें मानानें लागतें.

नामा पाठकांच्या काव्यांची हस्तलिखितें व घराण्यांतील इतर कागदपत्र सुमारें शंभर वर्षांपूर्वी पाठकांच्या वाड्याला आग लागून भस्मसात् झाले. तथापि वरील माहितीप्रमाणें नामा पाठक हे ज्ञानेश्वरोत्तर कालीन व एकनाथपूर्वकालीन कवि होऊन गेले हें निश्चित होतें. त्यांच्या अश्वमेधाची कथाकल्पतरूच्या चवदाव्या स्तबकांत सांगितलेली हकीकत भारत इतिहास संशोधकमंडळाकडील एका पोथींतहि आढळली (क्रमांक २५।२२८) या हकीकतीप्रमाणें पारमांचल देशच्या राजाकडे तेलंगी लिपीतले एक पुस्तक होतें त्यावरून नामा पाठकांनी अश्वमेध लिहिला. या पोथींत आणखी वृत्तांत आहे. त्या वृत्तांताप्रमाणें नामा पाठकांनी दक्षिणेहून थोडें साहित्य आणले व नंतर ते पश्चिमेला पांच वर्षे गेले. तेथून कांहीं साहित्य आणून त्यानी तें मराठींत उतरविलें व पूर्वार्ध आणि उत्तरार्ध एकत्र केला. मग उत्तरेला जाउन दहा वर्षें राहिले व तें साहित्य मराठींत अश्वमेधांत घातलें. नंतर पूर्वेला जाऊन तीन वर्षें राहिले व आणखी ग्रंथ वाढविला. या हकीकतीप्रमाणें अश्वमेधाच्या ४ निरनिराळ्या प्रती असणार. अश्वमेधाच्या एकमेकाशीं भिन्न असलेल्या प्रती आढळतात याचें कारण या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें असावें. मात्र ही हकीकत दुसऱ्या प्रतींत आढळली नाहीं. याची दक्षिणप्रत सर्वांत लहान आहे हेंहि विशेष होय.

आतां नामा पाठकांच्या स्फुट काव्याबद्दल थोडा विचार करूं. त्यांची स्फुट पदे फारशी नाहीत. त्यापैकीं विंचवावरचें पद वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांत 'कलमु' सारखे जुने शब्द येतात. त्याचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चार श्लोक. या श्लोकांवरून सतराव्या शतकांतील पंडितकवींच्या श्लोकरचनेचा भास होतो, पण हे श्लोक जुने असावेत. तसे असल्यास एकनाथपूर्वकालीन सुश्लोक म्हणून ते महत्त्वाचे ठरतील. वस्त्रहरणपदांची भाषा जुनी दिसते, पण या पदातील ओळी नीट लागलेल्या नाहीत असें वाटतें. एकाद्या वृत्तज्ञानें हीं पदें दुरुस्त करतां येतील की काय तें पाहावें. या वस्त्रहरणाचीच गोष्ट ओवीबद्ध प्रकरणांत आहे. त्यांतली नाना वस्त्रांची वर्णनें व ओव्यांमधले कांहीं शब्दप्रयोग पाहिल्यावर मुक्तेश्वरांच्या सभापर्वांतील पंधराव्या अध्यायाची आठवण होते व दोहोंची तुलना केली म्हणजे

नामा पाठकांची मुक्तेश्वरांच्या काव्यावर अंधुक छाया पडल्यासारखें वाटतें. कांहीं मुक्तेश्वरी ओव्या व नामा पाठकांच्या ओव्या पहा :—

| मुक्तेश्वर | नामा पाठक |
|---|---|
| निर्दय म्हणे वो वाचाळे (१५।३१) | येरु म्हणे तूं धीट वो वाजट (११७) |
| प्रळयवीज माथां पडो । | तुझीये मांडीवरी बैसो काळु । |
| दृष्टी जळोनि जिव्हा झडो ॥ (१११) | तुझे दृष्टी लागो रे इंगोळु । |
| | पडो वीजु न लगतां वेळु । |
| | डसो काळु जिव्हेसी ॥ १२७ |
| भीमकरी जे केळवली । | जे मीरवे भीमाकरी । |
| गदा नोवरी सगुणाथली ॥ (११२) | ते केळवली रे नोवरी ॥ १२८ |
| दुर्योधन चढला क्रोधा । | इतुकें ऐकोनि दुर्योधन रावो । |
| काळ खवळे ज्यापरी ॥ ११६ | कोपें करुनि खवळला ॥ (१२९) |

या प्रकरणाच्या शेवटच्या ओवीवरून तें महाभारतांतील आख्यानाचा एक भाग होता असें दिसतें.

चंद्रहासकथेचें संपूर्ण आख्यान प्रथम खंडांत छापलें होतें. आतां या खंडात घेतलेलें चंद्रहास आख्यान मूळ कथेची संक्षिप्त आवृत्ति दिसतें.

या कथेच्या दोन प्रसंगांत विष्णुदास नामा हें कविनाम असलें तरी अश्वमेध नामा पाठकांचा असल्यानें ही अश्वमेधातली कथा त्यांचीच ठरते. हनुमंत गरुडाख्यानाची अशीच तऱ्हा. धुळ्याच्या प्रतीत हेंच काव्य थोड्या फरकानें विष्णुदास नाम्याच्या नांवावर आढळतें. नामा पाठक व विष्णुदास नामा हीं नावें विशेषणार्थी होऊन एकाच व्यक्तीला लावली गेली असणें अशक्य नाहीं. या दोघांच्या नांवानें आढळणारी बहुतेक काव्यें भाषेवरून ज्ञानेश्वरोत्तरकालीन व एकनाथपूर्वकालीन वाटतात. ही सर्व काव्यें प्रकाशित झाली म्हणजे या प्रश्नाचा व नामदेवांचें काव्य कोणतें इत्यादि प्रश्नांचा उलगडा होण्यास मदत होईल. सध्यां या सर्व काव्यांचें प्रकाशन करणें ही महत्त्वाची गोष्ट आहे.

भरतभेट हे नामा पाठकांचें बरेंचसें जुन्या स्वरुपांत राहिलेलें एक काव्य होय. तंजावर M. S. १०१२ वरून हें प्रकरण युद्धकांडाचा भाग होता असें दिसतें. नाम रत्नमाला, द्रौपदीचें वीरडें, चेंडूफळी, सुदाम चरित्र ही काव्यें थोड्याफार आधुनिकीकरण झालेल्या स्वरुपांत असावीत. द्रौपदीचें वीरडें हें वस्त्रहरण।प्रमाणेंच महाभारताच्या प्रकरणापैकीं भाग आहे. 'काव्यें नामा पाठक' हें प्रकरणहि एकाद्या

आख्यानाचा भाग आहेसें वाटतें. या सर्व प्रकरणाबद्दल आणखी माहिती शेवटीं टीपांत मिळेल. "प्राचीन मराठी संतकवि" या ग्रंथांत शिबी राजाच्या कथेचा कै. आजगांवकरांनी उल्लेख केला आहे. परन्तु हें काव्य कोठें मिळू शकलें नाहीं. परिशिष्ट १ मध्यें तंजावर येथील संतमालिका दिली आहे. ती कोणाची आहे तें कळत नाहीं. तिच्यांत नामा पाठकांचा उल्लेख येतो. असाच उल्लेख एकनाथांच्या संतमालिकेंत कांहीं ठिकाणीं आढळतो. परन्तु नामा पाठकांच्या ऐवजी कान्हो पाठकांचा उल्लेख असलेली संतमालिकाहि आढळते. (नित्यपाठ भजनमाला, आजगांवकर) शिवाय या संतमालिकेचें एकंदर स्वरूप पाहतां ही एकनाथांचीच आहे कीं काय हा प्रश्नच वाटतो. नामा पाठकांच्या काव्यांच्या निरनिराळ्या प्रतीत कांहीं ठिकाणीं फार फरक आढळतो व असे कांहीं फरक टीपांत नमूद केले आहेत.

या खंडात समाविष्ट केलेल्या काव्यांच्या शैलींत फरक असल्याचें जाणवतें. कदाचित् काळाच्या ओघांत निरनिराळ्या प्रमाणांत झालेले निरनिराळ्या काव्यांचें आधुनिकीकरण हें त्याचें एक कारण असूं शकेल. तथापि एकंदरींत काव्यगुणांचा विचार केल्यास नामा पाठकांचें काव्य जरी फार उच्च दर्जाचें नसलें तरी चांगल्या-पैकीं आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. द्रौपदीचें बीरडें, सुदामचरित्र, विंचवावरचें पद हीं त्यांचीं विशेष सुरस काव्यें होत. त्यांच्या काव्यांत मधून मधून सुभाषितें येतात. द्रौपदी कृष्णाला म्हणते त्याचप्रमाणें 'तुजसारिखा बंधु असावा। जन्मोजन्मी माहेरा'॥ असेंच कुठलीहि भारतीय स्त्री पाठिराख्या भावाला म्हणेल. सुदाम-चरित्रांत दारिद्र्याचें दुःख, श्रीमंतीचें दुःख हीं दोन्हीं उत्तम रेखाटलीं आहेत. हल्लींच्या समाजांत ही श्रीमंतीचीं दुःखें कुठेंहि पाहण्यास मिळतील. वय होऊन मान डगमग हालते तरी उचापती करून मिळवलेली मालमत्ता वाढवण्यासाठीं दुसऱ्यांचें द्रव्य आपल्याकडे कसें ओढतां येईल या विवंचनेनें दुःखी असलेली मंडळी आढळली कीं 'चित्तीं नाहीं समाधान।..धनसंपन्न असोनी'॥ ही नामा पाठकांची उक्ती आठवते.

'नवें नवनीत' व 'प्राचीन मराठी कविता' खंड १ ला यांत वेळोवेळीं दिसून आलेल्या कांहीं गोष्टी नमूद केल्या होत्या. त्यावरून असे ग्रंथ छापणें सोपें नाहीं हें दिसून येईल.

केवळ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामुळेंच हा दुसरा खंड बाहेर पडणें शक्य झालें. त्याबद्दल ही संस्था, तिचे कर्मचारी व विशेषतः तिचे प्रमुख कार्यवाह श्री. वा. वि. भट यांचे कितीही आभार मानले तरी ते अपुरेच होतील. धुळयाच्या

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराचे कार्यवाह श्री. न. वा. शिदोरे, तेथील राजवाडे संशोधन मंदिराचें श्री. द. रा. भट, तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयाचे संचालक, महाराष्ट्र सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्याचें प्रमुख डॉ. पु. म. जोशी व तेथील एक अधिकारी श्री. वि. स. कामत व इतर कर्मचारी यांनीं हस्तलिखितें व त्यांच्या नकला मिळवून देण्यास सर्वतोपरी मदत केली. प्राचीन वाङ्मयाचे एक अभ्यासक डॉ. वसन्तराव पारखे यांचीहि नेहमी मदत होते. त्याबद्दल या सर्वांचा मी फार आभारी आहे. या ग्रंथांत उणीवा राहिल्या असणारच; वाचकांनीं त्या दृष्टोत्पत्तीस आणाव्यात अशी विनन्ती आहे.

— ज. शा. देशपांडे

रुक्मिणी निवास,
पहिली गल्ली, हिंदु कॉलनी,
दादर, मुंबई–१४
८–१०–१९६४

---

दुरुस्ती :

१–पृष्ठ ७१, ओवी ४०–प्रथमचरणावरील आकडा १३ ऐवजी १६ पाहिजे व खालील टीप '१६–झाली–गाठ' अशी वाचावी.

२–कांहीं ठिकाणी मात्रा व 'र' हे अक्षर अस्पष्ट उठली आहेत, तथापि ते शब्द संदर्भावरून सहज समजतील.

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | स्फुट पदें | १ |
| २ | वस्त्रहरण पदें | ३ |
| ३ | सुदामचरित्र | ७ |
| ४ | चंद्रहास्याख्यान | १२ |
| ५ | वस्त्रहरण | २२ |
| ६ | नामरत्नमाला | ३७ |
| ७ | हनुमंत गरुड आख्यान | ४३ |
| ८ | द्रौपदीचें बीरडें | ६० |
| ९ | चेंडूफळी | ६२ |
| १० | भरतभेट | ६३ |
| ११ | काव्ये-नामा पाठक | ८१ |
| १२ | परिशिष्ट १ : एक संतमालिका | ८४ |
| | २ : टीपा | ८५ |
| | ३ : शब्दकोश | ९१ |

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १४५०

# स्फुट पदें

॥ श्री ॥

## ॥ विंचवावर पद ॥

॥ जात होते माधवे पाचारीले वो ॥ पाचारीतां मी थोर गवें गेले वो ॥ चीत्रसाळेच्या खांबेंसी टेंकलें वो ॥ तेथे आवचीतें त्या वींचुवे खादले वो ॥ १ ॥ धृ ॥ वींचु उतरा करीतो पीडा फार वो ॥ मणगट धरुनी बैसला रुदना करू वो ॥ आतीपाडें जीव जालासे वीखारू वो ॥ वैद्य बोलावा बोलावा सारंगधरू वो ॥ छ ॥

॥ श्लोक ॥

तळमळ करीतें मी नीर्जळी मीन जैसी ॥ नीसीसमइ चकोरे तेवी जालें मनासी ॥ आझणु परी न येसी कां मला दुःख देसी ॥ शरीरदहन जाल्या येउनी काय घेसी ॥ १ ॥ हरी हरी करीता वो लोटली मध्यरात्री ॥ नयनि सलीलधारा लागला अझी गात्रीं ॥ बरळ बरळ बोले नायके कर्ण-पात्रीं ॥ मधुकर मन माझें लुब्ध राजीवनेत्री ॥ २ ॥ बहुत मदन बाणी गांजीलें वींचुवानें ॥ नीसीसमई सखीये आझी देहासी जाणे ॥ मजवरी रुसला कां देवकीनंदनु हा ॥ उठ झडकरी सखीये आणी तुं कृष्णजी हा ॥ ३ ॥ पद्माक्षी आबळा मनोहर गळा बोले जसी कोकीळा ॥ राधा हे आबला तुला घननीळा म्या आणीली गोकुळा ॥ जाणे हे सकळा बहुत्तम कळा डांभा इचा आगळा ॥ पाहे कामकळा शशांक सकळा असी मुखाची कळा ॥ ४ ॥

पद

आवो अंग टाकीलें ॥ हे धरणीवरी लोळे वो ॥ सुटली वीरगुंठी तीचे केश मोकळे वो ॥ चढतां प्रहरीं खादलें राजबाळे वो ॥ आला कलमु तीचे उदकें सिंपा डोळे वो ॥ २ ॥ आवो वींदान केलें यादवें धरीला कोप वो ॥ याचे वारीचा चढतो काळा सर्प वो ॥ नाम नीर्गुण थरारुनी सुटला कांप वो ॥ आणा चंदन तुम्ही द्या कांद्याचा लेप वो ॥ ३ ॥

धावा धावा मजवरी नीर्वाण वो ।। मायाबहीणी तुम्ही सकळै अंतःकर्णी वो ।। जा बुझा (जा) बुझा यादवराणा वो ।। जे मागेल तें देइन मी (दे) वाची आण वो ।। ४ ।। वींचु उरतील कवणे यशवंते वो ।। देवकीच्या बाळकें कृष्णनाथें वो ।। माव करुनी ते भोगीली आनंते वो ।। पाठक नामा शरण जातसे उल्हासें वो ।। वीं (चु) ।। ५ ।।

( २ )

सखी मी तु दोघी जणी । चला जाउया ते चोरुनी ।
परी योगी नीरंजनी । काय करिताती बैसोनी ।। १ ।। धृ ।।
छंदु लागला सीवाचा । हा जीव दैवाचा ।
संत बैसोनि करिती आत्मचर्चा । बोल बोलति उपदेशाचा ।। २ ।।
द्वैत अद्वैत बिंबले । चित्त चैतन्ये मिळाले ।
नामा पाठका यैसे जाले । मिळो गेले नागेसि ।। ३ ।।

( ३ )

निज मंदिरी मन माझे बैसले आनंदकंदा ।।
धरुनिया संतसंग । पाविजैल तो आनंदकंद ।।
(मामा मारु) गेलासी । उपडिले गजासी । मलियौद खेळलासी ।
सु तु तु तु तु तु ।।
यैसे तुझे पोवाडे । मणा बोलो नीवाडे ।
पाठक नामा ह्मण वेडे । अ यो यो यो यो ।।

( ४ )

## श्रीराम ।। पद

कान्होबाचे संगती । मुल बाळ मीळती । दुध सोजीस रडती । कु लु लु लु लु ।। कान्होबाचे संगती । ब्रह्मादिक ईक्षीती ।। धन्य आमा म्हणती । आ म म म मा ।। १ ।। मामा मारु गेलासी । उपटीलें गजासी । मल्लयुद्धी खेळसी । हु तु तु तु तु ।। कागासुर मारीला ।। बागासुर चीरीला । दोन्ही वृक्ष उन्मळीले । आ त त त त ।। २ ।। अजगर मारीला । वोनवा गिळीला । गोवर्धन उचलीला । आ ब ब ब ब ।। ऐसे तुझे पोवाडे । कोन्हा फुड नीवाडे । पाठक नामा झाले वेडे । आ ल ल ल ल ।। ३ ।।

( ५ )

॥ श्री ॥

कान्होबाचे संगती ॥ ब्रह्मादीक वंदीती ॥ धने आम्हा म्हनवीती : आत्मा ( आ ) त्मा रे ॥ १ ॥ श्रीपती गोव ( ळ ) या : बोलती सक(ळ)या : नयो नयो अक(ळ)या ॥ अयो अयोरें ॥ २ ॥ अजगरा मारीले ॥ संत्कासुर भंगीले ॥ दोन्ही वृक्षे उमळीले ॥ अटा टाटारे ॥ ३ ॥ केसेकु मारला ॥ वनवा गीळीला ॥ गीरी कडे उचलीला ॥ आ बा बा बा सें ॥ ४ ॥ गौळ्या घरी राहेसी ॥ दही दुद भक्षीसी ॥ गोपीकासी चाळावीसी । ची ची ची ची रें ॥ ५ ॥ मामा मारू गेलासी ॥ उपटीले गजासी ॥ मलयुद्ध खेळसी ॥ हु तु तु तु रे ॥ ६ ॥ कौंसासुर मरदीले ॥ पुतनेसी सोकीले ॥ मामळ भटा पीढे दान कु लु लु लु रे ॥ ७ ॥ असे तुझे पोवाडे ॥ ब्रह्मादीकाना ना कळे ॥ पाठक नामा वीनवीतो ॥ हा हा हा रे ॥ ८ ॥ ॥ छ ॥

## वस्त्रहरण पदें

श्रीगणेशाये नमः ॥ श्रीसरस्वति नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्री गोविंदा माधवा चक्रपाणि: भक्तां जननी : म्हणे द्रुपदनंदनी : ग्लांदि करुणा भाषुनि : लागे चरणि वेगिं पावें ततक्षणि : ॥ धृपद ॥ गोविंदा ॥ वो नमो देवा स्वांमि गणपति : स्तुती स्तवीती सीधीबुधी-आदिशक्ति : निरालंबस्वरूप आदि स्तवीति : दयावीप्रतिपदिं होवावि वाचाशक्ति ॥ १ ॥ चक्रपाणि धर्मु राजा : जुत खेळला : डाव हारला : राज्य हारली संपति : पांचहिसहित बंधु द्रुपदि : तेहिं हारिलि हारुन जावें वनाप्रति : ॥ २ ॥ सभेहुनि धर्मराजा उठविला : नेउनि बैसविला : अवघियांचे सेवटि : ते समईं लज्या थोर वाटे पोटि : ॥ ३ ॥ ते समईं भिमासि न साहे : परि करिल काये : सत्व टळेल धर्मासि : बोल लागेल जन्मासि : ॥ ४ ॥ तये वेळे शकुनि बोलिला : मंत्रु सांगीतला : केल्या द्रुपदिचा गोस्टी : ते वेळिं उस्छावो न माय त्याचा पोटिं ॥ ५ ॥ द्रुपदि पैं दुरवासनु वेगें गेला : तीसीं बोलुं लागला : पाचारितो दुर्योधनु : अवघा वृत्तांत सांगीतिला ॥ ६ ॥ बोलु आईकिला कानिं : कांटाळीलें तीचें मनः थरथरां बाळा कांपति : पाहे हडति ॥ ७ ॥ दुरवासनें वेगें उठवीलि : वेणि धरुनि आणियेलि : सभेमाजी नेलि : ते वेळे ते बाळा भयाभित जालि : ॥ ८ ॥ वनामाजि पारध्यानें कुरंगिणि : फासां पाडुनि : उभे आहाति सकळी : तेवि ते द्रुपदि पीडियेलि : बाळा आकांतलि : नाहिं

कोणाचा आधारु : ॥ ९ ॥ दुर्योधन म्हणें दृप(द)नंदनि : सांडिं पांडवांची आस आसुनि : वचन मानि होसि मुख्य राणि : थोर सन्मानि : नाहि तरि करिन मि तुज दासि ॥ १० ॥ द्रुपदीनें धर्माकडे पाहियेलें : पांचहि देखिले : जैसे चीत्रीचें बाहुले : ते वेळी थोर चींता जालि : ॥ ११ ॥ दृपदि म्हणे कर्णा : दुरवासना रायां दुर्योधना : दुर्वेरि करा विचारणा : नाहितरि होईल प्राश्चीती ॥ १२ ॥ वडिलबंधु पितासामान्य : पाहे विचारून : नितिमार्गु वसें मानसिं : मग तियेसि मांडिला बलकारू : ॥ १३ ॥ ते वेळि बाळा आकांतलि : क्रोधें खवळलि : तेणें पिटियेला हातु : भीमाचि गदा तुज ताडिल निर्कि : तिसि घडेल संयोगु[१] : ॥ १४ ॥ ते गदा अशुधें तुज न्हाणिल : हा सत्य मानि माझा बोल : येथें आन नाहि मातु : गर्वें मदें कां भुललासी रे ॥ १५ ॥ तयेवेळि भीस्म वीदुरासि म्हणे : कहिं अनृत्य न वचे ईचें बोलणें : राजयासि जालें पतन सत्यवचनें : येथें आन नाहि मातु ॥ १६ ॥ तयेवेळिं दुर्योधनु बोलिला : क्रोधें खवळला : ईसि करावें जी नग्न : काईसा आतां ईचा बडिवारू : आणि कोण भारू : ईस करावे जी नग्न : ॥ १७ ॥ तये वेळि दुरवासनु उठीयेला : ग्लांदे सुंदरा तवं वेगीं उभा ठाला : (ईस) नाहि कोन्हाचा आधारु : पिता तरि आहे दुरदेसि : पावैं रुसीकेशि : तुं तव प्राणदातारू ॥ १८ ॥ भक्तासि आहे तुझा आधारु : सत्य बडिवारू : हरिभक्तां कामधेनु : आणिखा संकस्टी पावलासि : आपुलिया भक्तांसि : मीहि असें सेवटिल रंक ॥ १९ ॥ हिरण्यकस्यपें पुत्र गांजीयेला : मोट बांधोन डोहिं घातियेला : ताळिं सुद्रसेन तुवां प्रवेसिले : भगवंता तुंवा [२]तारिलें : मज कां गेले विसरुनी : ॥ २० ॥ लाखाग्रुहि घातले पांडवांसि : दुर्योधने त्यासि : तैं तुवा कौसाल केलें : पाताळिं एक विवर सुदलें : यैसे समई मज कां न पावसि : अति दुरंधर तेथें तुवां रक्षीले : ॥ २१ ॥ उपमन्य खीर मागे पित्यापासि : तो तव रंक तापसी : स्वप्नि नेणे कामधेनु : क्षीरसागरू हेळा दिधला : सुखिया केला : मज कां गेला विसरोनि ॥ २२ ॥ अनाथ जाणौनि कृपा कीजे : मज सोडविणे : आम्हा जाले प्राणांतिक : पावैं कृपानिधि त्वरीत : ॥ २३ ॥ तै होते देव क्षीरसागरी : पहुडले चक्रपाणी सुमनअरुवारी : चरणसेवा कमळा करि : तवं घननिळा धावा आईकिला कानि : ॥ २४ ॥

---

१ वस्त्रहरण १२८ ओवी पहा.

२ राखिले–पाठ.

वछालागी धेनु जेवि वोरसे : अति प्रेमरसें : तेवि उठीले मुरारि : [3] गरुडावरि स्वार वेगी जाले : क्षणामाजि आले : जेथें होति द्रुपद सुंदरी : तेथें सत्वर पावले : ॥ २४ ॥ अभ्राआड उभे असेति मुरारि : द्रुपदि पाहे चौफेरि : पांचहि देखिले दैन्यवदन : पुष्पवनि लागला (अग्नि) दहन ॥ २६ ॥ दुरवासनु म्हणे राया दुर्योधना : दयावी जी अनुज्ञा : येरू म्हणे वेगु करा : थरथरां बाळा कांपति : पाहे हडति : ॥ २७ ॥ तवं दुरवासनें वेणि धरियेलि : वरति जवं दृस्टी करुनि पाहियेलि : तव देखिले सखा वंधु नारायणु : मग मना जाला संतोश[४] ॥ २८ ॥ सींतरुनि जंव बाळा जावो पाहे : परि करिल काये : धरिलि आहे दुरवासनें : तेथें न चले कांहि : [४] ॥२८॥ तवं हरिनें नाभीकारिं बोलियेले : अवो सुंदरि तुं सावध होई वहिले : तुझा [५] धावा श्रवणि पडोनि : आलो सत्वर धावोनि : ॥ २९ ॥ दुरवासनु अंचळु वोढियेळा ग्लांदे सुंदरा : नीरीमागें नीरी सुटे खरखरां : ते वेळि द्रुपदिनें केला हाकारा : सकळ सभा जाली तटस्त[६] : ॥ ३० ॥ याणे गांजिली हो द्रुपदु सुंदरा : तवं वस्त्र दुरवासनें हरियेले : मग अंतरगत चीर आनु देखियलें : वस्त्र देखोनि सकळ सभा मानवलि : ॥ ३१ ॥ तिस अंतर्यामि मानुन स्तुति करिति : थोर सज्ञान ईची मति : ईस श्रीकृष्ण (सारंगधर) रक्षीती : तेथें कवणा (चें काये) भय ॥ ३२ ॥ तवं साभिमानें दुर्योधनु बोलीला : नेत्रे दुरवासनु खुणविला : हाही काढावा जी चीरू : ते वस्त्र वोढियेले : तवं देखिले अंतरगत आन वस्त्र : ॥ ३३ ॥ द्रुपदीनें जाणितलें मानसिं : शुध ज्ञानेसि : हरिभक्तां कामधेनु होसि : स्वामि रुशिकेशि : ॥ ३४ ॥ वस्त्रें अतिरंगें रंगलि : नानापरिची रंगा आली : हे करणि केलि वनमाळी : रनशोंड द्वारकेरायानें : ॥ ३५ ॥ शुभ्रवर्ण सेला दिधला : तेणें अरुण आल्हादला : यैसि दीव्य वस्त्रें परिमळें पटुकुळे : पुरवीलि नारायेणें : ॥ ३६ ॥ गरुडभिमुशीत पटकावळी : धारि मनोजी लतावळी वीस्तारीलि : वस्त्रांचा कैसा तेथें दीगु जाला : सींधु अमर्याद वोतला : ॥ ३७ ॥ (वस्त्रें वोढीता हात बहु श्रमले : कांहीं प्रेत्न तेथें न चले : मग जाला बहु हिंपुटि :

---

३ गरुडावरी वेगी बैसोनि क्षणामाजी आले.–पाठ

४ टीपा पहा.

५ तुझा भाव जाणोन : आलो तुझ्या साह्यासि – पाठ.

६ सकळ सभा गजबजुनि कांटाळलि – पाठ.

विस्मित होउनि मानसि : ॥ ) दुरवासनु म्हणे राया दुर्योधना : कर माझे स्रमले वस्त्रें काढवेना : आज्ञा करावि आणिखां सेवकां : ते कार्य सिधी करतील : ॥ ३८ ॥ तवं राजा आज्ञा आणिखां सेवकां करी : वस्त्रामागें वस्त्र काढा झडकरि : रत्नखचितें दामोदरीं मनोहरिं : मुक्ताफळांच्या बोवणि (नानापरि) : ॥ ३९ ॥ अनेके (परीची) रंगे रंगार्ळी–रंगीलि[७] : नाना-देशिचि[८] चौकडिया भरिलि : श्रीहरिनें माव केली : तेथें वस्त्रां नहि पारू : ॥ ४० ॥ भिस्म म्हणे राया दुर्योधना : वायां कां भुललासि मनां : वस्त्रें अमर्यादा सींधु जाला : पैल पाहे प्रत्यक्ष नारायण : ॥ ४१ ॥ (यैसी प्रसन्नता होणें काय कारण : यैकें चीत्तवृत्ती येक करून : धर्मोउदेशें जे देति अंत:कर्णे : त्यांचें पावति सदा मनोधर्म : ॥ ) अतिता स्वधर्म करितां : गेले कोपिन वाताहता : बहुत जाला उद्विझता : मग काय (तेथें) वर्तलें ॥ ४२ ॥ द्रुपदिनें जाणितलें मानसि : शुध ज्ञानेंसि : रुशि जाणोनिया नझ : द्रुपदीनें (आपला) अचळ चीरियेला : ॥ ४३ ॥ अतितालागीं समर्पिला : तें पावले सर्वेस्वरा : भावें समर्पित दोरा : तेणें अनंत संतुस्ट : ॥ ४४ ॥ अल्प वस्त्रें घाले श्रीहरि : तेणें काम-धेनु जाला घरिं : देवें जाणितिलें मनिं : द्रुपदीचे[९] सुकृत थोर : ॥ ४५ ॥ नवसें नव्यान उसंत पदरि : जाणोनियां हृदयस्त मुरारि : नागरेणे पुरविलि चिरिं : सद्भाव[१०] जाणोनिया ॥ : ॥ ४६ ॥ अंतरगति हरि प्रेरियेला[११] : बोलु मंजुळु बोलियेला : द्रुपदीस पुर्ण भरवसा जाला : मग काय करिति जालि : ॥ ४७ ॥ द्रुपदि म्हणे दुर्योधना : आणिक कर्णा दुस्वासना : जै तुम्ही जुत खेळलें राया धर्मा : तै मिं आंगना भीमापासि ॥ ४८ ॥ तै माझें ठाई नाहिं अधिकारि : होतें भिमाचें मंदिरि : पाहे आपले ठाई विचारु करि : मज जींकाल कोणे[१२] परि : ॥ ४९ ॥ आतां राया मजसि खेळिजे : पनु निकटाचा बोलिजे : जरि[१३] मि अस्तेन महासति

---

७ दीधली – पाठ.

८ परीची – पाठ.

९ थोर सुकृत आहे दृपदिसी—पाठ

१० तिचा सद्भाव हृदयी जाणोनि—पाठ

११ पेलियेला—पाठ

१२ कैसेनि—पाठ

१३ टीप पहा.

शुधमति : तरि मजये सभे होईल जींति ॥ ५० ॥ हेच [१४] वचन समस्ता मानले : मग सत्वर फासे आणविले : द्रुपदि दुर्योधन खेळति : पांडुपत्नी आहे महासति ॥ ५१ ॥ द्रुपदि म्हणे जी कृष्णा हृसिकेशि : सर्वा अंतर्यामीं तुं नांदसि : मिं असेन निर्मळ मानसिं : तरि मज ये समई जय देणें : ॥ ५२ ॥ यैसे म्हणोन द्रुपदिनें फासे घेतले : हृदयीं भगवंताचे स्मरण केले : सखा बंधु म्हणविसि नारायेणु : तरि ये समई मासि लज्जा राखणें : ॥ ५३ ॥ मग डाव आरंभिला [१५] : दुर्योधन हारि पाडिला : आपणा ( आधि ) सोडविलें : दुसरे डावी पांचहि पांडव ...... ॥ ५५ ॥ हे देखोन सकळ सभा आनंदलि : थोर उछावो जाला ते काली : दुर्योधने खालति मान घातलि : तें [१६] समई बहुत तया लज्जा जालि : ॥ ५६ ॥ द्रुपदि सकळ सभेमध्ये आलें जैत्य : सकळ कौरव जाले विस्मित : पुण्यश्लोक जाले हरशयुक्त : दुर्योधन माहालज्जीत खाले पाहे ॥ ५७ ॥ सकुनि म्हणे राया दुर्योधना : वाया कां भुललासि होई शाहाणा : लाक्षागृहि जेणें रक्षीयेलें : तो (ईपासि) साक्षात गोविंदु : ॥ ५८ ॥ मागुति न खेळे राया दुर्येधनु : आणि कांहीं न बोले पनु : ( मग ) खेळा केले विसर्जनु : सकळा जालें समाधान ॥ ५९ ॥ भारति कथा जे करिति स्रवण : त्यास होय महामहिमान : स्वर्गिहुन ये त्यांस विमान : आणि देव किन्नर करिति पुष्पवृष्टी ॥ ६० ॥ ब्रम्हहत्यादीकें पापें नाशति : भागिरथि मंदाकिनि भोगावति : स्नानें होय फळसृति : तैसीच आहे ख्याति : ॥ ६१ ॥ ते हे कथा भारथि पुन्यरासि : पाठकनामा विनवी स्रोतयासि : अमृतकथा रसाळ परियेसि : येथुनि पांडव जाति वनासि ॥ ६२ ॥

इतिश्री वस्त्राहरणकथा समाप्तिमस्तु ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु.

## सुदामचरित्र

श्रीगणेशाय नमः । सुदामदेव भगवद्भक्तु । हरिस्मरणी निश्चीतु । नित्ये उपवासी परंतु । हरीभजन न सोडी ॥ १ ॥ सकळ दारीद्रें पीडलीं । सुदामयाच्या घरा आलीं । तेथें विश्रांती पावली । म्हणउनी राहिली तेथेंची ॥ २ ॥ दरिद्रें नसे संपती । तया माजी संतती । बहु असता निश्चिती ।

---

१४ टीप पाहा

१५ वोडवीला—पाठ.

१६ आपुला प्रेत्न निष्फळ गेला—पाठ

सुदामा चिंती सांडीना ॥ ३ ॥ बाळकासी न मिळे अन्न । मा कैंचे तेथ नाहाण । काष्ट खंडाचे अंथरण । वरी परीधान आकाशें ॥ ४ ॥ चोलखंड खइनी ॥ परीधान करि तया नीग्रहणीं । अंजुळीनें पीतसे पाणी । अपदती सुदामा ॥ ५ ॥ सुदामदेवाचे घर । तयास नसे आवार । उडाला वरील सेकार । मुक्तद्वार सुदामयाचें ॥ ६ ॥ क्षुधेनें न लागे डोला । म्हणौनी स्मरे वेळोवेळां । कृष्णाहरी दयाळा । मज गोपाळा उपेक्षीले ॥ ७ ॥ अखंड तया हरीजागरण । सदा वाचेसी कीर्तन । कृष्ण गोविंदा नारायेण । हेची स्मरण वाचेसीं ॥ ८ ॥ इंद्र वरुषें सीलाधारी । सूर्य अखंड धरुनिया सिरीं । तीन्ही काळ यैसे परी । हरीस्मरणी क्रमीतसे ॥ ९ ॥ भीतभीत पुसें कांता । आपण अखंड कोणासी स्मरता । कांहीं कुटुंबाची चिंता । तुमच्या चित्ता असेना ॥ १० ॥ येरु म्हणे जगदीश्वरु । भक्तवछल करुणाकरु । मज किंकराचा वाहे भारु । सदा योग आमचा ॥ ११ ॥ तयासी होतां शरणागत । पुरवील भक्ताचे इच्छित । बीभीशण जयाचा शरणागत । लंकाराज्य पावला ॥ १२ ॥ आपुला निज दास बली । स्थिर राखिला पाताळीं । आपण तयाचे द्वार पाळी । सदा वनमाळी तिष्टतु ॥ १३ ॥ मीं स्मरतो द्वारकेचीया राया । जयासी सोळा सहस्र स्त्रिया । येक शते साटीसहस्र तनया । प्रसवलीया पाळीतसे ॥ १४ ॥ छेपन्न कोटी यादव वीर । त्याचे पंक्तींचें जेवणार । त्यासी दासी दास अपार । त्याची संख्या कोण जाणे ॥ १५ ॥ मग भीउनी वदे नारीं । द्वारका नाही बहुत दूरी । जरी जाल तेथवरी । तरी कांहीं अन्न देईल ॥ १६ ॥ कृष्णालागुनी मागणें । हे तो अत्यंत लाजीरवाणें । परी तो अंतरात्मा सुजाणे । हृदयेस्त माझे जाणेल ॥ १७ ॥ कृष्ण गंभीर सद्गुरु । कृष्ण धैर्य जेंवि मेरु । कृष्ण अत्यंत उदारु । जेवी मेघ ग्रीस्मांतीचा ॥ १८ ॥ जयाची वानु पवित्रता । तयांगुस्टी जन्मली सुरसरीता । जे रुद्रे धरिली माथा । म्हणउनी सिव तो जाहाला ॥ १९ ॥ ऐसीयाचे घ्यावे दरुशण । तरि कांहीं न्यावे उपायेन । मीं तव दीन हीन । काये नेउनी भेटऊ ॥ २० ॥ तव ते ब्राम्हणी । दोनी च्यारी घरे फीरोनी । प्रक्षक तेइळ मिळवोनी । पतीचे करी देती जाली ॥ २१ ॥ (ब) रें बांधोनी वस्त्रांती । गांठोडी घेउनी हातीं । भगवंता स्मरोनि चित्तीं । द्वारकेप्रती निघता जाला ॥ २२ ॥ नीघता बाहेरी घरातुनी । दोघी भेटल्या सुवासीणी । येरु आनंदला निजमनी । चक्रपाणी भेटेल ॥ २३ ॥ तेथुनी नीघतां बाहेरी । तो भरल्या दोनी घागरी । त्या पुढें दोघी कुमारी । प्रसन्नवदन भेटल्या ॥ २४ ॥ कागु गेला उजवा । मयोर त्यास गेला डावा । मग भरवसा वाटला जीवा । गोपीकांतभेटीचा ॥ २५ ॥

मग मनोरथाची भरोवरी । सुदामा करी निज निर्धारी । आजी मज श्रीहरी । करुणाकर भेटेल ॥ २६ ॥ आजी मी आपुल्या डोळां । देखेन घननील सावळा । कंठी वैजयंतीमाळा । कासें पीवळा पीतांबरू ॥ २७ ॥ मग अंतरीं विचारी । मीं तव अत्येंत भीकारी । तो लक्ष्मीकांत मुरारी । मज कैमेनी भेटेल ॥ २८ ॥ देखोनि मळिन कुश्चळ । मजलागुनी गोपाळ । भेटी नेंदितां सकळ । श्रम हे वृथा माझे ॥ २९ ॥ पाठीसी लागलेसे पोट । पाई न चालवे वाट । परम पावतसे कष्ट । कृष्णस्मरणें चालतसे ॥ ३० ॥ येसा कर्मोनीया मार्ग । द्वारकेची सीमाभाग । पावतांची सर्वांग । आनंदें करुनि नीवाला ॥ ३१ ॥ द्वारकेचीया पूर्वद्वारी । रत्नकळसाचीया हारी । हिरे बैसविलें घरोघरीं । मधें सुवर्ण बैसविलें ॥ ३२ ॥ अत्यंत निवाला पोटीं । मग बैसोनियां गोमतितटीं । येसी द्वारका देखोनि द्रीष्टी । स्नान संध्या सारिलीं ॥ ३३ ॥ मग चळचळां कांपत । पोटामधें भीतभीत । जया तया आसीर्वाद करित । द्वारकेआंत प्रवेशला ॥ ३४ ॥ जें जें गृह पाहत । तें तें इंद्रभुवना सारिखें दीसत । विस्मयो पोटीं नसे मात । द्वारकारचना देखोनी ॥ ३५ ॥ येसा फिरत फिरत । मधें विश्रांती घेत घेत । पावला श्रीकृष्णगृहप्रांत । जाला विस्मित निजमनि ॥ ३६ ॥ छेपन्न कोटी यादवांतरी । बैसला असे रत्नसिंह्यासनावरी । सुदामीयासी माहाद्वारी । गोपिकांते देखिलें ॥ ३७ ॥ सिंहासनाखाले घालोनि उडी । कृष्ण धांविनला तांतडी । शेषाची जालि मानमोडी । पाठी तडतडी कूर्माची ॥ ३८ ॥ यादव राहिले चकीत । कोठें धांविनला भगवंत । कोणाचे पुरवावया आर्त । त्वरेनें जात गोविंद ॥ ३९ ॥ मग ब्राम्हणाचिये चरणी । मस्तक ठेवि चक्रपाणी । चहुंभुजीं करुनि । हृदई ब्राम्हण आलिंगिला ॥ ४० ॥ सकळहीं सुरगण । जयाचे वंदिती चरणरेण । तो ब्राम्हणाकारणें । लोटांगण घालीतसे ॥ ४१ ॥ कृष्णचरणी गंगा जन्मली । म्हणउनी जगद्वंद्ये जाली । कृष्ण ब्राम्हणाची चरणधुली । निज भाळी लावीतसे ॥ ४२ ॥ सुदामा धरुनि निज करीं ॥ बैसउनि रत्नसिंह्यासनावरी । आपुले हाती मुरारी । क्षाळन करी चरणाचें ॥ ४३ ॥ ज्याचीया चरणोदका । सीवे वोढविले मस्तका । अनंत अत्यंत सुखा । द्विजचरणोदका पीतसे ॥ ४४ ॥ शोडषोपचारें करुनि पुजा । मग म्हणें येदुराजा । बहुतां दिवसां सांभाळ माझा । केलाजि स्वामिया ॥ ४५ ॥ कृष्ण म्हणें सुदामयासी । काय घेऊनि आलासी । तें सीघ्र द्यावें अम्हासी । उपायेन आपुले ॥ ४६ ॥ भक्तीं अर्पिलीया फळमूळ । कींवा वाळले तुळशीदळ । मीं स्वीकारिता तात्काळ ।

भक्त प्रीती म्हणउनि ॥ ४७ ॥ कृष्ण उपायन मागतां । सुदामा न पाहे वरूता । चीर खंडे धुंडाळीतां । पोहे हाता लागली ॥ ४८ ॥ मुखीं घाली मुष्टी भरी । दुसरा जवं स्वीकारीं । तव रुक्मीणीनें धरिला करीं । काये खाळ म्हणउनि ॥ ४९ ॥ वेगी करावें स्नान । पडदणीलागीं वसन । देउनि कृष्ण ब्राह्मण । आपुले करीं न्हाणीला ॥ ५० ॥ कृष्ण देतां पडदणी । येरू निज वस्त्र टाकी फेडुनि । जेवि कळयुगीं सांडीजे ब्राह्मणी । सदाचार परता ॥ ५१ ॥ रत्नखचित मांडिला पाट । त्या पुढें सुवर्णाचे ताट । श्रीकृष्णें आपण नीकट । सुदामदेव बैसविला ॥ ५२ ॥ प्रथमा वाढील्या लवण शाखा । तयाचा न कळेची लेंखा । सुदामा मनि करितसे शेंका । हे काय आहे म्हणउनि ॥ ५३ ॥ मग वाढीलिया क्षिरी । घृत शेर्करा तयावरी । सुदामा विस्मयो करी । कोण भाग्ये अमुचें ॥ ५४ ॥ वडे पापड सांड्या । मांडे लाडु फेणीया । वाट्या दह्या दुधाचिया । परिपूर्ण घृत वाढीलें ॥ ५५ ॥ जेविता नये सुदामियासी । गोपीका सीकविती तयासी । कढी जेविजे भातासी । क्षीरीसी घृत शेर्करा ॥ ५६ ॥ तोंडीं लाउनिया शाखा । भोजन करावें निःशेंका । वडाभात करुनि येका । रूचीनें तुम्हीं जेवावें ॥ ५७ ॥ लाडु खात सगळा । अडकेल माझीये गळा । म्हणउनी ठेवि निराळा । गोपीका सकळा हांसती ॥ ५८ ॥ फोडुनि भक्षावा लाडु । येरू म्हणे आणा दगडु । कैसा भक्षावा पापडु । म्हणउनि पात्रीं पाहतुसे ॥ ५९ ॥ यापरि करूनियां भोजने । सभेसी बैसविले यदुनंदनें । म्हणे घाला अस्तुरणे । अम्हापासी द्विजाचे ॥ ६० ॥ ब्राम्हण आणी मुरारी । दोघे बैसले मंचकावरी । सुदाम्यासी पुसे तुमचे घरीं । कांहीं अन्न असेल ॥ ६१ ॥ येरू म्हणे जी येदुवीरा । येक आमुचे समाचारा । अम्हावरी करूणा करा । सर्वभावें प्रसन ॥ ६२ ॥ चंद्रमौळी अमुचें घर । ज्यांत नाहीं अंधकार । अन्नविणे उंदिरा थार । न धरीती तिळभरी ॥ ६३ ॥ सदाकाळी येकादशी । पत्नी अमुची सामोपवासी । गणना नाहीं चांद्रायणासी । अहींर्निसीं करुं कीर्तन ॥ ६४ ॥ पुढे सांगेल वृत्तांतु । म्हणउनिया गोपीकांतु । यैके द्विजातें म्हणतु । राहे स्थीर क्षणभरी ॥ ६५ ॥ जीतुकी देखसी संपती । हे तो अवघी विपत्ती । माझीया चित्ता विश्रांती । क्षण अेकही असेना ॥ ६६ ॥ पुढे देखसी रुक्मिणी । हे मीं बहुतांसि भांडोनि । जरासंद शुशुपाळा भंगोनी । द्वारकेसी आणीली ॥ ६७ ॥ ईस प्रद्युम्न तनयो जाला । तो विश्वंभरें चोरुनि नेला । येरु तो विश्वंभरु वधीयेला । तेथुनी जाला पुनरपी ॥ ६८ ॥ तैं

म्या प्रणीलें सत्येभामेसी । हे तो गर्वाची अत्येंत रासी । ईसी विनावितां आहीर्णीसीं । समाधान चितीं असेना ॥ ६९ ॥ मजवरी चोरीचा आळ आला । बलराम मजसी रुसला । तै जांबुवंतासी झगडा केला । जांबु-वंती यैसी प्रणीली ॥ ७० ॥ सात वरूषें वृ(षभ) दमुनी। अनेक राजे जिंकोनी । अत्येंत कष्टी होउनी । नग्नजयंती आणीली ॥ ७१ ॥ मित्रवृंदा वृशशा । तीच्या स्वये करुनी वळसा । राजे पळउनी दशदिशा । हे म्या घरा आणीली ॥ ७२ ॥ जे अत्यंत सुलक्षण । येंत्र भेदु लक्षण । दूरी करूनी नृपाभिमान । द्वारकेसी आणीली ॥ ७३ ॥ मग यमुनेचें तीरीं । अत्येंत उग्र तप करी । म्या जाउनियां तेथवरी । कालिंद्रीये आम्ही स्त्री केली ॥७४॥ राजे मिळाले भारी । सुनंदेचीया स्वयंवरी । तितुक्यासी केली मारामारी । म्या नोवरी आणीली ॥ ७५ ॥ भुमासुर सहस्त्र शाला । सर्व कन्या त्या हो केल्या गोळा । त्या वरुनीया नृपबाळा । येक वेळां प्रणिले पां ॥ ७६ ॥ जंव जंव वाढे धन । तव तव चढे देह्याभिमान । चित्तीं नाही समाधान । धनसंपन्न असोनि ॥ ७७ ॥ धनवंतासी नाही दृष्टी । धनवंता नाईके श्रोत्रपुटीं । अखंड वाचेसी मीठीं । धाकापोटीं धनवंता ॥ ७८ ॥ याचक देखोनियां दृष्टीं । भोंवयासी घाली गांठी । आखंडवाचेसी करुनी चावटी । याचकापाठी वसवसी ॥ ७९ ॥ यैसे सांगतां गोपाळा । सुदामयाचा लागला डोळा । विश्वकर्मा पाचारिला । स्वार केला तात्काळ ॥ ८० ॥ नमुनियां विश्वंभरा । तात्काळ गेला सुदामपुरा । रचिता जाला नगरा । जेवी दुसरी द्वारका ॥ ८१ ॥ मग कितेक दिवसावरी । सुदामा अंतरी विचारी । कांही नेदी जव मुरारी । तरि राहुनी कोण काज ॥ ८२ ॥ कृष्णासी म्हणें आतां करूं प्रयाण । बाळें पीडती अन्नेवीण । मी जाईन आपण । त्यांचे समाधान करावया ॥ ८३ ॥ आजीच आहे मुहुर्त । बाळाचे पुरवावया अर्त । मज लागी नित्ये ध्यात । आपुला स्वार्थ करावा ॥ ८४ ॥ मग म्हणें येदुनंदन । अवश्ये करावे प्रयाण । त्याचें त्यास वस्त्र नेसउन । करुणाघन बोलवित निघाला ॥ ८५ ॥ सुदामा धरुनियां करी । घातला द्वारकेबाहेरी । वारंवार नमस्कार करी । सुदामयाचे चरणासी ॥ ८६ ॥ मग सुदामा अंतरीं विचारी । घरा जाउ कैसीया परी । काये आणीले म्हणेल सुंदरी । तियप्रेति काय सांगो ॥ ८७ ॥ यैसे चिंतीत सुदामा । पावला निज ग्रामाची सीमा । नगर देखोनि सुदामा । इकडे तीकडे पाहतसे ॥ ८८ ॥ म्हणें मी आलो कोठें । काय चुकलो वाट । परत परतोनीया नीट । दारवठा पाहतसे ॥ ८९ ॥ उपरी वरी वेघोनी । वाट पाहे ब्राम्हणी । सुदामा देखोनि दुरोनी । तीकडे

इकडे पाहातसे ॥ ९० ॥ लेउनी सुवर्ण अळंकार । आली सुदामया समोर । तीस करी नमस्कार । म्हणे कोण कोणाची ॥ ९१ ॥ सुदामा धरुनि निज करीं । निज गृहाप्रती नेउनी । मग सिंह्यासनी बैसउनी । सभेमध्यें हरी श्री हरिदास ॥ ९२ ॥ देखोनी सुदामयाची संपती । इंद्र लाजिला आपुले चित्तीं । सर्वत्रहीं खांब्यां भींती । मध्ये मध्ये इंद्रनीळ ॥ ९३ ॥ पाचीचा केला दारवंटां । हीरे जडित कपाटा । दासी दास अंती सुभटा । थोकी थोकी उभीया ॥ ९४ ॥ रत्नखचित पलंग । अनेक फीरती अलंग । सर्वत्र हरीनाम प्रसंग । ऐकता आस्तांग नीवतसे ॥ ९५ ॥ सुदामा पाहे ब्राम्हणी । तव ते दूसरी रूक्मिणी । बाप गोपाळाची करणी । पूर्वी सीराणी भक्तांची ॥ ९६ ॥ यालागीं न धरावी आशा । शरण रीघावे त्या जगदीशा । तो पाठक नामा यैसा । सदा असे प्रसन्न ॥ ९७ ॥

इति श्री सुदामचरित्र संपूर्णमस्तु ॥

## ॥ चंद्रहास्याख्यान ॥ प्रसंग ॥ १ ॥

श्रीरामचंद्रायेन्मा: ॥ पुसतसे अर्जुन वीरू ॥ तंव बोलीला नारदेस्वरू ॥ पुर्वि केरळाद्विपति थोरू ॥ स्वद्धर्मकुळी विख्यातु ॥ १ ॥ प्रजापाळण भुतकृपा ॥ अैसे बहुत काळ क्रमलें जाण पां ॥ कवणे येके समई राजद्वीपा ॥ पुत्र जाला चंद्रहास्ये ॥ २ ॥ मुळ लागले अपुर्वपरी ॥ राजलक्षणे सर्व शरीरी ॥ उचस्थानी गृह नीद्धारी ॥ सामुद्रीक बरवी ॥ ३ ॥ त्या केरळाद्वीपतिचे नगर लोक वेढीला ॥ युध्य जाळे सकळा ॥ केरळाद्वीपति तयेवेळा ॥ मारीला असे ॥ ४ ॥ अग्नीप्रवेश केला भार्या ॥ तेथे तिन वरुषें धाया ॥ कुंतुळापुरा नेला राया ॥ तेथे प्रतिपाळीले ॥ ५ ॥ ज्वरे पीडति[1] द्धाया जाळी ॥ साहावा दीवसी ईस्वरकृपा जाली ॥ अति थोर जाजावली ॥ चंद्रहास्यालागुनी ॥ ६ ॥ पाठी नीराधारी नीराश्रीत ॥ नगरी लेकुरांसवे खेळत ॥ जे जे क्षुधार्थी देखत ॥ ते अन्न घालीत पाचारुनी ॥ ७ ॥ खेळतां सवे बाळां ॥ काय अपुर्व वर्तेले भुपाळा ॥ शुध शाळीग्राम सीळा ॥ सांपडली चंद्रहास्यासी ॥ ८ ॥ मुखी घातली चंद्रहास्यें ॥ पुनरपी लेकुरामाजी खेळतसे ॥ जेजें बोलावीति अन्नोदेशें ॥ तें अन्न अभ्यांगु करवीति ॥ ९ ॥ आधी न्हाणी सीळेसी ॥ पाठी अभ्यांगु चंद्रहास्यासी ॥ नैवेद अर्पी सीळेसी ॥ पाठी भोजन करी आपण ॥ १० ॥ पाहो ठाकति दोही

१ पीडित.

भागी ॥ कोण्ही लेववीति टोपी आंगी ॥ बारे भुकेलासी वेगीं ॥ जेउ पां रे चंद्रहास्या ॥ ११ ॥ येक बोलावीति वरासी ॥ येक वारीति येकीसी ॥ म्यां आवंतिले चंद्रहाशासी ॥ वाटणी नये गुणें करी ॥ १२ ॥ स्त्रीया धांवती सांगातें ॥ येकी वारीति येकीमेकीतें ॥ म्यां आवंतिलें चंद्रहास्यातें ॥ वाटणी नये गुणत्व ॥ १३ ॥ तंव प्रधान दुष्टबुद्धीचा घरी ॥ द्वीजसंतर्पण बरवया परी ॥ मोहोछाव मांडीला कवणेपरी ॥ रुषी तपी तापसी बोलावीले ॥ १४ ॥ चंद्रहास्य खेळतां देखीला ॥ प्रधाने साउमा बोलावीला ॥ तुही जेवी ह्मणोनी नीरोप दील्हा ॥ येरे श्नान सारीले ॥ १५ ॥ सारीले देवार्चन वीधी ॥ नैवेद समर्पीला आद्धीं ॥ जेउं बैसला रुषीमद्धी ॥ परी अवघीयात लक्षणस्त ॥ १६ ॥ रुषी जेवीले सकळीक ॥ वीडे घेत जाले सात्वीक ॥ पाठी अक्षता घेउनी नावेक ॥ मंत्र वेद आदरीले ॥ १७ ॥ अवघे आसीर्वाद देती ॥ राज्य करी या पुत्रासमवेती ॥ राग आला प्रधाना नीश्चीती ॥ हा कवणाचा ऐसे नेणा ॥ १८ ॥ वाउगेच आसीर्वाद देता ॥ पुत्र कोणाचा नेणता ॥ धालेति भरलेति घरा जा म्हणता ॥ पढत मुर्ख छांदसनो ॥ १९ ॥ परी चींता प्रधानाचें ॥ आसीर्वाद मानभावाचे ॥ लटके नव्हे तपोनीद्धीचे ॥ काय प्रतिकार करु आतां ॥ २० ॥ म्हणोन जीवहत्या चांडाळा ॥ प्रधाने बोलावीले सकळा ॥ नीरोप देउनीयां ते वेळा ॥ वनास नेउन वधावे यातें ॥ २१ ॥ वाम चरणीची आंगोळी ॥ खुडुनी आणावी मज जवळी ॥ ईतुके करावे तात्कांळी ॥ मी द्रव्य देईन तुम्हासी ॥ २२ ॥ बीदी खेळता लेकुरा ॥ चाळउनी नेले वनांतरा ॥ गीरी गहीवरी कंदरीदरा ॥ तेथें वधु आदरीले ॥ २३ ॥ काढीले खर्ग पुसील्या द्धारा ॥ ह्मणेति स्मर रे लेकुरा ॥ तुझा साह्य करीता खरा ॥ तो आठवि बाळका ॥ २४ ॥ येरे मुखातुनी सीळा काढीली ॥ हास्य करुनि करी घेतली ॥ नामप्रबंधे बोली स्मरली ॥ ते काळी अरण्यात ॥ २५ ॥ अहो जी पुरुशोतमा ॥ हरी उपेंद्रा मेघशामा ॥ नारसींहा नारायणा उत्तमा ॥ त्रीवीक्रमा श्रीवीस्णु ॥ २६ ॥ अल्हादवीस्मीत वदना ॥ क्रुपा आली अत्यंत जना ॥ म्हणे जीवे न मारु जाणा ॥ राखो यासी ॥ २७ ॥ कापु आंगोली दाखउ प्रधानांसी ॥ परि न मारू जीवें बालकासी ॥ खर्ग तोडुनी आंगोळीसी ॥ मग प्रधानापासी आणीयेली ॥ २८ ॥ लेकरू मारीलें खुण दीधली ॥ खुडसन प्रधानांची फीटली ॥ त्याचे मन संतोसवीली ॥ महाद्रव्य दील्हे तयासी ॥ २९ ॥ परी तुटले आंगोळीचें दुख ॥ बाळका होतसे थोर देख ॥ उस्णे पीडीत करीत शोक ॥ ते कुमारी बाळक ॥ ३० ॥ तुटले आंगोळीची वेथा ॥ बाळकाये अवस्था ॥ वनी

हींडता करी सोका आक्रोंदता ॥ ते सकुमार बाळक ॥ ३१ ॥ सकुमार चरण-कमळें ॥ रुतति कंटकवळे ॥ महीमान सत्वाचें आगळें ॥ नीधारी सीळेवरी ॥ ३२ ॥ मुखी घालुनी सीळा ॥ नेत्र केले दोन्ही विकळा ॥ वनी हींडतसे बाळें ॥ तंव काय अपुर्व वर्तले ॥ ३३ ॥ तंव घोडेस्वार पावले वनी ॥ राजा आला पारद्धीलागुनी ॥ येकसेरे देखीलें नयनी ॥ सुकुमार बाळक ॥ ३४ ॥ मग उतरोंन रथाखालता ॥ कळंदु जाला साउमा येता ॥ पुसे तुं कोणाचा रे सुता ॥ कां हींडतोसी दारुण वनी ॥ ३५ ॥ कां हींडसी वनी दुरीळें ॥ म्हणोनी उदके पुसीले डोळे ॥ पुढति अंतकरण खळबळे ॥ उचलुनि आलें-गीला ॥ ३६ ॥ वीस्मीत जाला कळींदु ॥ म्हणे बाळका येवढा काय स्छंदु ॥ जपतोसी नाम प्रबंधु ॥ सहश्र नामे श्रीहरीची ॥ ३७ ॥ ये वनी अकस्मात ॥ अपत्य जालेसे प्राप्त ॥ राया राजकुमरां आज्ञा देत ॥ ग्रामाप्रति नीघाले ॥ ३८ ॥ मंत्री प्रधान आधीकारी ॥ आले नगराबाहेरी ॥ राये नीरोप दीधला बरवीया परी ॥ गुढीया मखरे उभवीली ॥ ३९ ॥ प्रवेशला राउलागणाभीतरी ॥ पुढारे चालीला माझारी ॥ येउनि काळींदाची प्राणेस्वरी ॥ वोवालीताहे पुत्रातें ॥ ४० ॥ वीडे देउनि समस्तां पाठविलें ॥ थोर कळींदा सुखें जाले ॥ म्हणे आजी जन्मसार्थक जाले ॥ पुत्र लाभला आम्हासी ॥ ४१ ॥ सुखी रायाचे अंतःकरण ॥ येथुन फीटले अपुत्रपण ॥ अल्हाद सर्वजना ॥ चंद्रहास्यापुत्रत्वें ॥ ४२ ॥ साहावे वरुष रीघालीया वरी ॥ कळींदु चींता करी ॥ लागले पढवावा इतुकीयावरी ॥ मग पंडीताजवळी पढो घातले ॥ ४३ ॥ सातवे वरुषी प्राप्त जालें ॥ सर्व लेखन अवगत जाले ॥ रायें मुंजबंधन केलें ॥ संतोशवीले द्वीज-वर ॥ ४४ ॥ आठवे वरुषीं शस्त्रास्त्र वीद्या ॥ चंद्रहास्या वेदविद्या ॥ अवघ्या पढीनला सर्व वीद्या ॥ आणीक नाही दुसरा ॥ ४५ ॥ नारदु म्हणे फाल-गुणा ॥ शाळीग्रामसीळा माजी वदना ॥ रात्री दीवस हरीचींतना- ॥ वाचुनी नेणे हा बाळ ॥ ४६ ॥ राणीव आलीं चंद्रहास्या हाता ॥ लोक स्वाद्धीन केलें समस्ता ॥ आज्ञा केली महंता ॥ चंद्रहाशे लोकासी ॥ ४७ ॥ शाळग्राम घरोघरी ॥ येकादसी व्रतधारी ॥ अतितपुजा नीरंतरी ॥ द्वारी तुळसी वृंदावने ॥ ४८ ॥ अवघें नारदे बोलीले ॥ परीसोन अर्जुनें आश्चीर्य केले ॥ बहुतां जन्माचें अर्चीलें ॥ पुण्य हे हो ॥ ४९ ॥ आणीक याची कथा मनोहर ॥ मज सांगावी सवीस्तर ॥ सोळा वरुपा तो सुंदर ॥ काय करीता जाला ॥ ५० ॥ आज्ञा दीजे जी भुपाळा ॥ जींकावया भुमंडळा ॥ दीग्विजयो भुपाळा ॥ माहां प्रबंधे करुनि ॥ ५१ ॥ कळींदु म्हणे बारे सुता ॥ पृथ्वी जींकावया सामान्ये नव्हे कथा ॥ राजे पृथ्वीचे जींकीतां ॥ थोर प्रयास

लागतिल ॥ ५२ ॥ ते वेळी चंद्रहास्य रागेला ॥ पाचा रथी परीवारळा ॥ पीत्रुआज्ञा घेउनि नीघाला ॥ राय पृथ्वीचे जींकावया ॥ ५३ ॥ बाप सामग्री पुरुशार्थी ॥ जीतिले पृथ्वीचे भुपति ॥ युद्ध करू ते न म्हणति ॥ शक्ती अलोलीक याची ॥ ५४ ॥ ऐसी छेपन कोटी वसुंधरा ॥ दीपोदीपीचीया राजेस्वरा ॥ चंद्रहास्य चंदनावति नगरा ॥ रत्ने सुवर्ण घेउनि आला ॥ ५५ ॥ बाहेर कळींदु भेटो आला ॥ चंद्रहास्य आलींगीला ॥ ते वेळी सुपुत्र बोलीला ॥ कळींदाप्रति ॥ ५६ ॥ हे राये पृथ्वीचे थोर थोरा ॥ सकळीका माहावीरा ॥ जाणोनी आणीले नगरा ॥ यांसी आलींगन देईजे ॥ ५७ ॥ यज्ञकृत्य सारीले भुपति ॥ सामग्रीया वेचील्या समस्ती ॥ समस्त बोलावींले भुपति ॥ आभरणे अहेर देउनिया ॥ ५८ ॥ ऐसा बहुतां दीवसा ॥ कळींद बोले चंद्राहास्या ॥ आम्ही करभार प्रतिवरुषा ॥ कळींद्रास देत असों ॥ ५९ ॥ तरी प्रसंगे द्रव्य उरले असें ॥ देउन पाठवावे प्रद्धानासरीसे ॥ आम्ही करभार देणे असे ॥ काये तया ॥ ६० ॥ राय जींतीलें पृथ्वीचें ॥ त्याहुन बळ काय त्याचे ॥ कळींग म्हणे शब्दाचें ॥ स्वामीद्रोही न व्हावे ॥ ६१ ॥ म्हणोनी कीतेक सामग्रीसी ॥ पाठवीले प्रधानासरीसी ॥ तेही नीरवीले दुष्टबुधीसी ॥ त्याणे कळींद्रासी सांगीतले ॥ ६२ ॥ सामग्रीसी उदंड देखिलें ॥ प्रधान रावो शंतोशले ॥ त्याचें लोक अस्वासीले ॥ समस्त घालवीले भांडारी ॥ ६३ ॥ नीरोप दीधला प्रधाना ॥ या घालावें उदक अंना ॥ घेउनि गेला प्रधानां ॥ मग पूजीले ते लोक ॥ ६४ ॥ दुष्टबुद्धी उठवी जेवणा ॥ तंव ते म्हणति येकादसीवृत्त जाणा ॥ ते सांगे नामा ॥ विष्णुदास ॥ ६५ ॥ संपुर्णमस्तु ॥ १ ॥ चंद्रहास्याख्यानप्रसंग पहिला समाप्त ॥ ओवी संख्या ॥ ६५ ॥ ॥ शुभंभवतु ॥

## ॥ चंद्रहास्याख्यान ॥ प्रसंग दुसरा ॥

श्रीगोवींदायेन्मा: ॥ यरु म्हणति परीयसी ॥ आम्हां चंद्रहास्याची आज्ञा आहे अैसी ॥ जो मोडील येकादसी ॥ त्यासी दंडु सर्वथा ॥ १ ॥ तरी आजीचा दीवसु कृपा कीजे ॥ प्रधान ह्मणे आम्हा मान दीजे ॥ पाठी व्रत कीजे ॥ नगरा जाउनी आपुलीया ॥ २ ॥ येरु ह्मणे दीजे अवधान ॥ आम्हा सर्वथा उपोशण ॥ वृत्त मोडीलीया होईल आन ॥ चंद्रहास्य दंडील ॥ ३ ॥ अैकोनी दुष्टबुधी अैसें ॥ तुम्हा दंडीलीया चंद्रहास्यें ॥ मी दंडीन तया सर्वस्वें ॥ आमचे वचन तुम्ही करावे ॥ ४ ॥ आम्हा अंन घेणे नाही सर्वथा ॥ न बोलावें वचन ॥ तंव रागे बोले प्रधान ॥ वेगी सत्वरी नीघाला ॥ ५ ॥ जाउनि कळींद्राप्रति ॥ करीतु असे विनति ॥ म्हणे

तुम्ही पृथ्वीचे भुपति ॥ कळींदु सेवक तुमचा ॥ ६ ॥ त्यासी भेटो दृष्टबुधी म्हणत ॥ बरवें म्हणतसे नृपनाथ ॥ वरु आणावा चंपक मालतिते ॥ ते सुंदर सगुण ॥ ७ ॥ राजाज्ञा घेउनि नीघाला ॥ दळभारेसी परीवारला ॥ पुत्र मदन कुशल भला ॥ त्यासी नीरवीले राज्य सैन्य ॥ ८ ॥ प्रधान आला मंदीरासी ॥ भोजन जालें तयासी ॥ ते वेली बोलीली कैसी ॥ कुमारीका वीशया ॥ ९ ॥ सीपोंन वाढवीलें रोपां ॥ तया उद्यापन होये बापा ॥ येरु म्हणे नीरोप सोपा ॥ येउनि करीन भरवसा ॥ १० ॥ जाली उपवर अतिपाडे ॥ गावा जाता घातले साकडे ॥ आता ईजोगा वरु जोडे ॥ ऐसी बुधी काय करू ॥ ११ ॥ ते वेळी अस्वासीलें प्रधाने ॥ आलीया करू वृक्षा उद्यापने ॥ नीवे उतावीले मने ॥ चंदनावति टाकीली ॥ १२ ॥ कळींदु समस्त प्रधानेसी ॥ येउनि भेटला दृष्टबुधीसी ॥ बीढारे दीधली तयासीं ॥ संजोगणी पै जाली ॥ १३ ॥ प्रधानामनी आणीक भावो ॥ ह्मणे तुमचा पुत्र आणा पाहो ॥ जेणे जींतिला राय रावों ॥ छेपन कोटी वसुंदरा ॥ १४ ॥ ते वेळी चंद्रहास्य आणीला ॥ दृष्टबुधीसी भेटवीला ॥ नमस्कारून उभा ठेला ॥ येरू लागला अवलोकुं ॥ १५ ॥ आपादमस्तक वरी पाहीले ॥ तंव चीन्हा डावे आंगोळीचे देखिले ॥ म्हणें आता का लावावी वेळे ॥ मग युक्ती वीचारीली ॥ १६ ॥ वीचारुनी बोल रायास ॥ म्हणे तुम्हा गमत असे कैसें ॥ असतां जवळीं नीधान ऐसें ॥ रायासी कां पां न भेटावे ॥ १७ ॥ आतां हे पत्र आमचें न्यावे ॥ मदना पुत्रा हाति द्यावे ॥ बरवेपणे नीरोपावे ॥ आणीकासी न सांगतां ॥ १८ ॥ स्वति श्रीरस्तु मदना ॥ दुष्टबुद्धी पत्र लेखना ॥ पाठवीले येकांत स्थाना ॥ करूनी वीचारणा वाचावे ॥ १९ ॥ चंद्रहास्य राजकुमार ॥ सर्व संपतिया आधीकार ॥ म्हणोनीयां हा मंत्र ॥ अनुष्टीजे तो ॥ २० ॥ वीप यासी द्यावे प्रेत्ने ॥ कुळकर्म नाव न म्हणावे मने ॥ वय रूप न पाहाणे ॥ क्षीण[२] न लावणे अगा सुपुत्रा ॥ २१ ॥ सुदीन कुदीन न सोधी ॥ आणीका न पुसावीं बुधी ॥ कार्य करावे क्षीणामधीं[२] ॥ जरी पुत्र होसी आमुचा ॥ २२ ॥ ऐसें पत्र लीहीले ॥ करमुद्रा-चीन्ह केले ॥ दुष्टबुद्धींया जडावीलें ॥ करी दीधले चंद्रहास्या ॥ २३ ॥ हे न्यावे कुंतळापुरा ॥ करी द्यावे मदनपुत्रा ॥ न दाखवावे मातापीतरा ॥ आपलीयां सुबंधु ॥ २४ ॥ आणीक नेघावे सांगाते ॥ येकलाची जावे तेथे ॥ नमस्कारूनी प्रधानाते ॥ गेला आपुल्या मंदीरा ॥ २५ ॥ म्हणे मज जाणे कुंतळापुरा ॥

२ क्षण (पाठ)

भेटणें दुष्टवुधीच्या कुमरा ॥ नमस्काकूनी मातापीतरां ॥ आज्ञा घेउनी नीघाला ॥ २६ ॥ सांगावें माध्यानवेळे ॥ चंद्रहास्य आला सीघ्रकाळें ॥ मग वाह्यप्रदेसी नीर्मळें ॥ उपवने देखीली ॥ २७ ॥ सरोवर स्फटीक नीवंध ॥ पक्षकुळें वहुवीध ॥ कास्मीर सोमकांतासन्नीध ॥ वृक्षवरी सोभति ॥ २८ ॥ अैसीया सरोवराच्या पाळी ॥ चंद्रहास्य आला माध्यानकाळीं ॥ छाया देखीली सुसीतळी ॥ मनोरम्य स्छान ते ॥ २९ ॥ वारु वांधला तये केळीसीं ॥ मुख प्रक्षाळीले उदकेसी ॥ वीश्रांत जाली चंद्रहास्यासी ॥ ते वेळी वीडा घेतला ॥ ३० ॥ श्रम गेला सुवीश्रांत ॥ जाला चंद्रहास्य सुस्नात ॥ सहस्रनाम जपत ॥ जप देवतार्चन सारीले ॥ ३१ ॥ जवळी होतें सीधान्न ॥ चंद्रहास्य सारील भोजन ॥ पुनर्पी वीडा घेउन ॥ नीद्रा केली क्षण येक ॥ ३२ ॥ चंपक मालति राजकन्या सुंदरी ॥ आणी वीषया प्रधानाची कुमारी ॥ सवे वहुसाळ सृंगारी ॥ गोष्टी सांगत नीश्रीत ॥ ३३ ॥ वसंतपुष्पे प्रार्थनेसी ॥ अस्वथ सींपणे तयासी ॥ गौरीपुजन प्रतिदिवसी ॥ श्रुंगारवाडीयेसी त्या आल्या ॥ ३४ ॥ पाठी नीघालीया सुंदरा ॥ देखलि नीद्रीस्ता राजकुमरा ॥ जैसी केळवळा नोवरा ॥ प्रणु आला प्रीयेसी ॥ ३५ ॥ परी तयां वीषयेचे मनीं ॥ वरू वैसला ततक्षणीं ॥ स्वासु घालोनी अंतकरणी ॥ वेळोवेळा पाहातुसे ॥ ३६ ॥ वीषया राहीली मावारी ॥ चुकउनी सखीया सुंदरी ॥ येकवेळ दृष्टी पाहों अंतरी ॥ तेथेची असेल की गेला ॥ ३७ ॥ सखीयां म्हणति चुकउनि गेली ॥ कोणासवें केउति राहीली ॥ अथवा न देखों तरी ॥ येथै मागुत्या येतील ॥ ३८ ॥ तंव समीप येउनी ठेली ॥ थोर नीद्रा भरें आली ॥ म्हणे भवानी तुष्टली ॥ भ्रांतीं घालली नीद्रेची ॥ ३९ ॥ तवं ग्रंथीस देखिली शाळग्राम सीळा ॥ सोडून नीडली लावीली वेल्हाळा ॥ म्हणे वैस्णव असे केवळा ॥ आणीक भक्ती न देखों ॥ ४० ॥ ते वेळे झडकरी सोडीली ॥ ग्रंथी दुसरी सेजारीली ॥ दोरीस पत्रीका वांधीली ॥ प्रढली असे सुदृढ ॥ ४१ ॥ पीत्रुमुत्रा [३] वोळखिली ॥ तैसीच कपाली लावीली ॥ दर्शने नीर्भर जाली ॥ वाचु लागली आदरें ॥ ४२ ॥ स्वति श्रीमदना ॥ दुष्टवुद्धीपुत्रा गहना ॥ पाठवील येकांतस्छाना ॥ वीचारूनि वाचावे ॥ ४३ ॥ वीष यासी दीजे प्रत्ने । कुळ कर्म नाव न म्हणावे मने ॥ वय रूप न पाहाणे ॥ क्षिण न लावणे सुपूत्रा ॥ ४४ ॥ वीष यासी द्यावे अैसें ॥ येथें का पां आनारीसें ॥ काय चुकलों वापू असें ॥ अक्षर अवघड पडीले पां ॥ ४५ ॥ पीता चुकला असेल जाण ॥

३ मुद्रा

अक्षर पडीलें असेल जान ॥ नखे नेत्र कांजल वोरपोन ॥ मसीचा 'या' रेखीला ॥ ४६ ॥ वीषया द्यावी यासी ॥ नखे रेखिले नेत्र मसी ॥ मग गुंडाळोन पत्रिकेसी ॥ पदगी बांधली मागुती ॥ ४७ ॥ मग झडकरी नीघाली ॥ सखी-यानी येता देखीली ॥ म्हणेति कां वो कोमाईली ॥ बोलति वेलहाला ॥ ४८ ॥ रुळी न करू आम्ही कोन्हासी ॥ म्हणोनी नीघालीया वगसी । प्रवेसली राउळांगणासी ॥ अवस्ताज्वर काय सांगो ॥ ४९ ॥ परी न सांगो कवणा कांही ॥ तिसरा प्रहर जाला पाही ॥ नीद्रा हरली तिये समई ॥ मग उठीला चंद्रहास्य ॥ ५० ॥ मुख प्रक्षालुनी घेतला वीडा ॥ पुनरपी स्वार जाला घोडा ॥ वेगी नीघाला झडझडा ॥ प्रधानगृहा पावला ॥ ५१ ॥ वृतांत द्वारपाळाहातिं ॥ पाठवीला मदनाप्रति ॥ येरू जाउनि करी वीनति ॥ प्रधानपत्रीका आली असें ॥ ५२ ॥ नाम चंद्रहास्य तया ॥ पुत्र हो कळींदा गयां ॥ मदन आला धावोनीयां ॥ क्षेम आलींगन दीधली ॥ ५३ ॥ भीतरी नेला नीजगृहीं ॥ नेउनी पुजा केली पाही ॥ अवघे राउळांगणे उछाई ॥ तंव काय अपुर्व वर्तले ॥ ५४ ॥ हलुच सोडींली पत्रीका ॥ मदना करी दीधली देखा ॥ मुखी नीरोप ईतका ॥ पत्राप्रमाणे काम करणें ॥ ५५ ॥ स्वस्ति श्रीरस्तू मदनां ॥ दुष्टबुधी पत्र गहना ॥ पाठविले येकांत स्थाना ॥ वीचारूनि वाचावें ॥ ५६ ॥ समस्त पत्र वाचीत ॥ वीषया द्यावी यासी नीश्रांत ॥ वयकुळ न वीचारीतां ॥ झडकरी कार्य करावें ॥ ५७ ॥ लीखि-तेसी वरांत गेला ॥ मातेप्रति सांगो लागला ॥ वीषया वरू आला ॥ पत्रीका प्रधाने पाठवीली ॥ ५८ ॥ देखोनीया चंद्रहास्या ॥ पाहात ठेलीया डोलसा ॥ रूपे मदनु नव्हे अैसा ॥ यासारीखा वरवेपणे ॥ ५९ ॥ मायेची आज्ञा घेउनी मदन ॥ बाहेर आला झडकरुन ॥ बोलाउनिया ब्राह्मण ॥ गोधुली लग्न नीघाले ॥ ६० ॥ उपरवाहीयची वरू नेला ॥ सेजारगृही वैसवीला ॥ सुना जावया नीरोप दीधला ॥ तुम्ही तिकडील वऱ्हाडी ॥ ६१ ॥ वहीणी भाउ होति वरा ॥ त्याही न्हानीला नोवरा ॥ तै मांडीले व्यापारा ॥ वळवटा कुसरी ॥ ६२ ॥ वरा जाले न्हाणेवोरे ॥ वाद्ये त्राहाटीली छत्रें चामरे ॥ नवरा असुवा( वरि ) वेगवगत्रे ॥ परणु नीघाला ते वेळीं ॥ ६३ ॥ करी नारयेळ अक्षता ॥ देति उपाध्ये म्हणति सीघ्रता ॥ पालवछत्रें मृदांग वाजता ॥ धवले म्हणति गायक ॥ ६४ ॥ वरू पावला द्वाराजवळी ॥ येक म्हणति मुदा वोवाळी ॥ मधुपर्क वीधी केली संकली ॥ कुशळ वेद पढताति ॥ ६५ ॥ अंत्रपाट धरीति ॥ सावधान जोतिसी म्हणति ॥ मंगळा अष्टके म्हणति प्रति ॥ अति समीप सावधान ॥ ६६ ॥ ॐ पुण्या जाली थोरे ॥

टाकीति अक्षतां परस्परें ॥ कन्यादान केले मदनकुमरे ॥ पीत्रु आज्ञां वरदक्षणां ॥ ६७ ॥ गौरी वीवाह्यादीक गाति ॥ पाठकु सुलग्न म्हणति ॥ सोवासीणी आंबा सीपीति ॥ बाहेर येति बउल्यावरी ॥ ६८ ॥ हवनत्रीद्धी जाली नीकी ॥ आंदण बोलाउनि केले सुखि ॥ मंडप कापडीले अनेकी ॥ चांदावे मुक्त घोशबांधले ॥ ६९ ॥ नृत्य मांडीला नृत्यकी ॥ कथा सैवरे नेटकीं ॥ मदने वीस्व केले सुखी ॥ तीन दिवस जाले ॥ ७० ॥ तंव येरीकडे दुष्टबुधी ॥ कळींदु आकलुन घातला वंदि ॥ लोक आकर्मले आपदी ॥ नगरी पीडीले समस्त ॥ ७१ ॥ सर्वस्व हरुनी घाला ॥ बहुत मार्गे कर्मेला ॥ तंव येक सर्प बोलीला ॥ प्रधानासी ॥ ७२ ॥ मी रक्षक तुझीया द्रव्याचा ॥ वीवाह आदरीला वीषयाचा ॥ मदने वेचु केला त्याचा ॥ म्हणोनी अदृष्ट जाला ॥ ७३ ॥ काय पां सांगीतले दुश्चीन ॥ संचीत जाला प्रधान ॥ तंव देखीले ब्राह्मण ॥ टीळेमाळा वस्त्रि ॥ ७४ ॥ तयासी पुसे आपण ॥ कोठुन येतात ब्राह्मण ॥ सोहळा वीशयाचा जाण ॥ म्हणे नामा पाठक ॥ ७५ ॥ ॥ चंद्रहास्याख्यान ॥ प्रसंग दुसरा समाप्त ॥ ओवी संख्या ॥ ७५ ॥

## ॥ चंद्रहास्याख्यान–प्रसंग तिसरा ॥

श्री सरस्वतियेन्मा: ॥ हरति पासोडीया द्रव्यग्रंथि ॥ येक भाकिति काकुळति ॥ प्रधाने वीचारीले चीत्ती ॥ ब्राम्हणा ऐसे करू नये ॥ १ ॥ ते वेळे वारीळे परीवारा ॥ नगरा आले वेगवगत्रा ॥ परीसोनी पातला सामोरा ॥ प्रधानसुत मदनु ॥ २ ॥ येरु म्हणे पत्राप्रमाणें ॥ (कार्य केले थोरे गुणें ॥) पाहा पां वधुवरें दोघे जणें ॥ अळंकारीली हो कैसी ॥ ३ ॥ काय पां लीह्वीता भ्रात पडलीं ॥ कीवा ह्याता मी [४] लागली ॥ या बोल काये म्हणोन आदरीली ॥ प्रीयवचने तयांसी ॥ ४ ॥ मदन पाठविला राजभुवना ॥ काळींद्रासी केलें नमनां ॥ उभा ठाकला कर जोडुन ॥ काय वचने बोलतसे ॥ ५ ॥ प्रधान आले गावीहुनी ॥ राउला पाठविली वीनवणी ॥ श्रम जाला थोर म्हणोनी ॥ येध वा येणे नव्हेची ॥ ६ ॥ आणीक साडीयाचे कृत्य असे ॥ पुनरपि कळींद्री पुसे ॥ कवणा वीवाहे साडे कयेसे ॥ काय बोलतुसे मंदनु ॥ ७ ॥ तंव स्थानीचे तेथें बोलति लोक ॥ वीषया वीवाह केला देखा ॥ नोवरा नेटका आणीला देखा ॥ समस्त लोक हो ॥ ८ ॥ धर्मीष्ट पाहातां नाही क्षीति ॥ आणीक बहुत याची रीति ॥ तंव भुपति

४ अग्नी–पाठ

काये बोलति ॥ मदनालागी ॥ ९ ॥ आम्हा घरी असे नोवरी ॥ चंपकमाळति राजकुमारी ॥ सांगत असो वरसे च्यारी ॥ वर मेळवा म्हणोनी ॥ १० ॥ तें सोडोनी आपले हीत ॥ कन्या उजविली त्वरित ॥ मनी काहि न वाटत ॥ तुम्हासि पैं ॥ ११ ॥ कोणे ठाई चंपकनंदीनि ॥ कोठे प्रधाननंदिनि ॥ रावो रागेला अंतःकरनी ॥ सेवकवर्ग बोलाविले ॥ १२ ॥ मदनासवें जा सकळै जना ॥ नोवरा गजी बैसउनि आणां ॥ मदना सवें लोक चालीले जाणा ॥ प्रधानगृहे टाकीले ॥ १३ ॥ तेथें प्रधान केले आन ॥ बोलाविले आप्तेजन ॥ तुम्हा देईन बहु धन ॥ येक ह्मणीयारे करावें ॥ १४ ॥ चंडिकेच्या देउलाभितरी ॥ गाभारा व्हावें अंधकारी ॥ जो येईल सांजेचा भरी ॥ त्याचा प्राण घेइचे खर्गे ॥ १५ ॥ बोवलीयाजवळी यउनी प्रद्धान ॥ काय म्हणे चंद्रहास्यालागुन ॥ वीषयासी वरु होईल जाण ॥ त्या हाति पुजा भवानिसी ॥ १६ ॥ नवसु आमचा स्वभावे ॥ वाह्यप्रदेसिं तुम्ही येकले जावें ॥ भवानिसि बरवे पुजावे ॥ पाठी यावे मंदीरा ॥ १७ ॥ अैशा अैकोन वचनाप्रति ॥ राये घेतली पुजेची आईति ॥ नीघे पाउले उचलोनी त्वरिति ॥ राउळांगण सांडीलें ॥ १८ ॥ तंव सेवें सेवक शतयेक वळकटा ॥ मदनु पावला दारवठा ॥ ते वेळे पुढें देखिले जेष्ठा ॥ चंद्रहास्या नोवरीयासी ॥ १९ ॥ तयासी ह्मणीजे मदने ॥ तुम्हासी पाचारीले नृपाने ॥ येरु म्हणे भवानिपुजने-॥ वीण कैसे जावे ॥ २० ॥ मदने घेउनियां पुजेसि ॥ गजी वैसउनि चंद्रहास्यासी ॥ नवरा पावला राजद्वारासी ॥ उतरला क्षीतिमाजी ॥ २१ ॥ उचलोनि बैसविला सिंहासनि ॥ आणविली चंपकमाळति गुणी ॥ वामांगी बैसउनि ॥ दोघा भरीला शेषपाट ॥ २२ ॥ भांडारगृहाची गणणा ॥ न वदवेल सहस्रवदना ॥ गज रथ घोडे सुवर्णा ॥ वस्त्रे रत्न नृपें समर्पीली ॥ २३ ॥ या चंद्रार्क राज्य कीजे ॥ आम्हां तपासी आज्ञा दिजें ॥ बोलोन कलींद्र राजे ॥ नीघता जाला तेथुनी ॥ ॥ २४ ॥धन कनक समृधी सकळा ॥ चंद्रहास्य अवलोकिले तात्काळा ॥ गज रथ अस्वशाळा ॥ देखोनि सुखि जाला ॥ २५ ॥ मग गजावरी अरुढोनि ॥ सवें चंपकमाळती घेउनि ॥ सेना सहपरी पारोनि ॥ प्रधानमंदीराप्रति आले ॥ २६ ॥ चंद्रहास्ये वृतांत सांगीतला ॥ द्वारापासी मदनु भेटला ॥ तेणे पुजा घेउनि रायाप्रति पाठविला ॥ सकलीक हो अवधारा ॥ २७ ॥ अैसे दुष्टबुधीनें अैकिलें ॥ देवालीया गमन केले ॥ तव रंगसीळेवरी छिन्न भीन देखिलें ॥ सीर तया मदनाचे ॥ २८ ॥ मग ह्मणे कटाकटा ॥ कैसा मंत्र

१४०२

जाला उफराटा ॥ आह्मी लागो त्याची वाटा ॥ सीर सीळेवरी हाणीतले ॥ २९ ॥ वरु आणी चंपकमाळति ॥ बौला बैसति सिघ्रगति ॥ तेथें वीशयेसि वामांगि ठाव देति ॥ वडिली म्हणोनिया ॥ ३० ॥ मेहुणे मेहुणीया आकडसासा ॥ वोहवरांस घेउनि ग्रहप्रवेशा ॥ भोजन करीति समरसा ॥ वीनोदे चंद्रहास्यासवे खेळति ॥ ३१ ॥ वीडे देवविति दोघी-करवि ॥ म्हणति तिघे शोभति बरवि ॥ परी वीकल्प नाही जीवी ॥ दुसरी श्री जाली म्हणोनियां ॥ ३२ ॥ चंपकमालति गजस्कंदि ॥ मागे वीषया आपण मधि ॥ नीघे वाजत्रांचे नांदी ॥ राजगृह प्रवेसले ॥ ३३ ॥ सिंहासनी बैसोनि चंद्रहास्यें ॥ द्रव्य वेचिले असमसाहासे ॥ ब्राह्मण सुखीये केले कैसे ॥ द्रव्य बहुसाळ दिधले ॥ ३४ ॥ येरे दिवसि गुरव निघाला ॥ उदक बेले घेउनि गेला । चंडिकाप्रसादी प्रवेशला ॥ तंव दुष्टबुद्धी मदनु मृत्यपंथि देखीले ॥ ३५ ॥ परतला आला नगरात ॥ सांगीतले रायास त्वरीत ॥ प्रधानपुत्रेसिं मरण पावत ॥ चंडिकेचा देउली ॥ ३६ ॥ राये सादर पुसिलें ॥ येरे सर्व वृत्तांत निवेदीले ॥ मुखीचे तांबोळ सांडिले ॥ मग उठीले त्वरीत ॥ ३७ ॥ वेगि निघाला चंद्रहास्य ॥ दुष्टबुधी मदन सरीसें ॥ पडिलें देखे दोघांस ॥ आपण राहीला देउलि ॥ ३८ ॥ पाठी तिळ दुग्ध शर्करा ॥ घ्रीं खाद्ये अपारा ॥ तये आले वगत्रा ॥ पुष्प पर्ण सामग्री ॥ ३९ ॥ राये श्रान केले तात्काळीक ॥ स्थंडिल रचीळे लक्षण-युक्त ॥ त्यावरी केले अग्नीमुख ॥ राये हवन करु आदरीले ॥ ४० ॥ आहुति टाकिता सगळी सामुग्री ॥ मास कापोनि शश्रवरी ॥ मंत्रि घाली अग्नीमाझारी ॥ घृता आहुति मासाचीयां ॥ ४१ ॥ देह कापोनि हविले तेथें ॥ लोक विस्मयो तेथे ॥ ते वेळी प्रगटली त्वरीते ॥ कुंडातुनि माहामाया ॥ ४२ ॥ माग प्रसन जालीये तुले ॥ तरी उठवि या दोघातें ॥ नांतरी अपेश आले माते ॥ कुनाम थोर जननिये ॥ ४३ ॥ मग उठविलें दोघां जण ॥ वापु सत्वाचे निर्वाण ॥ तयाचे सीर जैसे सुवर्ण ॥ तैसे जाले तये वेली ॥ ४४ ॥ पाठी दोघा बैसवीति ॥ सकळ लोक मीळति ॥ वाजंत्रे वाजति ॥ ग्रामाप्रति पातले ॥ ४५ ॥ पाठी मातापीतरें आणीली तेथें ॥ राज्य चंद्रहास्य करित ॥ मदनु प्रधानवर चालवित ॥ दुष्टबुधी घरि राहीला ॥ ४६ ॥ निर्धार चंद्रहास्याचा ॥ नेम शालग्राम तुळशीचा ॥ राव जाला कुंतळानगरीचा ॥ पवित्र वेष्णेव वळीयाढा ॥ ४७ ॥ अैसियापरी माता पीतरेसी ॥ राज्य करी कुंतळापुरीसी ॥ वरुसे तिन शते तयासि ॥ राज्य करितां जाली ॥ ४८ ॥ वीशय मकरध्वज कुमरु ॥ जाला बळीयाढा जुंझार ॥ चंपकमाळतिस

पद्माक्ष सुंदरु ।। प्रसवति जालिया ।। ४९ ।। अैसी बाळपणाची भक्ती ।। शाळग्राम प्रतिति ।। चंद्रहास्या जाली प्राप्ति ।। मनईछीत कामना ।। ५० ।। गंडकि शाळग्राम सीळा ।। द्वारका दोनि चक्रे निर्मळा ।! जो वाई तुळसी-दळा ।। तो वीष्णुरुप व्रता ।। ५१ ।। अैसि प्रसंशा शाळग्रामाचि ।। मज बोळावया प्राप्ती कैची ।। नारद ह्मणे वेळ जाली श्नानाचि ।। आज्ञा घेतों अर्जुना ।। ५२ ।। नारद सत्यलोका निघाला ।। ते वेळ धनंजयो बोलीला ।। कथा पुण्यसागर सांगीतळा ।। ह्मणे नामा विष्णुदासा ।। ५३ ।। चंद्रहास्या-ख्यानं संपुर्णमस्तू ।। संपूर्ण ।। प्रसंग तृतीय समाप्त ।। ओवीसंख्या ।। ५३ ।।

## वस्त्रहरण

श्री गणेशाये नमः । श्रीसरस्वतीये नमाः । वस्त्राहरण । ओं नमों गजवदना । तु चौदा वीद्याच्या नीधाना । माहावीघ्ना पंचानना । करुणावना गणनाथा ।। १ ।। ब्रह्मवीदेचीया आगरा । नीरालंबीचीया आंकुरा । योग-सीधीचिया भांडारा । तु शंकरा वल्भु ।। २ ।। नवरसाचीया सागरा । आनंदसींधु जी सुंदरा । तुज न वर्णवे अपंरापरा । साधकासी सीदी-दायका ।। ३ ।। आधारसीत्कीचीया मुळपीठा । आनंदसींधु जी बरवंटा । सोभाग्येसुंदरा सुभटा । तु दारवटा ज्ञानाचा ।। ४ ।। आता नमुते सारजा । जे चतुराननाची आत्मजा । कुंडलणी वीश्वबीजा । तु वैखरी बोलीली ।। ५ ।। मग णमस्कारुनी गुरुराया । णीर्मळ मती जी व्होवीया । शरणागत स्रोतीया । त्याच्या पाया दंडवत ।। ६ ।। जे अनुभवाचे सागर । जे श्रवण-सुखाचे माहेर । जे दीणाचे कल्पांतर । त्याचा अभयकर मस्तकी ।। ७ ।। तेणे प्रसादे क्रुस्णचरीत्र । कथा ऐकवी पवीत्र । व्यासवचन वीचीत्र । जे भारती बोलीले ।। ८ ।। लाहोनी आज्ञा समस्तांची । कवी कुशल प्रबंधाची । कथा ऐकावी श्रीक्रुस्णाची । जे पवीत्र आनी परीकार ।। ९ ।। ये कथेचेनी श्रवने । नासती पातके दारुणे । हा भवसींधु तरणे । हेळामात्रे परीयेसा ।। १० ।। जन्मोजयाचीया ब्रह्महत्या । श्रवणेमात्रे नासल्या समस्ता । आती पुनीत होये श्रोता । आणी वकता येव्हडी सामर्थ्यता श्रवणाची ।। ११ ।। हेची कथा स्वर्गभुवनी । राया ईद्राचीये स्थानी । सुत येथामती करुनी । नीरोपण करीतुसे ।। १२ ।। हेची कथा आधोभुवनी । शेषाचीये स्थानी । 'कमळास्वततर वैसोनी । नीरोपण करीतुसे ।। १३ ।। ये कथेचेनी श्रवणे । पातके नाशती दारुणे । आणीकु भवसींधु तरने । हेळामात्रे ।। १४ ।। समाधान होये जीवासीवासी । तुटी पडे जन्म चौऱ्यासी ।

पगी भाव सीध ज्याचा त्यासी । जो कृष्णकथेसी आनुसरे ॥ १५ ॥ आता श्रोता होये सावधान । परीसावे कथेचे आनुसंधान । अैसे करुनी अभीवंदन । कथा लागु चालीला ॥ १६ ॥ महाभारत आठरापर्वे । जे कथीले व्यासदेवे । श्रीकृष्णकीर्तन बरवे । वीस्तारे त्रीभुवणी ॥ १७ ॥ द्वापाराचा आंती । पांडव आसता इंद्रप्रहस्ती । वीचारु करी दुर्मती । दुर्योधनु हस्तनापुरी ॥ १८ ॥ हे सभापर्वीचे नीरोपन । कीजेल मऱ्हाटीया कीर्तन । सभेमाजी दुर्योधन । आणी कौरव बैसले ॥ १९ ॥ कर्णु आणी वीकर्णु । शकुणी आनि दुस्वासनु । आनीक थोर थोर येउनु । सभेमाजी बैसले ॥ २० ॥ सभेसी आले सोमदंतु । आश्वथामा जयद्रथु । भीस्म आनी द्रोणसुतु । यैसे वीर बैसले ॥ २१ ॥ सभा घनवटली अपार । महावीर थोर । ते वेळे दुर्योधन पुसे विचार । तुम्ही आवघी सांगावा ॥ २२ ॥ पांडव गेले इंद्रप्रहस्ता । सुखे नीर्वीघ्न आसता । अैसे वाटे माझीया चीत्ता । जे हेही राजेये धेतीले ॥ २३ ॥ आसीयासी कवण उपावो । दुस्यासणु ह्मणे महाबोला हो । बोलावा मंत्रीयाचा रावो । शकुणी मामा परीयसा ॥ २४ ॥ मग तयासी दुत पाठवीला । येरु लवलाहे पातला । थोर सन्मानें बैसवीला । मग पुसे वीचारु ॥ २५ ॥ ह्मणे जी शकुणी मामा परीयेसा । गेलो होतो पांडवांचीया देशा । आभीनव देखोणीया दशा । आणी आधीकाव करणीचा ॥ २६ ॥ तरी ते जींकीजेती कवणीयेपरी । यैसी बुधी सांगा जी बरवी । जेणें करुनी पांडव वैरी । हाता शाळें येतील ॥ २७ ॥ येरु सांगे वीचारु । बले णातुडे व्रकोदरु । युध करीता आर्जुन वीरु । तोही कवणा नातुडे ॥ २८ ॥ फशे करावे कपट । खेलु खेलावा सारीपाट । तेणें पांडव वीर अदट । आतुडती जुतकर्मी ॥ २९ ॥ धर्मासी वेसन जुतकर्माचे । खेळता खेळ हारवील साचे । सहज केस तुटती आमचे । यैसी माझी प्रतीज्ञा ॥ ३० ॥ सत्ये माणी दुर्योधनु । मनी आती संतोसोनु । परम आल्हादोनु । मग भला भला यैसे गौरवीले ॥ ३१ ॥ मग मणीं संतोसला रावो । वेगी करावा जी उपावो । शकुणी करी लवलाहो । ह्मणे मज येक आठवले ॥ ३२ ॥ खेलु खेलावा नेटाचा । डाव टाकावा गऱ्याचा । अपहार करुनी सर्वस्वाचा । धर्म वाचा गोवीजे ॥ ३३ ॥ वीदरु पाठवीजे पाचारु । परी हा कळो नेदावा वीचारु । अैसा करुनी संप्रधारु । मग बोलाउ पाठवीले ॥ ३४ ॥ वीदुरा जानवीली मातु । येरु लवलाहे नीघतु । स्मरन देवाचे करितु । वेगीं सभा पातला ॥ ३५ ॥ सभेसी भीस्म द्रोन आले । वरुते सन्माने बैसवीले । मग दुर्योधनु बोलीले । वीदुरेसी

परीयेसा ॥ ३६ ॥ ह्मणे बहुत दीवस जाले । परी पांडव आह्मासी नाही भेटले । वीदुरा तुह्मी जाउनी वहीले । त्यांसी बोलाउनी आणावे ॥ ३७॥ सहज भेटती समस्त । धृतराष्ट्र आणी गंगासुत । मागुते जाती इंद्रप्रहस्ता । भेटी घेउनी आमुची ॥ ३८॥ ह्मणोनी वीडा दीधला हाती । येरु नीघे सीघ्रगती । परी बरवे कांहीं न वाटे चीती । मार्गी जाता वीदुरासी ॥ ३९ ॥ ह्मणे कासीयासी बोलाविले । कवन कार्य कुडे रचीले । मग वीदुरा जाणवले । हे हो भले नव्हे ॥ ४० ॥ ह्मणे होणार ते न चुके । जे लीहीले कर्मरेखे । त्यासी आडवे कवन ठाके । मग मौनेची चालीला ॥ ४१ ॥ लंघुणी वने उपवने थोरे । पुढे देखीले पौलीका पागोरे । कळस झळकती आपारे । अमरपुरी यैसी पैं ॥ ४२ ॥ ह्मणे कैसे हो नगर । सर्वसुखाचे सेजार । कीं ब्रह्मवीद्येचे भांडार । फुटले आक्रुर[1] चैतन्ये ॥ ४३ ॥ कीं सर्वही सुखाचे दीसे । मज दावीले क्रुपावेसे । की स्वानुभवाची मानसे । येकवाटली समुदाये ॥ ४४ ॥ की ब्रह्मवृक्षासी फुटले कोंभ । तेणे दाटतसे नभ । तैसे कलस स्वयंभ । आपोआप सोभतसे ॥ ४५ ॥ पूर्वी समुद्रमंथन केले । ते चौदा रत्न प्रसवलें । तेथुनी आमुतबींदु उसळले । ते पसरले भुतळीं ॥ ४६ ॥ तेची बीजकणीका फुटली । तेचि हे भूतळी पसरली । तेची पातकामीसे मीरवली । नानारंगी परीयेसा ॥ ४७ ॥ हेलावतिचीयेनी सीसे । मुल्काची सोभा प्रकासे । वैकुंठीची रचना यैसी तैसें । नगर सोभतसे ॥ ४८ ॥ वैकुंठपुरुपती आत्मसुखा । रचीली हे नगरीका । ते मज मतीमंदा येका । वाचा कवी वर्णवे ॥ ४९ ॥ सोभती राजबीदी राजसा । परी तेथे सात्वीकाचा ठसा । जन चींतीती रुसीकेसा । ह्रदई स्मरण करीताती ॥ ५० ॥ राजस तामस तेथ णाही । नगरी सात्वीकाची पाही । सच्चिदानंद ज्याचा ह्रदई । तेथ दोनी कैची पै ॥ ५१ ॥ जो आमुल्काते मुक्त करी । तो वर्तत असे त्यामाजारी । हरी ज्याचे ह्रदयाभीतरी । ते आनुभवीये जानती ॥ ५२ ॥ मठ मंडप सीवालया । धर्मशाळा बरवीया । पुराणकथा नीत्य जया । वेदध्वनी गर्जती ॥ ५३ ॥ सप्तखणी दामोदरे । पंचखणी मनोहर । ती खणी सुंदरे । दुखणीं तेथे आथीली नाही ॥ ५४ ॥ जरा वार्धक्य नाही । देखा तरुण लोक सर्वही । हरीदास आणी सात्वीक पाही । या वाचुनी आण नेणती ॥ ५५ ॥ आध्यात्मनीष्ठ सर्व जन । त्यांसी नीत्य स्मरण दर्शन । आनुवाच्यं हे वचन । सर्वथा आन नेणती ॥ ५६ ॥ यैसे सुंदर ते नगर । जेथे नांदतसे सारंगधर । बोलेची करावे फार । तरी वेदा न कळेची ॥ ५७ ॥ नदीया तडाग कुप ।

---

१ 'अंकुर' असा शब्द पाहिजे.

बावीया पोखरणी समीप। वृक्षाचे दीसती मंडप। छाया भूमी सोभतसे ॥ ५८ ॥ आसा वीदुर आला इंद्रप्रहस्ता। भेटी जाली पंडुसुता। धर्मा. भीमा कुंती पार्था। आणी लकुळ साहादेवासी ॥ ५९ ॥ द्रुपदी करी नमस्कारु। भावे पुजीला वीदुरु। बहुत केला आदरु। मग सर्वही समाचारु पुसीला ॥ ६० ॥ ह्मणे जी कोणीकडे बीजे केले। बहुत दीवसा सांभाळीले। येर बोलो आदरीले। साहीजने बैसली ॥ ६१ ॥ ह्मणे जी राजा दुर्योधनु। धृतरास्ट्र आणी कर्णु। तुमचे भेटी लागुणु। बहुत उतावील जाले ॥ ६२ ॥ मग मज बोलाउ पाठवीले। याउपरी धर्मे बोलो आदरीले। हे तवं मज न वाटे भले। आठवले वचन व्यासाचें ॥ ६३ ॥ व्यासदेवीं सांगितली णीती। तुह्मी नव जावे हस्तनापुराप्रती। हृदई धरुनी कृष्णमुर्ती। इंद्रप्रहस्तीच राहावे ॥ ६४ ॥ दुस्टाचे मुख न पाहावे। आनी दुर्बुधीसी णातळावे। आधर्मासी स्रवण न करावे। न पाहावे पाप द्रीस्टी ॥ ६५ ॥ उचलोन कोठे नव जावे। असंगसंगती ण बैसावे। वर्म कोन्हाचे न बोलावे। आनी न खेळावे जुतकर्म ॥ ६६ ॥ उतर पैजेचे णोबलावे। हेळण वैरीयाचे न करावे। अधर्मासी नातळावे। यैसे व्यासदेवी सांगीतले ॥ ६७ ॥ ऐकोणी बोलीला वीदुरु। ह्मणे बरवा सांगीतला वींचारु। मग ह्मणे युधीस्टीरु। आणीक वचन अवधारा ॥ ६८ ॥ दुर्योधनाचे संगती। बहुत जालीया वीपती। ते आठवीता चित्ती। बहुत दुख वाटतसे ॥ ६९ ॥ कीती अनुचित बोलावे। कोण कोण दुख आठवावे। तव येरु ह्मणे नोबलावे। णाठवावे वोखटे ॥७०॥ तुह्मासी श्रीहरी रक्षीता। कुंती ह्मणे धर्मा भीमा पार्था। कांहीं न करावी चींता। माणु द्यावा वीदुरासी ॥ ७१ ॥ वेगी रथ पालाणीला। धर्मु बंधुसहीत आरुढला। मणी आदीपुरुष स्मरीला। सेजी द्रौपदी वैसवीली ॥ ७२ ॥ देखा कुंजर मदोन्मत्त। आस्व भूमी नृत्य करीत। दळभार घोश गर्जत। वाद्ये अमीत्य वाजती ॥ ७३ ॥ शंख भेरी मृदंग काहाळा। टाळ घोळ सुर्ती मेळा। क्रुस्णनामाचा येकवेळा। मंगळ तुरे वाजती ॥ ७४ ॥ पताका चामरे ढळती। छेत्रे नानापरी झळकती। डंबर ढाल गगण चुंबीती। भाट वर्णीती परोपरी ॥ ७५ ॥ आमीत्य रथाचे घडघडाट। जवळील वीर सुभट। काळासी करीती कुटपीठ। वीर सुभाट अर्जुनासारीखे ॥ ७६ ॥ यैसा सणेसी परीवारला। धर्मराज हो चालीला। जैसा गगणी सूर्य उगवला। तैसा मीरवला दळभारु ॥ ७७ ॥ वेगी आले हस्तणापुरा। हरुसे जाला (रा)जेस्वरा। मग तो येउण सामोरा। आळींगन दीधली ॥ ७८ ॥ द्रौपदी राउळांगण प्रवेशेली। ते भानुमतीया

आलींगली । सर्वेंची गांधारी भेटली । वहुत हरुशे तयासी ॥ ७९ ॥ बरवे चरणप्रक्षाळण केले । पाचही पांडव पुजीले । राउळांगणामाजी णेले । मग भोजेन सारीली ॥ ८० ॥ कर्पुरेसहीत दीधले वीडे । समस्तासी वेगाडे । जेवादी चंदन कस्तुरीपुडे । परीमळद्रव्ये दीधली ॥ ८१ ॥ वस्त्रे आलंकार अमीत्य । आणीक जांबुनद बहुत । दुर्योधन आसे समर्पीत । पांडवासी परीयेसा ॥ ८२ ॥ मग आमृतवचेने बोलीले । आमुचे भाग्ये उदेले । बहुत दीवसा सांभाळीले । राउळ आले येथवरी ॥ ८३ ॥ यैसा दीवस तो कर्मीला । तवं प्रातकाळ जाला । धर्मे नीत्य नेमु सारीला । तोही आला सभेसी ॥ ८४ ॥ बंधु वेगेसी पातले । सभामंडपी येऊन बैसले । जैसे पांचही सूर्ये उगवले । तैसे देखिले समस्ती ॥ ८५ ॥ कौरव आले लहान थोर । आले पंडूचे कुमर । सोमवौसी महावीर । धर्मचर्चा करीती ॥ ८६ ॥ पाहे द्रीस्टी दुर्योधनु । कपटे बोले हासुनु । ह्मणे आजीचा मोठा दीनु । कैसा वेळ कमावा ॥ ८७ ॥ आळसे आंगमोडे देतु । जांभये करुनी मुख पसरतु ॥ मग तो भीमेसी बोलतु । काही खेळु खेळावा ॥ ८८ ॥ या पां मांडु सारीपाटु । खेळ खेळु नीकटु । येक ह्मणे तु वळीकटु । तुजसी खेळुची नये ॥ ८९ ॥ आह्मी तुह्मी पाहावे । फांसे धर्माहाती टाकावे । येंक ह्मने महाबरवे । परी उत्तर द्यावे नेमाचे । ॥ ९० ॥ येक येक डावासी । नगर पुरे राज्यासी । फासे आणवीले वेगेसी । डावो धर्मासी दीधला ॥ ९१ ॥ पाहा हो कपटी दुर्योधनु । शकुणी मामा दुस्वासनु । कपटी फासे जाने करुणु । तेने डावो जींकीला ॥ ९२ ॥ पहीले दुर्योधने हारवीले । तव भीमे हासो आदरीले । तेणे गगन गर्जीनले । हाक फुटली आकासी ॥ ९३ ॥ मोठ्याने हासे खदखदा । तव येरु चढला वीशादा । शकुणी बैसवीला संवादा । मागुती फासे ढालीले ॥ ९४ ॥ मग धर्मे हारवीले आपार । देस दुर्गे आणी भांडार । रथ रहीवर आणी कुंजर । आळंकार अगणीत ॥ ९५ ॥ अैसा हारी पडीला डावो । मग बोले दुर्योधनुरावो । ह्मणे आंती नेमाचा कोन ठावो । तव धर्मरावो बोलीला ॥ ९६ ॥ ह्मने मज तुवां जींकावे । राज्ये आवघेची तुह्मी करावे । आह्मीं बारा वरुसे जावे । वनवासा ॥ ९७ ॥ आणीक वरुशे तेरावे । नस्टचर्ये गुप्त आसावे । तेथें जरी प्रगटावे । तरी मागुते जावे वनवासा ॥ ९८ ॥ ह्मणोनी डाव टाकीला पाचाचा । फासा ढाळीला कपटाचा । तोही हारवीला साचा ॥ मग उगलीची राहीले ॥ ९९ ॥ कपटफासा पैं टाकीला । जे जे वाचा धर्म बोलीला । तीतुकाही डाव हारवीला । मम शेरीरे वोढवीली ॥ १०० ॥ डाव टाकीला पाचाचा । धर्मा भीमा आर्जुनाचा । लकुल साहादेवाचा । मग द्रौपदी वोढवीली ॥ १०१ ॥

तेही जींकीली दुर्योधने । ह्मने आता काईसे खेळणे । मग खालुती करुनी वदने । पाचही जणे वैसले ॥ १०२ ॥ सकळसभा गजबजीली । मातु राउलगणामाजी गेली । ईतुकी अैकोणीया बोली । भीस्म द्रोन तेथे आले ॥ १०३ ॥ वीदुर आला लवलाही । तवं ते दीने देखीले पाचही । तटस्त सभा राहीली ठाई । कोन्ही कोन्हासी नोबलती ॥ ४ ॥ बाप माया भगवंताची । गती ण कळे कर्माची । मती फीरली त्या धर्माची । हा नवलाव परीयेसा ॥ ५ ॥ तवं दुर्योधन बोलीले । दुस्वासनासी उठवीले । द्रुपदीसी आनवीले । राजसभेमाझारीं ॥ ६ ॥ तवं तो राणवसा पातला । ह्मणे वोहिनी चला चला । दुर्योधणे डाव जींकीला । तुह्मासी धर्मे हारवीले ॥ ७ ॥ अैसे बोले दुस्वासनु । तव संकीत जाले तीयेचे मनु । ह्मणे कर्म बळीवंत येउनु । आड कैसी ठाकीले ॥ ८ ॥ मी वो भीत होते ज्यासी । तेची घडले आह्मासी । कपटे जींकीले पांडवासी । धर्मु भाकेसी गोवीले ॥ ९ ॥ आहो अैका दुस्वासना । तुह्मी तऱ्ही आनीजे मना । सभेसी नेता परांगना । लाज तुह्मा लागेल ॥ १० ॥ मज तेथे कासया णेता । कोण कार्ये सांगा त्वरीता । अहो मी पांडवाची कांता । यैसे नीरुते जानावे ॥ १११ ॥ तुह्मी सोमवौसी राजे थोर । सांडा अभीमान अवीचार । येणे कीर्ती लोकांतर । काय मीरवेल तुमची ॥ ११२ ॥ तुह्मी सीकवीता आणीकासी । परी आनुचीत घडले तुह्मासी । कपटे जींतीले पांडवासी । कोण पुरुशार्थ साधीला ॥ ११३ ॥ पोटी बांधोनी पाशान । अक्षोभजळी तरले कोन । करुणी इंगळाचे अंथरुण । सुख कोण पावला ॥ ११४ ॥ भुजगाचे पुसीं दीधलीया पावो । आणी तया कैचा उरला ठावो । वीचारे सोडवला गवो । तुह्मी बुधी सीकवा ॥ ११५ ॥ दुस्ट कर्मे कवण तरला । कवन काळेसी जयो पावला । वीस घेउनी अमर जालां । यैसे ऐकीले नाही ॥ १६ ॥ येरु ह्मणे तु धीट वो वाजट । किती बोलसी णीकट । सांडी सांडी वो खटपट । ह्मणोनी केसी धरीयेली ॥ ११७ ॥ मग ह्मने गा पुर्वदत्ता । बापरे कर्मा बळीवंता । पंचानन सींव्हाची कांता । कोल्हे कैसे गांजीताती ॥ ११८ ॥ मग दुस्वासने धरुनी पदरी । वोढुणी आणिली बाहेरी । तव ते ह्मने गा श्रीहरी । का कस्टवीसी बा आह्माते ॥ ११९ ॥ मग वींव्हळ जनी माणसी । कंपु सुटला गात्रासी । पवने हाले केली जैसी । आसुपात ढळताती ॥ १२० ॥ पुढें दुस्वासनु अंतरंगे । द्रोपदी येतसे मागमागें । तव ते सभा पातली वेगे । ते कौरवी देखीली ॥ १२१ ॥ हास्य करीती गदारोळ । पाहा हो कैसी हे वेल्हाळ । कैसें सुंदर मुखकमळ । डोळे वीसाळ बरवंट ॥ १२२ ॥ भाळी अर्धचंद्रटीळा । अधर गळे रत्नकीळा ।

नासीकीच्या मुक्ताफळा । उपमा कोण द्यावी ॥ १२३ ॥ दुर्योधन ह्मणे वो सुंदरी । येउन बैसे जानुवरी । इतुकीया अभीळासे उत्तरी । कोपे वन्ही खवळली ॥ १२४ ॥ अरे दुस्टा दुर्जना दुर्योधना । हे काय अले रे तुझीया मना । तु रे परावीया अंगना । पापद्दस्टी पातोसी ॥ २५ ॥ अभीळासीता रे परनारी । तुज कस्ट होतील रे भारी । आरे तु पापीया दुराचारी । काय णीस्टुर बोलीलासी ॥ २६ ॥ तुझीये मांडीवरी बैसो काळु । तुझे द्रुस्टी लागो रे ईगोळु । पडो वीजु न लागता वेळु । डसो काळु जीव्हेसी ॥ २७ ॥ जे मीरवे भीमाकरी । ते कळवली रे नोवरी । ते बैसे तुझीये जानुवरी । तेणें संगें सुख पावसी ॥ २८ ॥ यैसीयें गदेचा घावो । पाहेल तुझीये मांडीचा ठावो । इतुके अैकोणी दुर्योधनरावो । कोपें करुनी खवळला ॥ १२९ ॥ धरा धरा ईस मारा । बहुत बोलीली रे सैरा । वस्त्रें हीरोनी नग्न करा । या भ्रतारा देखत ॥ १३० ॥ बापभक्त काज कैवारी । बोभाये द्रोपदी सुंदरी । क्रुष्णा राख ये आवश्वरी । धावे पावे मजलागी ॥ १३१ ॥ मग तीये अवस्वरी । मनामाजी स्तुती करी । ह्मणे पाव गा श्रीहरी । करुणाघना गोपाळा ॥ ३२ ॥ म्यां जीव्हा करुनी जपमाळी । क्रुस्णनाम ह्रदयेकमळी । मी कोरडी जालीये वनमाळी । आझुनु तु कां न पावसी ॥ ३३ ॥ करीतां पांडवाचे अवलोकन । तव ते देखीले दीनवदन । मग ते नेत्र लाऊन । नानाशब्दी बोभाये ॥ ३४ ॥ ह्मणे क्रुस्णा कमळनयेना । वीस्वव्यापका मनमोहना । अनाथनाथा नारायेणा । अझुनी का न पावसी ॥ ३५ ॥ पाहाता तुझी रे वाट । मनामाजी वाटती कस्ट । तुज कारणे फुटे कंठ । ह्रदये होते दोठाई ॥ ३६ ॥ जयजय क्रुस्णा भगवंताते । कल्पवृक्षे कल्पलते । सच्चीदानंदे पुर्नभगीते । वैकुंठपीठनीवासीनी ॥ ३७ ॥ मुर्तीमात्रें अर्धसहीते । स्फुर्तीमात्रें ब्रह्मचरीते । चैतन्यमात्रे सर्वगते । सर्वे-साक्षी तु क्रुस्णे ॥ ३८ ॥ पीसें आळवी दाही दीशा । सांडुनी देह्याची आशा । तैसी आळवी रुसीकेशा । ह्मणे जगदीशा पाव वेगी ॥ ३९ ॥ धाव धाव यादवराया । सोईरीया बंधु जी सखया । वेगी पावे तु भाईया । झनी वेळ लावीसी ॥ ४० ॥ जासी आनीकाचीया काजा । की आव्हेर करुनी रे माझा । राखे माझी लज्या । आपुली पैजा सांभाळी ॥ ४१ ॥ सखा जीवलग सांगाती । वीतगोत धनसंपती । पाव पाव यैसीये आकांती । झनी वेळ लावीसी ॥ ४२ ॥ तुची माझी बापमाये । गणगोत आत्मा होये । आझुणु तुज का करुणा नये । आगे क्रुस्गे जननीये ॥ ४३ ॥ सुंदरे सावळे डोलसे । क्रस्ण वृंदावननीवासे । योगीमानसराजहंसे । कोठे गुंतलीसी माउलीये ॥ ४४ ॥

कोठे गे तुझा वोरस गेला। कवणे तुझा धावा केला। काये गे माझा वीसर पडीला। तेनेची गुनें जननीये ॥ ४५ ॥ तु भत्काची माउली। की मुनीजनाचीं साउली। तेथेची गे वस्ती केलीं। मग माझें स्मरन नव्हेची ॥ ४६ ॥ की गे भत्काचे हृदई। राहीलीस आनंदाचे डोही। माझा वीसर पडीला गे पाही। तेणेची गुणे जननीये ॥४७॥ राजसभेमाझारी। कौरव जेवीता वो कुसरी। ब्रीडे[२] नीघाले ते आवस्वरी। तै तुझे म्या मुख पाहिले ॥ ४८ ॥ त्या वो समस्ता देखता। भुजा रचीलीया आनंता। लज्या राखीली गोपीनाथा। आता का वेळु लावीसी ॥ ४९ ॥ होसी बंधु रे सोईरा। जतन करीसी उत्तरा। पावे वेगी गा दातारा। करुणाघना मुरारी ॥ ५० ॥ तरी मी पाहो कोणाची वास। कोन पुरवील माझी आस। झनी तु होसी गे उदास। आगे क्रुस्णे जननीये ॥ ५१ ॥ क्रुस्णे क्रुस्णे कमळनयेने। वीस्वव्यापक मनमोहणे। तु पाव वेगे करुणाघने। कोठें गुंतलीस माउलीये ॥ ५२ ॥ अैसी जीवाचीये करुणा। तुज का नये कमळनयेना। नीस्टुर जालासी जगजींवना। का वेगी न पवसी ॥ ५३ ॥ म्या जींव्हा करुनी जपमाळी। तुझे नाम जपतसे हृदयेकमळीं। कोरडी जालीये वनमाळी। आझुनी का न पावसी ॥ ५४ ॥ क्रुस्णा क्रुस्णा जगजीवणा। तु जी क्रुपेच्या नीध्याना। अनाथनाथा नारायेना। आझुनु कां ण पावसी ॥ ५५ ॥ पाहाता तुझी रे वाट। मना होतीं वहु कस्ट। तुजकारने फुटो पाहे कंठ। हृदये होते दो ठाई ॥ ५६ ॥ क्रुस्णा वेगीं न पावसी जरी। प्रान सोडीन झडकरी। ब्रीदे साच करी गा मुरारी। यैसीये संकटी स्वामीया ॥ ५७ ॥ करुणारसे बोभायेली। दीर्घस्वरे नीधी उमटली। तेणे मेदनी थरारीली। खळबळी सुटली समुद्रा ॥ ५८ ॥ करुणाशब्दे अतीसये जाला। तेने उदीले आंतराळा। स्वर्गमृत्य पाताळा। करुणारसे डोलतसे ॥ ५९ ॥ सेव्दु अंतराळी व्यापला। त्रींकुट फोडून आदळला। जेथे श्रीक्रुस्ण होता पहुडला। नीधा उमटला तेथे पैं ॥ ६० ॥ यैसी करुणेची वचने। ते यैकीली जनार्दने। पीतांबर नारायेणे। मुखावरुनी वारीला ॥ ६१ ॥ शेशेशेयनी गोपाळु। पहुडला होता तमाळनीळु। तव अवता करुनाकल्लोळु। क्रुस्णस्रवनी पडलीये ॥ ६२ ॥ भ्रमरपरीयेंकी यादवराणा। होता सुखनीद्रेसी पाहुणा। क्षीरसागरीचीया सुखनीधाना। ते सुख जाने रुक्मीणी ॥ ६३ ॥ देखोनी वैकुंठीची थोरी। तैसीच रचीली द्वारकानगरी। तेथ मदणमुर्ती तो मुरारी।

२ 'द्रौपदीचे ब्रिरडें' हें काव्य पहा

साहेल समुद्र गोपाळु ॥ ६४ ॥ जो गोपीमनसराजहंसु । रुक्मीणीकुमोदीनी-
प्रकासु । जो यादवकुळी दीनेसु । तो परम पुरुशु गोपाळु ॥ ६५ ॥ जो
लावन्येसींधुची लहरी । जो सुखामृताची वोवरी । जे चैतन्येगर्भीची
साजरीं । रत्नकीळा प्रकटलीं ॥ ६६ ॥ जो भुवनकमळकोसळा । जो
कोटीकंदर्प लावण्येपुतळा । जो ब्रह्मांडीची जीवनकळा । तो घनसावळा
गोपाळु ॥ ६७ ॥ जो सनकादिकांचें भत्कीभुसण । जो वैकुंठवासीयाचे
नीधान । जो भत्कजनाचे मंडन । तो आनंदघन गोपाळु ॥ ६८ ॥ जो
भत्कीसुखाची नव्हाळी । जो दीनाची कल्पवेळी । जो योगीयाचा ह्रदयकमळी ।
सुखनीर्वानी राहीला ॥ ६९ ॥ जो चीदाकासीचा मंडपु । जो ब्रह्मसुखाचा
दीपु । जो सुखसागरस्वरुपु । तो योगनिद्रेसी पहुडला ॥ ७० ॥ सुभ्र मुत्काचा
मंचकु । वरी पासोडा क्षीरोदकु । मज पाहता सहस्रमुखु । ते सुख वर्णीता
ठेंगणें ॥ ७१ ॥ धुपे धुपीली वोवरी । परीमळ न माये आंत बाहेरी । जो
मकरंद योगेस्वरीं । सुखसमाधी भोगीजे ॥ ७२ ॥ वरी आरुवारु
सुमनाचे । चांदवा घोस मुत्काफळाचे । माजी दैवत वैकुंठीचे ।
सुखनीद्रेसी पहुडले ॥ ७३ ॥ रुक्मीणी करी चरणसव्हान ।
ह्रदई धरुनीयां ध्यान । येक चरन ह्रदई आळंगुन । दुसरा घेतला
करकमळी ॥ ७४ ॥ पाहे न्याहळुनी नयनी । तव ते वीस्मीत जाली मनी ।
द्रस्टी पाहे जन न्याहळुनीं । तव नखी रुपे दीसती ॥ ७५ ॥ जेवी जळी रुप
पाहे । तव तेथची दीसताहे । तैसे नखी देखोनी पाहे । ह्मणे जीवित्व
माझेयाचेनी ॥ ७६ ॥ कापुरकस्तुरी क्रुस्णागरु । मीस्रीतचंदनमनोहरु ।
मंदमंद लावी करु । ह्रदई ध्यान क्रुस्णाचे ॥ ७७ ॥ रंगे तळहात रंगले ।
तेज आरक्त पै जाले । जे चरनकमळी रातले । मनीमधुकर परीयसा ॥ ७८ ॥
सदाध्यानी स्थीरावली कामीनी । जे वीळासली क्रुस्णचरणी । ध्वजवज्रु
उर्ध्व रेखा देखोनी । पाहे लोचनी तटस्त ॥ ७९ ॥ नारद घेउनी ब्रह्मवीणा ।
करी णामाची गर्जना । ते वीस्रांती कमळनयेना । नादब्रह्मीची राहीला ॥८०॥
वीसेश गायन नारदाचे । भत्की प्रेम संतोशाचे । गातो नाम भगवंताचे ।
ह्रदई ध्यान धरुनीयां ॥ ८१ ॥ सुंदर करी शाम गायने । सप्तस्वरी आणी
मुर्छने । नाना गती वीगुती जाने । येकावीस पडती मुर्कुंडी ॥ ८२ ॥ तेथें
पवन पांगुळला । सुर्य स्वगती वीसरला । चैतन्यरसु मुराला । तो मीळाला
चीदाकासीं ॥ ८३ ॥ थैसे गायेणा स्रुती वेदा । सुखनीद्रा चीदानंदा ।
सच्चीदानंद पूर्णबोधा । त्या नारदा फावलेसे ॥ ८४ ॥ उधवा करी पीतांबरु ।
देवासी जानव्ही तो आवस्वरु । वीजणा घेउनी आक्रुरवीरु । उभा आसे

वामभागी ॥ ८५ ॥ यैसा योगणींद्रेसी होता। तव कानी सब्द पडीला आवचीता। तव पाव आसुडीला नीरुता। तेने रुक्मीन भयाभीत ॥ ८६ ॥ मग उठोनी बैसला आरुवारी। तवं गांजीता देखे द्रुपदी सुंदरी। वेणुदंड आसुडीला करी। दुस्यासने दुर्जने ॥ ८७ ॥ मग लगबग जाली देवासी। बसले सोडीले आवघीयासी। द्रीस्टी न पाहेची गरुडाची। वेगी रुसीकेसी धावीनला ॥ ८८ ॥ गरुडे देखोनी द्रीस्टी। तोही धावे पाठोपाठी। ह्मणे कोन्हाकारणे जगजेठी। आजी मज वीसंबला ॥ ८९ ॥ तव तो उद्वेगे लवलाहे। गरुड मागे धावताहे। लाउनी मणाचे पाये। तन्ही नातुडे गोपाळु ॥ ९० ॥ रुक्मीनी ह्मने नारदासी। काय संकट पडीले देवासी। की धावीले आकांतासी। कोन्या भत्काकारने ॥ ९१ ॥ पाहा हो भत्काची कारने। देवे केले वो धावने। भत्कालागी नारायेने। सगुन रूप धरीयेले ॥ ९२ ॥ भत्कालागी भुलला। ह्मणोनी देव धावीनला। कीं पांडवाचा शब्द अैकीला। देवे कानी अवचीत ॥ ९३ ॥ की ते द्रोपदी सुंदरी। कोन्ही गांजीली दुराचारी। ह्मणोनी धावीनले मुरारी। गरुड पाठीसी टाकुन ॥ ९४ ॥ दडवादडवीं हरी धावतु। तैसाची गरुड मागे मागे येतु। मनाचे पाये लावीतु। परी नातुडे गोपाळा ॥ ९५ ॥ येउनी द्रौपदीजवळी अनंतु। पुढा उभा तीस्टतु। पीतांबर मुखावरी वारितु। द्रौपदीचे परीयेसा ॥ ९६ ॥ ह्मने झणे वस्त्र आसुडीती। धरीली भत्काची काकुलती। ह्मणोनी पीतांबरु श्रीपती। द्रौपदीवरी टाकीला ॥ ९७ ॥ तया पीतांबराचेनी मेळे। क्षीती आंग थरारीले। खेद कंपु उठीले। कंठ दाटला सद्‌दीत ॥ ९८ ॥ मग उघडुनी दोन्ही डोळे। देखे देवाचा पीतांबरु परीमळे। तेणे वीकासली नेत्रकमळे। तव धर्मराज देखीला ॥ ९९ ॥ पांडवी देखीला पीतांबरु। ह्मणती स्वामी पावला सारंगधरु। ते देखोनीया वीदुरु। आस्त्रपात ढळताती ॥ २०० ॥ आणी त्या भीष्मासीही कळले। परी कोन्ही कोन्हासी न बोले। भीमा पार्था जानवले। आणी लकुळ साहादेवासी ॥ २०१ ॥ पुढे पीतांबरु आला। सर्वेची मागे देव उभा ठेला। जेथीचा तेथे प्रगटला। आलींगन दीधली ॥ २ ॥ आला गेला हे भत्की। वाप व्यापकु श्रीपती। कीं ते ह्रदईची ध्यानमुर्ती। तेथचि प्रगटली ॥ ३ ॥ जो आंतर्बाह्य व्यापुनी भुमी। जो राहीला स्थावरजंगमी। ह्मणोनी सेब्द होतसे व्योमी। हा उन्मोसु जयाचा ॥ ४ ॥ परे परते जव पाहे। आनी परेसी व्यापुनी राहे। तो हा पस्यतीस होये। रूपवंतु ॥ ५ ॥ मध्यमे जो वीस्तारु। ज्यापासुनी फुटे सब्दांकुरु। मग शब्दे होउनी साकारु। वैखरीसी ये ॥ ६ ॥

परी तो शब्दातीत परब्रह्मपुतळा । शब्द वागेश्वरी ज्याची कळा । जीवाची जीवनकळा । परी अवघीयातु ॥ ७ ॥ कर्म क्रीया आणी कर्ता । हे आवघी ज्याची सत्ता । हाची वर्नीता वेदांता । परि आनुभवा आकळला ॥ ८ ॥ त्याही दर्शना अगोचरु । ह्मणोनी चालवीती मछरु । परमातमा आपरांपरु । परी भक्तीसी भुलला ॥ ९ ॥ पांडवजन प्रतीपाळकु । येसा नामाचा घोसु । मग तो येउनी यादवकुलटीलकु । आळंगीले समस्तासी ॥ १० ॥ चौभुजी क्रुवाळीली । आवस्थे करुनी कस्टली । कृष्णमेघशामे नीववीली । आमृतद्रीस्टी पाहोनी ॥ ११ ॥ दुर्जनाची द्रीस्टी तांतली । वरी आमृत क्रुस्णवृस्टी जाली । देखोनी मुर्तीते सावळी । मग वीसरली ते दुख ॥ १२ ॥ जैसा ठेवा क्रुपनासी । निधान सापडे अनायासी । मग तो आठवी दरिद्रसी । तैसे द्रौपदीसी पैं जाले ॥ १३ ॥ की प्राक्रुता होये ज्ञानसीधी । की योगी गहे समाधी । वीसरे चीताची आदी । तैसी ते द्रोपदी तटस्त ठेली ॥ १४ ॥ लाउनी उन्मनी टाळी । देहाची आवस्था न संभाळी । तैसी ध्यान हृदयेकमळी । धरुनी राहीली होती ॥ १५ ॥ परी येक नवलाव जाला । देवो थोर वोरसे आला । भक्ता गांजीता देखीला । कुडावा केला तयाचा ॥ १६ ॥ परी देवाचा वोरसु कैसा । मातेसी मीळे वाळ बहुता दीवसा । मग दाटती ते उस्वासा । प्रीती पान्हा थरारी ॥ १७ ॥ की व्याघ्र वछाते पाडी । तेथे धेनु घालीतसे उडी । तैसा देव लवडसवडी । आंग द्रोपदीवरी टाकीले ॥ १८ ॥ तैसा वासुदेव रक्षी भक्ता । कायेसी संसाराची चींता । धर्मा भीमा आनी पार्था । लकुळसहदेव समस्ता । द्रोपदी आदीकरुनी ॥ १९ ॥ द्रोपदी क्रुवालीता देखीली । पार्था आवस्था दुनावली । ते धर्मा भीमासही कळली । नेत्री करुनी वारीला ॥ २० ॥ क्रुस्णजी पावला जानोनी । तटस्त राहीली आंतकरनी । देहभाव वीसरोनी । तल्लीन वृत्ती जालीया ॥ २१ ॥ मग देव तेथे उभा ठेला । तो द्रोपदीये पाठीराखा जाला । तो भक्तीच देखीला । क्रुस्ण माउली भक्ताची ॥ २२ ॥ ज्यावरी देवाची क्रुपा होये । त्याची द्रीस्टी प्रपंची न ऱ्हाये । मग त्यासी संसारअपाये । ते सुखरुप होतील ॥ २३ ॥ ह्मणोनी दुख कौरवांचे । पांडवा मनी नाही साचे । पुढे देखती रुप क्रुस्णाचे । द्रोपदीमागे परीयेसा ॥ २४ ॥ सावळी डोळस मंगल मुर्ती । वाही वाहेवट सोभती । मुखावरी स्वेदकण दाटती । पुस्टी वीरगुंठी सुटली ॥ २५ ॥ कंठी मुक्ताफळाचे हार । गळा वैजयंती मनोहर । सुंदर वेल्हाळ उदर । कौस्तुभ मणी शोभतसे ॥ २६ ॥ रत्नजडीत कंठी मेखळा । वीरकंकणे मुद्रीका नीर्मळा । वाहुदंड भुजा

सरळा । नखे सोज्वळ सोभती ॥२७॥ शेंख चक्र गदा पद्म । मंडित मुर्ती मेघशाम । श्रीवछलांछनाचे पाद उत्तम । हृदई मीरवतसे ॥२८॥ पीतांबराची झळाल । जेवी वीजुचे घनपटल । सुगंध धावतसे परीमळ । दीसे झळाळ रंगाची ॥२९॥ चग्नी तोडर ब्रीदाचा । की तो समुदाव वेदाचा । अवस्वरु देखोनीया सुखाचा । वांकीरुपें गर्जती ॥३०॥ धर्म द्रीस्टी घाली मुखी । भीम माळा अवलोकी । पार्थ चरणी जाला सुखी । ह्मणे उडी वीसेश घालावी ॥३१॥ लकुळ पाहे पीतांबरु । साहादेव अवलोकी सर्वांगसुंदरु । द्रोपदी ह्मणे माझा सोहोदरु । कंठी मिठी घालावी ॥३२॥ यैसा द्रोपदीमागे उभा । घन दाटली कौरवसभा । परी साजीरी क्रुस्णसभा । ते कौरव न देखती ॥३३॥ ज्याची द्रीस्टी असे प्रपंची । तयासी हे क्रुस्णमुर्ती कैंची । गोडी न नेनेती नामाची । मारुप कैसेनी जानती ॥३४॥ मग दुर्योधन कोपला । ह्मणे आझुनी का रे उभा ठेला । येरे नीरीये हात घातला । आसुडीली लवलाही ॥३५॥ आंतील पदरु वेगळा केला । तव भीतरी दुजा देखीला । सुगंध परीमळ घोळला । तोही आसुडीला लवलाहे ॥३६॥ तव भीतरी देखीली पीवळा । पत्रवेलीचा पाटोळा । क्रीमीगी कलहाई काळा नीळा । सुरेख पाटाउ ॥३७॥ धारवट पुतळीयाचा । फुले सेवंती रंगाचा । काला कल्हेरी मेचुचा । पैंदरी मुत्क शोभती ॥३८॥ सोनेसळे आनी कळंबी । गंगासागरी आनी कुसंबी । मुगवी सुरंगे चुबचुबी । रंगाची नक्षेत्रे वरी सुशोभीत ॥३९॥ नवरत्न जाळीयाची । नीखल सुध मुत्काफळाची । येके कनकपत्रवेलीची । शुध नीले जडीयेले ॥४०॥ येक करले गोपालवाणी । चुबचुबीत रंगाचीया खाणी । न कळे वीचीत्र करणी । हस्तलीखीत गोजीरे ॥४१॥ रंगबाहाल्य आती साजती । गरुडरुपे झळकती । दीव्य वस्त्राची पाहाता गती । तेही नीगुती सोभतसे ॥४२॥ वस्त्रे नाना चीत्रीव उमाळे । तैसी नानापगीची पटकुळे । तेही नीघती सोज्वळे । दुर्योधनु भोवडी डोळे । क्रोधे करुनी परीयेसा ॥४३॥ मग तो हुंकारे गर्जतु । दुस्यासनु वस्त्रे आसुडीतु । तव भीतरी क्षीरोदकु देखतु । सुभ्रवर्ण नीर्मळ ॥४४॥ पीवळा लाजव बोटधारी । रत्ने जडीली पदरोपदरी । ह्मनती कैसी बुधीवंत सुंदरी । विस्मो करीती कौरव ॥४५॥ आनीकही आसुडती वस्त्रे । तव गर्भसुती देखती वीचीत्रे । सेलारी संकरे पवीत्रे । तेही आगाध नीघाली ॥४६॥ पातळ पापेचे परीकर । वीचीत्र सुताचे आरुवार । तगटी लखलखीत पदर । तेही अगणीता नीघाली ॥४७॥ मग ते टोकेखर पातळा । बरवे लांब रुद बाहाळा । कस्तुरी

काळे नीळा। वायंबरी गुंजावर्णी ॥ ४९ ॥ चीकवी पोफळीया येकवटा। चीनधारीया धोवटा। येकापरीस येक नीठा। कोन्या पेठा नीफजलीया ॥ ४९ ॥ शुत्ध सुवर्ण ताराची । चीत्रवीचीत्र पुन्याची। आनी मयुर राजहंसाची । पुतलीया झळकती पालवी ॥ ५० ॥ पीत शामवर्ण देखा। सुभ्र कुसुंब्या नाही लेखा । क्रुस्णवर्ग सुध भुमीका। आणी हीरवी तेही पै ॥ ५१ ॥ पदरी लीहीले घोडे शाहाडे । पदराआड पदर पडे। पाउल न दीसे उघडे । मा दुर्जना पाहावया ॥ ५२ ॥ मछ कुर्म वराहाची। नरसींव्ह वामन फरशरामाची। रामलक्षेमन बळीभद्राची । बोध्ये कलंकीची साउली ॥ ५३ ॥ धामधवळा इस्वरु ! पुढे सोभे नंदीकेस्वरु। गणेस सारजा योगेस्वरु । ध्यानी बैसले आसती पै ॥ ५४ ॥ द्रीस्टी झाकुळली सभेची। आप्रकाशे दाटली मने सर्वांची। बुधी कुंठीत जाली सकळांची । ह्रदई सेंके दुर्योधनु ॥ ५५ ॥ यैसा पावला सारंगधरु । द्रौपदीचा केला कैवारु । मग ह्मणती कायेसा वीचारु । आगणीत वस्त्रे नीघाली ॥ ५६ ॥ आवेश न धरवे कौरववीरा । मनी वीचारीती वीचारा । सहस्र भुजाचा वेव्हारा । देता न ह्मणे थोडे ॥ ५७ ॥ देता न ह्मणे लहान थोर। जाले वस्त्रांचे डोंगर। आसुडीत कौरव वीर। पाहाती सभासद साचार तटस्त जाले ॥ ५८ ॥ द्रोपदी पतीव्रता सीरोमणी। सत्वधीर्याची खाणी। सुक्षेमरुप देव येउनी। चरीत्र पाहे तयाचें ॥ ५९ ॥ राजा महीमा नेणे भगवंताचा। वळकळा पर्वत आभीमानाचा। अवेश येतो जी क्रोधाचा। द्रीस्टी आंधळी पै जाली ॥ ६० ॥ काम क्रोध मछर। देव मानवी वीकार। जरी क्रुपा करी यादववीर। तरीच येथुनी परीतीजे ॥ ६१ ॥ दुस्यासनु वस्त्रे आसुडीता। देखे पीतांबरु झळकता। जैसे मेघी वीद्युल्लता। त्याहुनी आधीक झळाला ॥ ६२ ॥ मग नामांकीत सुंदर। साजीरी आती मनोहर। रामक्रुस्ण आपार। माधव नामांकीते ॥ ६३ ॥ काही नारायेन नामाची। अच्युतानंत केसवाची। मुरारी हरी गोविंदाची। सुशोभती वस्त्रे ॥ ६४ ॥ गोपाळ गाई मुर्ती सवंगडे। चतुरभुज अस्टभुज देव्हडे। गोकुळ मथुरा वृंदावने पुढे। यैसी नीघती जाली ॥ ६५ ॥ मग नीघाली आयोध्या नगरी। गोपुरे कलसु सुवर्णहारी। सुंदर दीसती कुसरी। मग द्वारावती नीघाली ॥ ६६ ॥ कैसी नीघती शेंखचक्रनामे । आयोध्या सोभती गदापद्म उत्तमे । ते देखोनीया द्रोण भीस्मे । मग वीदुरा जानवीले ॥ ६७ ॥ तव तो ध्यानस्त होता बैसला। तव भीस्मे सावदु केला। ह्मणे दुस्यासनु भागला । नीरोप द्यावा राहावयाचा ॥ ६८ ॥ भागले

दुस्यासनाचे हात। वस्त्रे जाली असंख्यात। मग दुर्योधन वारीत। पुरे पुरे ह्मगतसे ॥ ६९ ॥ दोन्हीकडे दोन्ही पर्वत। जाली वस्त्रे गगनचुंवीत। भांडारगृहीं ठेवा ह्मनत। तवं तेथे येकही नाही ॥ ७० ॥ मग पतीव्रता आसे बोलत। दुर्योधना देई चीत। फासे आनावे त्वरीत। डाव खेलो मागुता ॥ ७१ ॥ ह्मणेसी तुवां मज की जींकीले। तरी ते कवणाचेनी बोले। माझे म्या जरी हारवीले। तरी तुह्मी यैसे बोलावे ॥ ७२ ॥ मग कपटफासे आणवीले। द्रोपदीया करी घेतले। श्रीक्रुस्ण स्मरोनी ढाळीले। तव तीणे जींकीले ॥ ७३ ॥ आपनाते सोडवीले। धर्मा भीमा वेगळे केले। पार्थासीही तेनेची बोले। आनी लकुळ साहादेवासी ॥ ७४ ॥ सोडवीले पांचा पांडवा। आणीक डाव जव टाकवा। शकुणी ह्मणे कुडावा। ईचा वेगळा आसे ॥ ७५ ॥ मग सकुनी टाकु नेदी डाव। ह्मणे हे जींकील रे सर्व। यैसा नीच्छाय करुनी कौरव। डाव तेही मोडीला ॥ ७६ ॥ मग फासे घेउनी उदकी टाकीले। मग समस्तही उठीले। ह्मणती द्रोपदीया जींकीले। आपेसे घेतले कौरवी ॥ ७७ ॥ यैसे जाले ते आवस्वरी। सत्व राखीले पांडवकुमरी। तयासी सारथी श्रीहरी। ह्मणोनी काही न मानीती ॥ ७८ ॥ उठोनी दुर्योधनु गेला। भीस्मद्रोनही चालीला। अवघीया नीरोप दीधला। मग पांडवही चालीले ॥ ७९ ॥ साही आली चीत्रसाळे। वीकासली नेत्रकमळे। पुढे देखीले रुप सावळे। चतुर्भुज श्रीक्रुस्णाचे ॥ ८० ॥ तनु सावळी मनोहर। चरनी वाकी आनी तोडर। चतुर्वेद श्रृतीसर। वांकी रुसे गर्जती ॥ ८१ ॥ घोटी नीलीयाची गाठी। कुंकुमवर्ण टाचा गोमटी। ईंद्रनील तारा गोमटी। तैस्या पोटरीया सुंदरा ॥ ८२ ॥ ब्रह्म-भुवनीचे स्तंभ। तैसे चरणद्वय स्वयंभ। तेजोन्मय कौस्तुभ। सुरंग रुळती दोहीं बाहीं ॥ ८३ ॥ मुक्तीसी पालवीती कैसे। दोन्ही सुरंग ढळती कैसे। वरी मेखळा कैसी दीसे। जैसी मेघी वीद्युल्लता ॥ ८४ ॥ ब्रह्मसींधुचा आवर्ती। वरी त्रीवेली सुसोभती। मुखमये येक चतुर्भुज आक्रुती। तीन्ही वोघे त्रीभुवनीचे ॥ ८५ ॥ सोभे वक्षेस्थळ वीशाळ। चक्राकार स्थनमंडळ। करीं शंख चक्र गदा कमळ। शुषोभती आयुधे ॥ ८६ ॥ कोकीळा अक्रुती कंठवेल्हाळा। कौस्तुभ वैजयंती माळा। जैसे नभी तेजबंबाळा। शेसी सूर्ये नक्षत्र ॥ ८७ ॥ कुंडले शोभती स्रवनी। जैसे गुरु भार्गव दोन्ही। ते आत्मनीस्ट ह्मणोनी। दोन्ही कर्णी मीरवती ॥ ८८ ॥ जैसे सुनीळ ब्रह्म। ते नेत्रद्वय शुभ्र शाम। तेथे बींबले हे सकळ व्योम। चंद्र सुर्ये नामे प्रकासे ॥ ८९ ॥ सुमनकलीकाप्रकारे। चीताक्रुती धनुस्याकारे। नासापुरे

साजीरी आकारे । दोन्ही भूलता मीरवती ॥ ९० ॥ यावरी औटपीठ गोल्हाट। हेची ब्रह्मभुवनीची वाट । तेजोमय मुकुट । तेजे द्रीस्टी व्याकुळली ॥ ९१ ॥ त्यावरी सुमन मीरवती । वरी भ्रमर रुणझुणतीं । स्वानुभवाची बोध[3] प्रसंगती । तैसे ढळती आनंदे ॥ ९२ ॥ यैसा साकार मनोरम्य । कपोली ढळती स्वेदघर्म । की ते मुल्ककणीका उत्तम । रोमकुपी झळकतसे ॥ ९३ ॥ यैसा स्वेदबींदु कपोळी । टीळकु भ्रसला भाळी । वीरगुंठी पुस्टीवरी मोकली । उटी शोभे आंगीची ॥ ९४ ॥ भक्त क्रुपाद्रीस्टी न्हाह्ाळी । आखंड आसे त्याजवळी । त्यावरी धरुनी साउली । करकमली आपुलेनी ॥ ९५ ॥ यैसा देखोनी भगवंत । पांडवासी ढळती आसूपात । कंठ दाटला सद्गदीत । तेणे वैखरी खुंटली ॥ ९६ ॥ मग धर्मराजा भेटला । भीमे चौभुजी आळंगीला । पार्थे मस्तकु ठेवीला । चरणावरी ॥ ९७ ॥ लकुळ साहादेव दोन्ही । तेही आळंगीले चक्रपाणी । मग मस्तकु कुर्वाळुनी । पुढे द्रोपदी बैसवीली ॥ ९८ ॥ धरुनी हनवटी करी । पुसते जाले श्रीहरी । ह्मणे तु कस्टलीस वो थोरी । ह्मनोनी वेगी धावीनलो ॥ ९९ ॥ येरी ह्मणे बा क्रुस्णनाथा । तुझ्यानी स्मरणे हारीली वेथा । तुजसारखा सारथी आसता । आह्मासी काय संकस्ट ॥ ३०० ॥ क्रुस्णाजी पावलासी लवलाही । वैरीया आपेस दीधला पाही । जगजीवणा तु सर्वा ठाई । परी पांडवांचा वेळाईत ॥ १ ॥ प्रल्हादालागुनी श्रीहरी । स्तंभी प्रकटलासी कैवारी । दैत्य वधीला जानुवरी । तैसा तु श्रीहरी मजलागी ॥ २ ॥ आह्मी दीन दयाळु । आह्मी आर्त तु क्रुपाळु । आह्मी दासे तु स्नेहाळु । जगजीवना जगनाथा ॥ ३ ॥ क्रुस्णाजी नीधान अमुचे । क्रुस्णाजी तु तारु भवार्णवीचे । क्रुस्णाजी जनकु जननी तु आमचे । पुर्वपुन्ये जोडलासी ॥ ४ ॥ सखा सोहदरु कोवसा । तु माये माहेर रुसीकेसा । तो तु स्वामी आह्मासरीसा । कोनास कस्ट वाटती ॥ ५ ॥ मुखी गुननामाची कीर्ती । ह्रदई तु मंगळमुर्ती । तयासी घडे जरी संन्सारवीपत्ती । तरी हे बोलणे अघटीत ॥ ६ ॥ संपत्ती सुखाचा ठेवा । पाहो लाधला त्या पांडवा । परमानंदु नीत्ये नवा । त्या माधवप्रसादे ॥ ७ ॥ तरी त्या संपती की वीपत्ती । त्याच्या सांगाती श्रीपती । त्याची करावया भक्ती । येव्हेडी सेल्की मज कैची ॥ ८ ॥ कोणे तपे वश केला । कोणे रुने क्रुस्ण बांधला । पांडवांचा सनियारा जाहाला । कौसाल्यमल्ल ज्यापासी ॥ ९ ॥ आपुली ब्रीदे साच्च केली ।

३. बोधपर संगती ?

जे जगामाजी आहेती बोलीली । जे क्रुस्णभक्ताची माउली । परी कोवसा पांडवांचा ॥ १० ॥ पांडवांचे सुखावर्णी । येन्हडी कैची प्राकृत वाणी । सुखसागर चींतामणी । त्यासी करें कुरवाळीत ॥ ११ ॥ त्याचा पद्महस्त सीरी । नामे पीकली वैखरी । क्रुस्णचरणचंद्रचकोरी । आमृतपान करीताती ॥ १२ ॥ परी मज नामाचे आर्त । नामा पाठक शरणागत । पुढील रसाळ यैका ग्रंथ । जे कां चरीत्र श्रीक्रुस्णाचे ॥ ३१३ ॥

ईती श्रीमाहाभारते वैशंपायनजन्मोजय संवादे सभापर्वणी वस्त्राहरणकथासमाप्ती ॥

## नामरत्नमाला

श्रीगणेशायनमः ॥ नारद म्हणे हनुमंतासि ॥ बारे येकि कथा परियसिं ॥ भक्ताकारणे हृषिकेसि ॥ निर्गुण गुणवंतु पैं जाहला ॥ १ ॥ महारुषि ब्रह्मज्ञानि । स्वरूपिं राहिले निराभिमानि ॥ देह विदेह कैवल्य करुनि ॥ तेणें चक्रपाणि उत्तिर्ण [1] ॥ २ ॥ तयासी न गति सायास ॥ ते दोघे येरयेरां उदास ॥ परि भक्तिचि मोठि आस ॥ ह्मणउनि रूपवंत पैं जाहला ॥ ३ ॥ न ह्मणे लाहान अथवा थोर ॥ रिघे भक्तांचें घर । आठवि तयाचा उपकार । त्यांचें अळंकारा मिरवितसे ॥ ४ ॥ ऐका नामरत्नमाळा ॥ देवा भक्ताचा सोहळा ॥ परमानंद ब्रह्मपुतळा ॥ ज्यां कारणे अवतारला ॥ ५ ॥ शठ कर्मे आचरतां ॥ तेणे वैराग्य ये हाता ॥ वैराग्य होये तत्वता ॥ ज्ञानसिद्धि परियसा ॥ ६ ॥ आधि वेदांतस्रवण ॥ तेणें उपजे मनन । मग होये निजध्यान । साक्षात्कार स्वरूपि ॥ ७ ॥ जो ज्ञानगंगेसि मिळाला । तो परतोनि नाहि आला ॥ बोध सिंधुसि मिळाला ॥ तो न परतोचि मागुता ॥ ८ ॥ किं लवण जळाचिये परी ॥ जैसि कांहिं नुरेचि गा उरी ॥ किं कर्पुर पडलें अग्निभितरि ॥ तेथें काजळीहि नुरेचि ॥ ९ ॥ परी पंचम पुरुषार्थ हे भक्ति ॥ ते ज्ञानरत्नाते शोभविति ॥ जैसि कोंदणावांचुनि दिप्ति ॥ जेवि रत्नी दिसेना ॥ १० ॥ कौरवांचा आदरु ॥ साण्डूनीया सर्वेश्वरू ॥ भावें पुजिला विदुरु ॥ त्यांचें पुजेसि रात्तला ॥ ११ ॥ न पाहतां उपचारु ॥ नाहि मनाचा आदरु ॥ घरा जाउनि सर्वेश्वरु ॥ भोजन मागे तयासि ॥ १२ ॥ जनकाघरिचि संपत्ति ॥ दिप रत्नाचि महा दिप्ति ॥ उपचाराचि सांगतां गति ॥ अलौलिक पैं केलि ॥ १३ ॥ तेंहि

---

१ संतोशे–पाठ

घेउनियां श्रीपति ।। श्रुत देवांचि धरिलि प्रिति ।। तुळसिपाळा आणि गंगावति ।। त्यांचे पुजेसि रात्तळा ।। १४ ।। गोवळांघरिचें उच्छिष्ट ।। घेतां न मानि त्याचा विट ।। उभा राहोनिया निट [२] ।। त्यांचे करिचें ग्रास श्विकारी ।। १५ ।। त्याचे हातिचिया पाळे माळा ।। श्रिंगार मिरवि आपुल्या गळा ।। नवल भक्तिचि हे लीला ।। त्या परब्रह्मआंगणी ।। १६ ।। पुजा देखोन गोपाळाचि ।। पेंध्याने मांडिली दगडाचि ।। कृष्ण माउलि भक्तांचि ।। त्यांचे पूजेसि रात्तला ।। १७ ।। म्हणउनि भक्ताचा रुणाइतू ।। कल्पिलें मनोरथ पुर्वितू ।। मोक्ष म्हणे मज सांगातु ।। ऐसिया भक्तांचा होवा ।। १८ ।। वैकुण्ठ( राव ) वाटे पाहे ।। कां पां भक्त यथें न ये ।। सायोज्यता वाट पाहे ।। कधिं मिळणि [३] मिळतिल ।। १९ ।। परि त्यास जन्म मरणादि अपाये ।। तेथें भक्त मानिति गा उपाये ।। जें जोडावें देवाचे पाये ।। मग भलतेंचि हो पैं ।। २० ।। जन्मोजन्मि होवा देव ।। ऐसि जयासि परी हाव ।। मग निर्गुण सावेव ।। तयाकारणें प्रकटे ।। २१ ।। न लाजे करितां त्यांचें काज ।। निउन[४] कार्जि नाहि लाज ।। अर्जुनाचा सारथि चतुर्भुज ।। रथ आणि वारू वागवि ।। २२ ।। कोठें योगियाचा सोयरा ।। कोठें कैवल्यगार्भिचा हिरा ।। कोठे पांडवांचा म्हणियारा ।। यज्ञी उच्छिष्ट काढीत ।। २३ ।। म्हणउनि ज्ञानि पंडितु भला ।। तेणे देव मोकळा केला ।। भक्ति भक्तिसि बांधला ।। तेणें पै आला रूपासि ।। २४ ।। पाहा हो देवाचि करणि ।। तें म्या देखिलि आपुला नयनि ।। हनुमंता ऐक चित्त देउनि ।। कथा परियासिं सादर ।। २५ ।। मि वैकुंठिहूनि आलो ।। द्वारकेमाजि प्रवेसलों ।। राउळांगणासि पातलो ।। सभामण्डपु देखिला ।। २६ ।। द्वारि उभा महा विर ।। यादव राजे थोर थोर ।। अश्व रथ आणि कुंजर ।। वरि पताका झळकति ।। २७ ।। महा वाद्याचा गजरु ।। मृदांग वाजति गंभिरु ।। बंदिजन अपारु ।। द्वारीं उभे देव्हडे ।। २८ ।। तेथुनि भित्तरी प्रवेसलो ।। द्वारी उभा गरुड देखिलों ।। नेत्र विकासुनि राहिलों ।। कृष्णमुख पाहवया ।। २९ ।। मण्डपीं सभा दाटलि ।। ब्रह्मादिकांची मांदि मिळाली ।। शंकरासि समाधी लागली ।। जटाजुट पसरीले ।। ३० ।। कर जोडूनि लोकपाल ।। उभे राहिले सकल ।। भितरी सनकादिक निर्मल ।। नेत्र लावुनि बैसले ।। ३१ ।। तेथुनि प्रवेसलों मंदिरी ।। उधव अक्रुर भितरी ।। सोळा सहस्त्र नारी ।। रुक्मिणी आदि करुनि ।। ३२ ।। कर जोडोनिया भक्त उभे ।। मंदिर दाटले

२ धीट—पाठ ३ भक्त—पाठ. ४ न्यून—पाठ

कृष्णप्रभे ॥ देव्हारया चौकि पद्मनाभें ॥ पद्मासन घातलें ॥ ३३ ॥ करी घेउनि जपमाळा ॥ वैसला परब्रह्मपुतळा ॥ नारद जाणवि नादकळा ॥ सानुसान विणयाचि ॥ ३४ ॥ मिहि उभा राहिलो तेथें ॥ पाहावया कृष्णचरित्रातें ॥ तंव कृष्णे लावुनि नेत्रातें ॥ ज्ञानमुद्रेसिं बैसला ॥ ३५ ॥ वाप कृष्णमुखप्रभा साजिरी ॥ कुरुळ रुळति पृष्टिवरी ॥ करुनि पीतांवराचि उत्तरी ॥ पितांवरधारी वैसला ॥ ३६ ॥ अनुपम्य ते रूप ॥ ज्ञानरत्नाचा प्रकाशदीप ॥ किं कोटि चन्द्राचि खोंप ॥ पुर्ण तेजें प्रकाशलि ॥ ३७ ॥ परी तें भक्तांसि सुख जालें ॥ किं तें येकांति सुख सेविले ॥ किं गोपांगनेसिं दिधलें ॥ पुर्ण पियुष दृष्टिचें ॥ ३८ ॥ तया सुखाचे सोहळे ॥ किं विश्रांतिस आले डोळे ॥ आनंदासि तये वेळें ॥ अंकुर फुटले परीयसा ॥ ३९ ॥ कीं भक्तांसी सुख फळलें ॥ किं प्रेमरसें बोधले ॥ किं श्रृंगारवन फुललें ॥ तें रूपा आलें परब्रह्म ॥ ४० ॥ विश्रांतिस विसावा नामाचा ॥ मा कोण वडिमार वर्णु ध्यानाचा ॥ मारूप दखोनि वाचा ॥ काय सुख वर्णावें ॥ ४१ ॥ त्या सुखाचें अधिकारी ॥ ते जाणति तेथिची थोरी ॥ अैसा अनाथनाथ मुरारी ॥ ध्यान विसर्जुनि उठिला ॥ ४२ ॥ मग देव पुजेचा आरंभु ॥ करीति गोपीजन वल्लभु ॥ राजशिरोमणी महाप्रभु ॥ नाना उपचार आणीले ॥ ४३ ॥ धूप दीप परीमळ बहुळ ॥ उदक आणिले निर्मळ ॥ करूनि षोडशोपचार सकळ ॥ अर्ध्य पात्रें ठेविलि ॥ ४४ ॥ पुजा करूनि मुर्तिचि ॥ वाईलि पुष्पांजलि पुष्पाचि ॥ कृष्ण माउलि भक्तांचि । मग दण्डवत घालीतो ॥ ४५ ॥ उपरी करूनियां प्रदक्षिणा ॥ सभे चालिला यादवराणा ॥ उधव अक्रुर दावि खुणा । परस्परें परीयसी ॥ ४६ ॥ समस्त भक्त मिळाले ॥ उधव अक्रुर पुढे केले ॥ कर जोडूनि पुसों लागले ॥ गोविंदासि परियेसा ॥ ४७ ॥ उधव म्हणे जी सारंगधरा ॥ विनंति आमुचि अवधारा ॥ सर्वा जिवाचा तुं सोयरा ॥ कर्त्ता भोक्ता तुंचि सकळ ॥ ४८ ॥ तुं सकळ देवांत मगुटमणि ॥ ब्रह्मादिक तुजपासुनि ॥ लोकपाल लोटांगणि ॥ समस्तदेव वोळगति ॥ ४९ ॥ तुं योगियाचें निजध्यान ॥ तुं समाधिचें संजिवन ॥ तुं भक्त चकोराचें अमृत पान ॥ तुं परम ध्यान भक्ताचें ॥ ५० ॥ तुं वैकुण्ठिचा अळंकारु ॥ तुं कैवल्याचा श्रृंघारु ॥ तुं भक्तकमोदनि अमृतकरु ॥ तुं अळंकारु ज्ञानाचा ॥ ५१ ॥ तुं आर्तिचकोर चन्द्रमा ॥ तुं आनंदलहरीचि सीमा ॥ तुं या जिवाचा परमात्मा ॥ परब्रह्म गा परियेसीं ॥ ५२ ॥ तुं सकळ देवाचें अधिष्ठान ॥ तुं सकळ जीवाचें जीवन ॥ तुं

गुणातित परिपुर्ण ॥ अखण्डरस पैं तुंचि ॥ ५३ ॥ तुं देशकाळा स्वभावा ॥ परी विचारितां नव्हेसि ठावा ॥ अपुर्व वाटे जि देवा ॥ आवघीयासी परीयसि ॥ ५४ ॥ जरी तुं अनुग्रह करीसी ॥ तरी हें गुज सांगावें आम्हांसि ॥ तुवां पुजिले कवणासी ॥ ध्यान केलें कवणाचें ॥ ५५ ॥ तुं सकळ देवासि वंद्यु ॥ तुं सकळ जीवासि अभेदु ॥ तुजहुनि कोण आहे वंद्यु ॥ हे सांगा जि स्वामिया ॥ ५६ ॥ हांसोनि बोलिले चक्रपाणि ॥ परीयसा भक्तशिरोमणी ॥ आवघे जणी यांवें मिळोनी ॥ देवपुजा पाहावया ॥ ५७ ॥ तंव ते भक्त पाचारीले ॥ सनकादिक वेगीं पातले ॥ सनक सनंदन सर्वेचि आले ॥ ऋपि अगणित परियेसा ॥ ५८ ॥ व्यास वसिष्ट भारद्वाज ॥ अत्री अगस्ती तेजपुंज ॥ चित्रगुप्त पक्षिराज ॥ गरुड वेगीं पातला ॥ ५९ ॥ अर्जुनादिक राजे ॥ पाचारीले गरुडध्वजें ॥ पृथकाकारें वर्णिजे ॥ येव्हढे सामर्थ कवणासी ॥ ६० ॥ उधव धरुनिया करी ॥ अवघे आणिले भीतरी ॥ वेगळे देव्हारीया चौकिवरी ॥ कृष्णे करीं रत्नदिप घेतला ॥ ६१ ॥ तंव ते भक्तमंडळि ॥ देवें तयासि दाखविली । उधवापुढें मुर्ति उभि केली ॥ उधवाचि परीयसा ॥ ६२ ॥ पितांबरु असे पांघरविला ॥ कमळमाळि असे पुजिला ॥ सर्वेचि अक्रूर दाखविला ॥ कर जोडुनि उभा असे ॥ ६३ ॥ केलि नारदाचि मुर्ति ॥ तेहिं दाखविली मजप्रति ॥ विणा घेउनियां हातिं । सेजे तुंवर उभा असे ॥ ६४ ॥ ध्रुव प्रल्हाद अंबरुषि ॥ रुखुमांगद भिष्म परीयसीं ॥ विभिषणु पुण्यरासि ॥ हनुमंतेसि दाखविलें ॥ ६५ ॥ महा वैष्णवाचि मंडाळि ॥ शुकसनकादिक चन्द्रमौळी ॥ ब्रह्माशंकर सहस्त्रमेळि ॥ मध्यस्थानि बैसाविले ॥ ६६ ॥ जिवन्मुक्त रुपिज्ञानी ॥ तेहि पुजिले येकस्थानि ॥ अवघ्या भक्तां सीरोमणि ॥ त्या प्रति दाखविलें ॥ ६७ ॥ येरे म्हणति हें काय जी जगन्नाथां ॥ पुसति चरणावरि ठेवुनि माथा । हें गुज सांग गोपिनाथा ॥ आह्माप्रति बोलिजे ॥ ६८ ॥ कृष्ण म्हणे उधवासी ॥ तरी म्या पुजावें कवणासि ॥ कोण देवत आम्हांसी ॥ तुम्हांवांचुनि परीयसा ॥ ६९ ॥ तुम्ही देवपुजा आम्हासि सहजीं ॥ रूपा येणे तुमचा काजीं ॥ तुम्हासि धरुनि हृदयामाजी ॥ अखंड ध्यान करीतसें ॥ ७० ॥ जेहिं मजकारणें त्याग केला ॥ मजकारणें भोग सांडिला ॥ मजकारणें येकांत सेविला ॥ संग धरीला साधुचा ॥ ७१ ॥ मजकारणें जाहले निराशा ॥ सांडीली संसाराची आशा ॥ पाहा पां दिधलें विशाचे ग्रासा ॥ अमृत म्हणुनी घेतलें ॥ ७२ ॥ तो प्रल्हाद अग्निमाजि घातला ॥ परी नाम नाही विसरला ।

बिभिषण शरणागत जाहला ॥ ममता सांडूनि बंधुचि ॥ ७३ ॥ शरीर संपत्ति त्यागु केला ॥ तो हा बळिरावु पूजीला ॥ अद्यापि दारवटां उभा ठेला ॥ तऱ्ही उत्तीर्ण नव्हेचि ॥ ७४ ॥ म्हणउनि ध्यान करितों भक्ताचें ॥ हेंचि कुळदेवत आमुचें ॥ नीत्य स्मरण करीतों त्यांचे ॥ करीं जपमाळा घेउनियां ॥ ७५ ॥ [५] नाहि अपेक्षा कोणाचि ॥ निष्ठा वाणलि सुखाची ॥ संगति धरिली मी त्याचि ॥ म्हणउनि माघे मागे हिंडतु असे ॥ ७६ ॥ जपतप अनुष्ठान ॥ क्रियाकर्म यज्ञदान ॥ पंचाग्नी आणीं धूम्रपान ॥ अन्य अन्य शरण परीयसा ॥ ७७ ॥ उदंड व्रताचिया कोडि ॥ परी श्रवणाचि न य येकि धडी ॥ ऐसि जयाचि आवडी ॥ तयासि घडी न विसंबे ॥ ७८ ॥ म्हणउनि नारदा तुंबरा सांगातें ॥ हे जातिल कवणे पंथे ॥ मिहि हींडेन तेथें ॥ सुख घ्यावया नामाचें ॥ ७९ ॥ माझीया नामाचेंनि भोजे ॥ वैकुण्ठी सोहळा गाजे ॥ यमधर्मासि ( मनी ) उपजे ॥ भेटि घ्यावि भक्ताचि ॥ ८० ॥ त्या भक्तांचें पांइंचें रज ॥ मि म्हणे मज लागो सहज ॥ ऐसे पवित्रपणाचें काज ॥ तयापासुनि इच्छितसे ॥ ८१ ॥ माझीये भक्तिसि भक्त मिळाला ॥ तो तिर्थासि दुर्लभ जाला ॥ तिर्थीं मनामाजीं स्मरीला ॥ पवित्रपणालागुनि ॥ ८२ ॥ भुमिस वैकुण्ठ उत्तरे ॥ सर्वसुख त्यांसिच मोहरे ॥ मजहि लालुप गा उरे ॥ मग रूप धरी उगळाचि ॥ ८३ ॥ नाना परीचिं साधनें ॥ उदंड करिति मजकारणें ॥ परीं माझा नामाचेन कीर्तने ॥ मि सांपडें अनायासें ॥ ८४ ॥ तैसा तिर्थी न सापडें ॥ तैस ध्यानि नातुडे ॥ योगीयांसहिं ना कळे ॥ बहुत उपाये करीतां ॥ ८५ ॥ नसे रविबिंबामाझारी ॥ नसे क्षिरसागराभितरी ॥ नसे शेशाचें अरुवांरीं ॥ हें उधवा निर्धारीं जाण पां ॥ ८६ ॥ उधवा हेंचि जाण पां मनि ॥ साधन नाहि नामाहुनि ॥ माझि मजचि सीराणी ॥ म्हणउनि मागें मागें हिंडतु असें ॥ ८७ ॥ [६] जेथें उछाव नामाचा ॥ तोचि दारवटा मुक्तिचा ॥ ऐसा घोश करीति वाचा ॥ संतसंगति परीयसा ॥ ८८ ॥ [७] तरी मि संतापासी आहे ॥ क्षणभरी वेगळा नव्हे ॥ यहि दोहिं उपाये ॥ मि सांपडे अनायासें ॥ ८९ ॥ तरी ते संत गा कैसे ॥ अनुभवाचे सागर जैसे ॥ त्यांचेन प्रकाशे ॥ विश्व दुमदुमित भरलें ॥ ९० ॥ जें आपुले न सुखें

---

५ टीप पहा.

६ ही ओवी दुसऱ्या प्रतीत नाही.

७ टीप पहा.

निवाले ॥ जे प्रेमरसें वोसंडले ॥ जे विशयसुखापासुनि सुटले ॥ विहंगम जैसे ॥ ९१ ॥ जे माउलिहुनि कनवाळु ॥ जे शब्दाचे स्नेहाळु ॥ जे मनाचे मवाळु ॥ माहानुभवी ॥ ९२ ॥ जे माझेन नामे धाले ॥ माझेन प्रेमे भरले ॥ आणी माझेन रूपिं निवाले ॥ ध्यानि राहिले माझेचि ॥ ९३ ॥ बाहेर मजचि देखति ॥ अंतरी माझीच मुर्ति ॥ मज कारणे सकळ देति ॥ तद्रूप करुनि राहिले ॥ ९४ ॥ देह इन्द्रिये प्राण ॥ मन बुद्धि अहंकार जाण ॥ शब्द स्पर्श रूप रस घ्राण ॥ जेहि मजमागें लाविले ॥ ९५ ॥ माझा नामाचेनि भरीतें ॥ नोळखति आपणातें ॥ विसरोनि देहभावातें ॥ नृत्य करिती सर्वदा ॥ ९६ ॥ नेत्रिं अश्रुचिया धारा ॥ गुढिया आळिया रोमांकुरा ॥ जेणे पवित्र केलें चराचरा ॥ सकळ जीव उद्धरीले ॥ ९७ ॥ त्यांचेनि मज नांव जालें ॥ निराकार आकारासि आलें ॥ चैतन्य हृदई धरिलें ॥ जीवें प्राणें परीयसां ॥ ९८ ॥ मुर्ति करूनि धाकुटी ॥ जेंहि सांटविलि हृदयसंपुटिं ॥ त्यासी म्या आपुलेन जीवें मिठी ॥ घातली कंठीं परीयसा ॥ ९९ ॥ त्यांसि उधवा म्यां काय द्यावें ॥ काशाने उतराई होवे ॥ सद्गदित कण्ठ करुनि देवें ॥ उधवा कण्ठी मिठी घातली ॥ १०० ॥ प्रेमाचा बोरसु आला ॥ उधव अक्रुर आपण्यातें विसरला ॥ बहुत प्रेमें वोसंडला ॥ देहभावा नावेर ॥१०१॥ उधवासि नाहि देहस्मरण ॥ चिदानंदि निवाले मन ॥ भाग्य उधवाचें परिपुर्ण ॥ तें कवणा बोलवेल ॥ १०२ ॥[८] चहुंकरी आलिंगन ॥ करें कुरवाळिलें वदन ॥ आवघ्यां जालें विस्मरण ॥ कृष्णमुर्ति नाचविति ॥ १०३ ॥ येक घालिती लोटांगण ॥ एक देति आलिंगन ॥ येक कृष्ण कृष्ण म्हणुनी वदनी ॥ तटस्थ उभे राहिले ॥ १०४ ॥ नेत्र विकासले रूपासी ॥ कांहि नाठवे तयासी ॥ न कळे कोण भाग्य हृषीकेशी ॥ त्या गोवळामाजि क्रिडत असे ॥ १०५ ॥[८] जय जय करिती गर्जना ॥ कोण आल्हाद भक्तजना ॥ उधव मिठी घातली चरणा ॥ अर्जुन वदन आवलोकी ॥ १०६ ॥ बाप कृष्णमुर्तिचा ठसा ॥ बोतला भक्तां सरीसा ॥ आनंद जाहला महेशा ॥ पांचहि माथे डोलति ॥ १०७ ॥ ब्रह्मादिक लोकपाल ॥ आनंदे जाले भुमंडळ ॥ त्याचेन भाग्ये राउळ ॥ पुर्ण अवतार घेतला ॥ १०८ ॥ यैसी हे आनंदलहरीचि कथा ॥ कीं नामामृत सरीता ॥ नामा पाठकु जवळि होता ॥ त्यासि प्रसाद दीधला ॥ १०९ ॥ नामा दिधलें उदण्ड ॥ पुरविलें मनींचें कोड ॥ जन्मोजन्मि आखण्ड ॥

---

८ दुसऱ्या प्रतीत ही ओवी नाहीं.

हाचि प्रसाद दिधला ॥ ११० ॥ पाठक नामा किंकरवृति ॥ प्रसाद मागे कृष्णाप्रति ॥ मुखि नाम हृदई मुर्ति ॥ संतसंगति मज द्यावि ॥ १११ ॥

॥ इति श्री नामरत्नमाला ग्रंथ संपूर्ण ॥

॥ हें पुस्तक गिरिधर नृसिंह म्हरकारा वेळांगुडी. कोळडातिर उत्तर कावेरी. शुभ मस्तु ॥

## हनुमंतगरुडआख्यान

ॐ नमो जी गणनायका । परमपुरुशार्थफळदायका । ख्वान सींधु मति विवेका । तु बोधकता गणाधिशा ॥ १ ॥ विघ्नावरी परम कोपा । चिदानंदा चित्स्वरुपा । मजवरी करिसी कृपा । कवित्व सुरसता तेणें होये ॥ २ ॥ तुझिये कृपेचि ठेवि । हे मज प्रतक्ष करूनि द्यावि । कथा सुरस चालवावि । तु गोसावि गणाधिसा ॥ ३ ॥ तुझेनि प्रसादें कृस्णकथा । परमार्थ दृष्टि ब्रह्म बोधकता । भत्कसिंधुतारुसरिता । नाउका[1] सर्वथा कृस्णनाम ॥ ४ ॥ ऐका द्वापारिचि कथा । भेटि कृस्णा आणि हनुमंता । रामरुपें भेटि भक्ता । आळिंगने निमाले ॥ ५ ॥ नमु जगदंबा जगदाधारि । जे परा पस्यति मध्यमा वैखरी । जे जिवनकळा चराचरि । ते योगेस्वरि सेविजे ॥ ६ ॥ कुंडलिणि आदिमाता । तीणें करू ठेविला माझिये माथां । तेणें प्रसादे कृस्णकथा । दिधला सौरसु ॥ ७ ॥ तु हंसवाहिनी आदिमाता । आता चाळवावि हे कृस्णकथा । पियुशापरिस गौल्यता । पाहाता फिकें अमृत ॥ ८ ॥ यैसि नमिलि ते सारजा । निर्विघ्नकर्ति विश्वबीजा । ते कवित्वा साहे जालि सहजा । अभय ठेउनी ॥ ९ ॥ नमन श्रिगुरुचिया चरणा । अच्युता अनंता जि परिपूर्णा । जय जय स्वामि रघुनंदना । तु या मना बोधविता ॥ १० ॥ तु कवित्वसागरिचें तारु । तु शब्दसिंधुचा पैलपारु । तुझा मस्तकीं अभय करू । तेणे संसारु तरोन हा ॥ ११ ॥ आता नमु तो श्रोता । जो परम पात्र जी परमार्थी । ज्याचेनि नामे संसारवेथा । नव्हे सर्वथा प्राणियासि ॥ १२ ॥ जो शब्दसिंधुचे तारु । मंथुनि घेतलेंसे अपारु । जे कां लाहान अक्षर थोरु । दोशदृष्टि न ठेविजे ॥ १३ ॥ तरि कोन्हे यके अवश्वरि । हनुमंतु होता दक्षणसागरिं । तेथें नारदमुनि ब्रह्मच्यारि । हिंडत हिंडतु पैं आला ॥ १४ ॥ जालि भेटि आलिंगणे । नारदु पुजियला तेणें । म्हणे

---

१ नौका

जी तुमचेनि दरुशणें। सनाथ जालो स्वामियां ॥ १५ ॥ म्हणौनि चरणि ठेविला माथा। पुन्ये जोडलासि समर्था। मग नारदु जाला पुसता। हनुमंतासि कुशल ॥ १६ ॥ म्हणे सुखिया आहेसि हनुमंता। कांहिं करितोसि रामकथा। यरु म्हणे जी रुसिनाथा। हे जिवन तुमचें ॥ १७ ॥ जालि महंतेंसि भेटि। तेथें आणिक कायश्या गोष्टि। नाम वाचे हृदयसंपुष्टि। सदा ध्यान रामाचें ॥ १८ ॥ दीनें तरावि महितळीं। म्हणौनि वास ये भूमंडळी। ब्रह्मविणा करकमळी। हृदयेकमळी रघुनाथु ॥ १९ ॥ घडे संतासि सनेधान। दरुशणें होय अनुसंधान। नाममात्रें पापदहन। भवतारण संत पैं ॥ २० ॥ तिथें पवित्र होईजे। काळें सुधत्व पाविजे। तात्काळ हरिचरणि राहिजे। सत्स्छंगति परियशा ॥ २१ ॥ तुमचें बोलावया महिमान। वाचेसि पडे मौन्य। तुह्मि तरि साधुसंत सज्जन। ह्मणौनि चरण धरियले ॥ २२ ॥ राम वैकुंठासि पैं गेला। बहुत काळ जि क्रमला। आतां उद्वेग्न जि मनुजाला। चित न ऱ्हाय जि आसनिं ॥ २३ ॥ कांहीं सांगा जि उपावो। मग बोलला मुनिरावो। रघुनाथकथा आनंदडोहो। कथा अमृतवोघ पैं ॥ २४ ॥ तेथें हनुमंता देई गा बुडी। हृदई श्रिराम न सोडि। तुटति संसार कोडि। हेचि जोडि जन्माचि ॥ २५ ॥ जऱ्हीं जिवनमुक्त जाला। तऱ्हीं हरिकथेसि स्थिरावला। जऱ्ही त्रैलोक्यासि पावन जाला। तऱ्ही तिर्थासि भजतो पैं ॥ २६ ॥ तेथे संताचें दरुशण तत्वबोध गा परिपूर्ण। तेंचि श्रीरामाचें अनुसंधान। आनंद वाटे यौगियां ॥ २७ ॥ वेगिं निघावे येथुनी। तिथें पाहावि मेदिनि। इतुके बोलोनि नारदमुनि। मग अंतरीक्षे निघाला ॥ २८ ॥ ब्रह्मविणियाचेनि छेंदें। रघुनाथ नामाचेनि अह्लादें। परम आनंदें। द्वारकेसि पातला ॥ २९ ॥ भेटि जालि गोपिनाथा। पुजिलें नारद जिवन्मुक्ता। मग पुसिलि वेवस्ता। नारदासि हरिनें ॥ ३० ॥ सांगे वैकुंठ कैलास। सत्यलोकिचा समावेश। अमरावति स्वर्गवास। मृत्यलोक सांगितला ॥ ३१ ॥ वनें उपवनें तिर्थे। रुषिआश्रमें पवित्रें। परि माहाविश्रांतिचि स्थळें जेथें। श्वेतबंधु देखिला ॥ ३२ ॥ तेथे निजगडा निजभक्तु। रघुनाथध्याने हो नेमस्तु। माहाविर तो हनुमंतु। जो दुत या श्रिरामाचा ॥ ३३ ॥ तो भेटला माहातिर्थी। काय सांगो त्याचि भक्ति। अखंड रघुनाथ ज्याचा चित्तिं। विश्रांतिस पात्र पैं ॥ ३४ ॥ तो आला करावया तिर्थे। इकडे येवो पाहा तो पश्चिमपथें। इतुके आईकोनि गोपिनाथें। बहुत आर्त बोलिजे ॥ ३५ ॥ ह्मणे यैसियाचें दरुशण। केव्हां होईल गा ब्रह्मनंदना। तैंच मनोरथ पूर्ण जाणा। यैसे सज्जन भेटति ॥ ३६ ॥ कीं त्याचि भेटि व्होवि। कीं जिवें निंबलोण उतरावि। यैसें बोलोनि

कृस्णदेवि । नारदा कंठिं मिठि घातली ॥ ३७ ॥ असो येरिकडे हनुमंतु । निघाला तिर्थे हिंडत हिंडतु । कावेरि दक्षण मथुरा पाहातु । श्रिपाटणासि पैं आला ॥ ३८ ॥ द्राविड देषिचि तिर्थे । माहापुन्य हो पवित्रें । इतुकिं करुनिया हनुमंतें । मग पश्चिमे पंथें मुरडला ॥ ३९ ॥ कृस्णा भिमा गोदावरि । जन्मस्थान ब्रह्मगिरि । तापि नर्मदा वेदावति । मग महिसि पातला ॥ ४० ॥ तेथे करुनिया स्नान । हृदई रघुनाथस्मरण । करिता जाला ध्यान । तव द्वारकाभुवन देखिलें ॥ ४१ ॥ देखे नगरि सोनियाचि । गति खुंटलि डोळियाचि । हाव न पुरे मनाचि । जे मुक्तिचि देवता ॥ ४२ ॥ ध्वजा पताका अंबरिं । वाद्यें वाजति गजरीं । मृदांग आणि शंखभेरि । देवदुंदुभी लागलिया ॥ ४३ ॥ अवघि सुवर्णाचि गोपुरें । रत्नें माणिकें जडियले हिरे । ते मागावया दुसरें । उपमा न दिसे आणिका ॥ ४४ ॥ कोटि सुर्ये उगवले । तैसेचि तेजें शोभले । लाजोनिया परतले । अस्तमाना जाताति ॥ ४५ ॥ चंद्रकिर्णिचि प्रभा । तेहि न पवेचि शोभा । तेजे जे व्यापुनिया नभा । जैस्या विदुलता लवताति ॥ ४६ ॥ किं प्रुथ्विचें तेज साचलें । ते द्वारकेसि उमटलें । तें हे परब्रह्म अवतरलें । कृस्णरुपें पर्येसा ॥ ४७ ॥ किं ते योगियाचें निजलक्ष । सटचक्रें भेदुनिया मुख्य । सहश्र दळ अलक्ष । जे परमलक्ष योगियांचें ॥ ४८ ॥ जे शब्दरस्मिचें घर । जें उन्मनिचें माहेर । किं सत्राविचे क्षिर । जे जिव्हार योगेश्वराचें ॥ ४९ ॥ ते पाहावया दृष्टि । माहासुखासी पडे मिठि । तेथोनि परतोनिया तुठि । पाहावया दुसरें ॥ ५० ॥ उपमा द्यावि जि आणिका । तरी यव्हडी कैंचि अलोलिका । कि ते क्षिराब्धिच्या सुखा । अंकुरलें मेदिनि ॥ ५१ ॥ द्यावि वैकुंठिचि उपमा । तरि जेथें श्रिकृस्ण परमात्मा । घ्यावया भक्ताचा प्रेमा । तो ये भुवनि उतरळा ॥ ५२ ॥ हाट हाटवटिया चोखटा । कुंकमे मिरविलिया वाटा । रत्नखचित दारवटा । द्वारपाळ बैसले असेति ॥ ५३ ॥ रत्नें माणिकें वैदूर्यें । पाड नाहि तया नगरि । तेथें वैकुंठ राजा मुरारि । अधिष्ठाण धरियलें ॥ ५४ ॥ मज पाहाता द्वारके । यौगे बाणला कौतुकें । किं परमानंदाचेनि सुखें । परम अलहाद होतसे ॥ ५५ ॥ भारें पृथवि दाटलि । कीं वैकुंठासी सेरण गेली । ह्मणौनियां सुख पावलि । कृस्णचरणिचें परियेसा ॥ ५६ ॥ नेणवे प्रौढि भक्ताचि । उजरि जालि दैवाचि । महिमा बोलावि सुखाचि । तरि वाचेचि वळे बोबडि ॥ ५७ ॥ यैसे कृस्णनगर देखोनि हनुमंत विर । हृदई आनंद जाला थोर । देखे विचित्र तरुवर । फळि पुष्पि दाटले ॥ ५८ ॥ गेला सागराचिया तिरा । वंदन केलें रुषेश्वरा । देखोनियां विचित्र वानरा ।

माहा अपुर्व वाटलें ॥ ५९ ॥ कपि पुसे तयांसि । काय नांव या नगरासि । काय नांव या तिर्थासि । कोण राजा नांदतो ॥ ६० ॥ बोल कोवले यैकोनि । शंतोशले माहामुनि । अगा तिर्थ हे मेदिनि । चक्रातिर्थ परियेसा ॥ ६१ ॥ नगरा नांव द्वारावति । पैल महातिर्थ गोमति । स्नाने केलिया पापें हरति । आणि श्रिपति राज्यधरु ॥ ६२ ॥ मग तो स्नान करुनिया तिर्थी । आनंदला कपिपति । तैसाचि गेला वनाप्रति । फळे भोजन करावया ॥ ६३ ॥ वेघोनि हालवी तरुवर । तव ते हाकिती वनकर । पाहा हो धिट कैसें वानर । ह्मणोनि करें दाखविति ॥ ६४ ॥ तव तो उडाणें करितु । वृक्षें वृक्ष आंदोलितु । कौतुकें फळें असे टाकितु । वनकरावरी परियसा ॥ ६५ ॥ तव ते ह्मणति रे वानरा । धावो नको सैरावैरा । ठाउकें होईल राजकुमरा । मग राजया जाणविति ॥ ६६ ॥ तयासि पुसे हनुमंतु । कोण राजा असे नांदतु । तव ते ह्मणति विख्यातु । राम कृस्ण परियसा ॥ ६७ ॥ मग हनुमंत ह्मणे तयासि । काय भलतेंचि रे बरळसि । येकु राम सुर्येवंसि । दुसरा राम कैचा ॥ ६८ ॥ मग ते ह्मणति गा कपिपति । परियसि वचन यथोत्कि । श्रीकृस्ण वैकुंठपति । राम जेस्ट बंधु कृस्णाचा ॥ ६९ ॥ बहु तयाचा पराक्रमु । केला पृथ्विचा आक्रमु । सांगता याचा क्षत्रधर्मु । तरि अरिराये अंकणा ॥ ७० ॥ निपातु केला दैत्याचा । राजा जाण सोमवंसिचा । छेपन कोडी यादवाचा । मुगुटमणि परियसा ॥ ७१ ॥ तयाचि वनें पुष्पयाति। तु हिंडतोसि कपिपति । अवघ्या विसंचिल्या वनस्पति । वृक्षें वृक्ष हालविले ॥ ७२ ॥ वेगि निघावे बाहेरि । ह्मणौनि धरियला पदरि । येरें आसडूनि वरिच्यावरि । भूमिवरि लोटिला ॥ ७३ ॥ अरे बनकरा धिटा । कैचा रामु रे लंपटा । सोकलेति आपुलिया पोटा । ह्मणौनि काकुलति बोलत असा ॥ ७४ ॥ करितां माझ्या रामाचें स्मरण । गणिकेसि आले रे विमान । सिळेसि लागताचि चरण । ते निजभुवन पावलि ॥ ७५ ॥ तो रामु स्वामि माझा । दुसरा रामु येथे रे कैचा । तव ते ह्मणति स्वामि मर्कटांचा । आह्मीहि आयकिला हो तो ॥ ७६ ॥ आयिकोनि तयाचें उत्तर । रागे वाढिनला वानर । उभारिले लोमांकुर । मिसिया ताव पसरले ॥ ७७ ॥ वळिलि पुच्छाचि दोर्दंडि । रागें नभ्वरें[२] तोडि । वळिलिं भोवयांचि मुरुकुंडि । नाकाचि बोंडि श्वेत जालि ॥ ७८ ॥ देखोनि भयानक वानरा । पळ सुटला वनकरा । वेगि पातले नगरद्वारा । सांगावया कृस्णासी ॥ ७९ ॥ असो येरिकडे कृष्णनाथु ।

---

२ नभ्वरे ?

निजमंदिरिं नित्य धर्मु चालवितु । परमात्मा तोचि कृष्णनाथु । पुजा करितु देवांचि ॥ ८० ॥ अग्नहोत्रादिक कर्मे । नित्यदान मनोधर्मे । गोदानादि भूमिदाने संभ्रमे । सालंकृतें दिधली ॥ ८१ ॥ देवकि रोहिणि वडिलें । देवें तयासि वंदन केले । येरि आसिर्वाद दिधले । विजई होई श्रिकृस्णजि ॥ ८२ ॥ वस्त्रें भुशणें अलंकार । लेववितिं उधव आणि अक्रुर । कासे कासिला पितांवर । वरि मेखळा रत्नाचि ॥ ८३ ॥ रत्नें झळकति मुगुटिं । कौस्तुभ येकावलि गोमटि । पदक हिरियाचि दाटि । वरि सोभति मुत्क-माळा ॥ ८४ ॥ कमळमाळा वैजयंति । मधे पदक शोभति । तुळसि मंजरि मिर्वति । दोहि कार्णि परियसा ॥ ८५ ॥ सुख लावण्याचि खाणि । पुरविति त्रिभुवणिचि आईणि । मदन संकला लाजोनि । उदरासि पैं आला ॥ ८६ ॥ उपमा द्यावि जरि चंद्राचि । तेथें गति दिसे कळंकाचि । उपमा द्यावया कृस्णमुखाचि । मज तो कांहि न दिसे ॥ ८७ ॥ त्रिभुवनिचि लावण्येकळा । तो हा कृस्ण घनसावळा । अवघिया सुंदरपणाचा येकवेळा । नवल लिळा अभिनव ॥ ८८ ॥ सुरतरु सुमनें विरगुंठि । रत्नें झळकति मुगुटिं । कोटि सूर्ये दाटोदाटि । येके वेळा उगवले ॥ ८९ ॥ प्रभा सांगावि तेजाचि । किं शोभा वर्णावि लेणियाचि । महिमा वर्णिता श्रिमुखाचि । मज तो काहिं न दिसे ॥ ९० ॥ नासिक सरळें तो सुंदर । जैसि चापेकळिका मनोहर । मुख्ये सुंदर्याचे माहेर । मन्म(थ)स्तान जयाचें ॥ ९१ ॥ अनुपम्ये ते दंतपंक्ति । हिरेकणियां लखलखिती । तेथें दंतपंक्ति हारि दिसती । तेणें शोभति मुखसोभा ॥ ९२ ॥ माणिकांचि नवल परि । हिरे झळकताति त्यावरि । मज पाहातां त्या श्रिहरि । कोणे तर्पे अनुसरिजे ॥ ९३ ॥ करांबुजाचि साउलि । यौगिजनवृंदे निवालि । का अभयवरदें जालि । शरणागत आणि भक्त ॥ ९४ ॥ उधव अक्रुर अंगळग । लेवविति लेणें चांग । यौगिमुनिजनभ्रुंग । पदकमळिं झेंपावति ॥ ९५ ॥ वांकि नेपुराचे निनादें । चरणि राहेलि योगवृंदें । अति मकरंदे आणि अल्हादें । तेणें आनंदें निवालें ॥ ९६ ॥ सुरवर रुळति तयावरि । मज पाहाता यैसियाचि परि । भागलेति ह्मणौनि त्या श्रीहरि । आपुल्या पालवें पुसितो ॥ ९७ ॥ भारें प्रुथ्वि दाटलि । ते वैकुंठा शेरण गेलि । ह्मणौनिया सुख पावलि । कृस्णचरणि परियसा ॥ ९८ ॥ सरश्रे[3] गोपिकांचा मंदिरिं । निच नवा सोहळा मुरारि । आणि सोळा सहस्र नारि । वास पाहाति

३ सहश्रे ?

श्रिमुखाच्चि ॥ ९९ ॥ न लगता पात्या पातें । डोळा त्या कामिनी पाहाति रूपातें । तव कृस्ण ह्मणे उधवातें । येक अपुर्व परियसा ॥ १०० ॥ आजि प्रात:काळापासुनी । आनंद वाटे अंतकर्णि । काय सुभ होईल ह्मणौनि । तयाप्रति पुसिलें ॥ १०१ ॥ नेत्र उजवा लवतु । वाहुदंड असे स्फुरतु । उजवा अंक स्थरारितु । अल्हादु वाटतु मानसा ॥ २ ॥ दिसा दिसति सोज्वळा । उजळा आणि निर्मळा । स्फुराण येता वक्षस्थळा । कोण आलिंगन देईल ॥ ३ ॥ ह्मणति कृस्णा जि कृपाघना । मंगळमूर्ति जगनिधाना । जय जय स्वामि रघुनंदना । कोणा भक्तातें निववििस ॥ ४ ॥ कोण सदेव होईल । कोणाचें भाग्ये उमटेल । कोणावरि कृपामृत वरुशैल । तो सुख पावेल दैवाचा ॥ ५ ॥ असो कल्पदृमाचा तळवटि । यादवसभा घनदाटि । रत्नखचित मंडपि । छेपन कोडि वैसले ॥ ६ ॥ वाद्यें लागलि निश्याणें । शंखभेरी माहात्राणें । वैष्णव करितति गायेनें । जयजयकारें गर्जति ॥ ७ ॥ ब्रह्मण्ये देव गोपाळु । ब्राह्मणभक्त भक्तवत्छळु । आडकाठि द्वारपाळु । न घालिति येत्या ब्राह्मणा ॥ ८ ॥ सनकादिक सनत्कुमार । मुख्ये वसिष्ठ रुशेश्वर । कृस्णभेटिस अतुर । नेत्र चकोर पैं जाले ॥ ९ ॥ मंगळध्वनि मंत्रघोश । विमानि दाटले आकाश । कृस्ण दिनमणिचि पाहाति वास । नात्रिं नेत्र विकाशले ॥ १० ॥ छेत्रकार उभे माहाद्वारि । कनकदंड चौरिकारि । भार रचिले महाविरि । ते माहाद्वारि सोभति ॥ ११ ॥ वंदिजन गुण वर्णितां । श्रवणसमाधि होय निजभक्तां । तव येता देखिलें गोपिनाथा । अंजुळी वोढविति ॥ १२ ॥ जय जय हाचि शब्दु जाला । सगुणासि आनंदु देखिला । दुंदुभिचा येक नाद हो लागला । सुरयंद्रु वरुशता होय ॥ १३ ॥ उग्रसेना अभिवंदन केलें । समस्ता रुसेश्वरासि आलिंगन दिधलें । जिवनमुक्तासि जिवन जालें । पद लाधलें निष्ठेचें ॥ १४ ॥ किं ते भक्ताचि माउली । त्रिविध तापाचि साउली । दृष्टि भक्तांलागि घाली । आलिंगन द्यावया ॥ १५ ॥ कि तें दृष्टिस अमृत वरुपलें । कि ते भक्तजनासि सुख जालें । ह्मणौनि श्रिमुख देखिले । साधन जाले उपासकां ॥ १६ ॥ सिंहासनि कृस्णनाथु । नारद तुंबर गाणि गर्जतु । करि ब्रह्मविणा वाहातु । ब्रह्मसुख परियसा ॥ १७ ॥ नामध्वनि हरिकिर्तन । कि ते विश्रांतिचे स्थान । कि ते परमानंदाचे जिवन । आनंदमय संतांचें ॥ १८ ॥ सांडुनिया रविमंडळ । तजिला क्षिराब्दिसागर केवळ । सोडूनि वैकुंठ नीज राउळ । आणि हरिकीर्तनि तिस्टतु ॥ १९ ॥ यैकोनि सभा निवालि । त्यागा भुक्ति मुक्ती पैं जालि । प्रेमें उत्फुलें पैं आलि । सकोमळें मानसा ॥ २० ॥ तव ते

आले कृस्णकुमर । प्रद्युन्म सात्विक माहाविर । रुषी गंधर्व अपार । बळि-देवासहित पातले ॥ २१ ॥ मंडपि गरुड उभा । पाखि बाहोबले न माय सभा । कृस्णकोंदणिचा गाभा । कर जोडोनि न्याहालितु ॥ २२ ॥ तवं ते आले बनकर । भितरि सांगो गेले हेर । मग ते बोलाउनिया सामोर । त्यासी वृत्तांतु पुसिला ॥ २३ ॥ पुसती काय जालि रे वेवस्ता । तव ते ह्मणति गोपिनाथा । अपुर्व परिसा जि अनंता । येक अभिनव पातले ॥ २४ ॥ वानर आले वनात । काय सांगो जि तयाचि मात । आट केला जि वनात । आणि बनकरासि परियसा ॥ २५ ॥ तेणे आह्मासि पुसियलें । कोण राजा नांदे यैसें ह्मणतिलें । आम्ही तयासी सांगितलें । रामकृस्ण नांदति ॥ २६ ॥ मग तो म्हणे आह्मासी । काय भलतेंचि रे बरळसि । यकु रामु सुर्येवंसि ॥ दुसरा रामु रे कैचा ॥ २७ ॥ आम्ही सांगितलि किर्ति । परि तो नाइकेचि कपिपति । नाम सांडा कि युद्धाप्रति । जा तयासि बोलावा ॥ २८ ॥ आह्मी गेलो सांगावया । तव तो नावरेचि स्वामियां । आमुचे वचन यैकोनियां । रागें कपि कांपतु ॥ २९ ॥ यैकोनि रामाचें नांव । आह्मासि मारावयाचि धरिलिसे हाव । अवघियांवरि घालु पाहे कव । तव तो आकार्सि लागला ॥ ३० ॥ मग सांगावया आलो द्वारा । नवल परियसा जि सारंगधरा । युधि पाहा तो वानरा । कोन्हा विरासि तो नातुडे ॥ ३१ ॥ यैकोनि बनकराचि मातु । विस्मित जाला कुस्णनाथु । ह्मणे येकले वानर तुह्मि बहुतु । काय ख्याति सांगता ॥ ३२ ॥ तव ते ह्मणति श्रिपति । काय सांगावि त्याचि ख्याति । येकलाचि दिसे तयाचि सक्ति । परम अद्भुत देखिलि ॥ ३३ ॥ तयासि जरि भांडावें । तरी आपुलिया जिवित्वासि मुकावें । माहाद्वारा कोणें यावें । सांगावया स्वामियां ॥ ३४ ॥ नवल जालें रुषिकेसि । येकलें वानर आलें बनासि । इतुकें असता बनकरासि । केवि वनासि विध्वंसिलें ॥ ३५ ॥ तव पुढा गरुड गर्वरासि । पंखि बहुबलें न माय आकार्सि । गर्व जाणोनिया रुसिकेसि । तयाप्रति बोलिला ॥ ३६ ॥ अगा गरुडा माहाविरा । अरे तु समरंगणि परम धिरा । वेगि जावें गा गरुडा । तयासि धरुणि आणावें ॥ ३७ ॥ तु दैत्यदळ-भंजनु । तु अरिरायासि पंचाननु । येकळाचि येसि घेउनु । कि दुसरा नेसि सांगातें ॥ ३८ ॥ तंव तो जोडूनि दोन्ही कर । स्मामि परिसा जि उत्तर । येकलें धरुनि आणिता जि वानर । काय पुरुशार्थ वर्णावा ॥ ३९ ॥ केव्हडा असेल त्याचा केवा । तेथें दुसरा काय करावा । येकलाचि धरुनि आणीन वानरा । मोठें युध्य मांडलें ॥ ४० ॥ केन्हडि असेल त्याचि सक्ति । जितुचि धरुनि आणिन तुह्माप्रति । भला भला ह्मणोनि श्रीपति ।

त्यासि विडा दिधला ॥ ४१ ॥ येरु मस्तक ठेवि कृस्णचरणा । ह्मणे आज्ञा द्यावि जि कमळनयना । वेगि जात्ये गा गरुडोत्तमा । त्यासि धरुनि आणावें ॥ ४२ ॥ तव तो पाखाचा धुंदकारि गर्जेतु । गगनि उपरमला पक्ष पसरितु । हेळण करुनियां मनांतु । ह्मणे काय श्रिपतिनें सांगितलें ॥४३॥ यैसा नगराबाहेरी आला । बनामध्यें प्रवेशला । तव तो सन्मुख वानरु देखिला । फळे झेलितु आकासीं ॥ ४४ ॥ मग पक्षि ह्मणे तयासि । ह्मणे तु कोण रे आहेसि । आट केला बनकरासि । आणि वनासि विध्वैंसिले ॥ ४५ ॥ वानरा थोर अन्याय केला । बनकरासि पळ सोडिला । सकळांहि फळांचा संव्हार केला । आणि बैसलासि आझुणि ॥ ४६ ॥ आता परतोनि माझेकडे पाहे । सत्वर उठोनि जाये । नाहि तरि थोर अपाये । माझेनि संगे पावसि ॥ ४७ ॥ सामउपचारें न वंचता । दुख पावसि रे तत्वता । आंगि आदळलियां परम वेथा । मग उठोनि जासिल ॥ ४८ ॥ परतोनि पाहे हनुमंतु । तु कोण रे धीटपणे बोल बोलतु । बहुत अससि रे वाजटु । तु नांव सांग आपुलें ॥४९॥ तवं गरुड बोले गर्वरासि । माझे नांव का रे नेणसि । कास्यपसुत परियसि । आणि दुत होय श्रिकृस्णाचा ॥ ५० ॥ जयाचा धाकु रे दैत्यासि । आणि पळ सुटला रे पनंकासि । ज्याचा धाकु रे सेपासि । तो पाताळि रिघाला ॥ ५१ ॥ छेपन कोटि वसुंधरा । जेणे उचलिलि फणिमंडळा । तोहि गेला रे पाताळा । स्याहाणउ कुळें घेउनियां ॥ ५२ ॥ जो त्रैलोक्याचा नाथु । विश्वव्यापकु आणि समर्थु । तो मि पुष्टिवरि वाहातु । केला निपातु दैत्याचा ॥ ५३ ॥ किति पुससि रे मज । तुज येथे यावया कोण काज । तुला पाठविलें कोणें (आज ?)। हें सांग मजप्रति ॥ ५४ ॥ मागुता हनुमंत हासें बोलतु । तुझे यथार्थ नांव सांग ह्मणतु । तव तो ह्मणे विख्यातु । सुपर्ण यैसें बोलिजे ॥ ५५ ॥ कोन्हि ह्मणति पक्षिविर । वरि माझें नाम गरुड । माझा स्वामि तो गोपिराज । गरुडध्वज नाम सारि ॥ ५६ ॥ तवं हांसोनी हनुमंतु बोलिला । नवल विरु मोठा आला । यैसिया धिटपणाचिया बोला । कोण मान देईल ॥५७॥ मग बोले हनुमंतु विरु । भला भला गा बोल बोलसि धीरु । नुसताचि बोलसि बडिवारु । काय सांगसि वाउगा ॥ ५८ ॥ जो सांगे आपुलि किर्ति । तो जाणावा मुर्खमति । नामसारि हे गति । तो विरु पैं नव्हे ॥ ५९ ॥ धर्मयश तिर्थु । बालविद्या आणि पुरुशार्थु । हे जो आपुलेनि मुखें वदतु । तेचि हाणि तयासि ॥ ६० ॥ यैक म्हणसि रे बोल लटिका । तरि धर्म यश फुका । आणि वंचला परलोका । यैसे

मुखें नोबलावें ॥ ६१ ॥ जिंतणे मोडणे हे क्षिति । अवधि जाण रे काळगति । तरि नाम सांगावे तुज मुर्खाप्रति । हे अनुचित जाण पां ॥ ६२ ॥ यैसा शब्दाचा वज्रघाई । हृदय खडतरले पाहिं । यैसे उणें बोलिलासि काई । वर्म पाहि नोबलावें ॥ ६३ ॥ भला तोचि रे जाण । नोबले कोन्हाचे न्यून्य । आता वाचवि रे आपुले प्राण । नाहितरि शरण मज येई ॥ ६४ ॥ मोटि सुटका रे तोंडाळा । धरुनि नेईन गोलांगुळा । बहुत बोलसि रे बरळा । तुज फाटा फुटलासे ॥ ६५ ॥ कोप आला पक्षिविरा । नेत्र भोंवडितसे गरगरां । हनुमंत म्हणे गा पाखिरा । वाया किति जल्पसि ॥ ६६ ॥ यैसें हेळणें शब्दाचें । वचन यैकोनि हनुमंताचें । रागें बळ केलें पाखाचें । तयावरि चालिला ॥ ६७ ॥ गगनि माहानादु जाला । सिंहनादे गर्जिनला । परम कोपें उडाला । गगनपंथें परियसा ॥ ६८ ॥ कोपें भोवोन आकळि । बाह्यां भुजा दंडें कवळि । क्रोधें येउनियां जवळि । हनुमंतावरि लोटला ॥ ६९ ॥ चंड चाचुचि पावि झडपितु । परि ते न मनिचि हनुमंतु । जैसा भ्रमर गुंजारतु । परि पर्वतु न ढळे ॥ ७० ॥ यैसा जाला खिदक्षिण । मग हास्ये करि पवनाचा नंदन । मग कव घातलि धावोन । दोहि चरण धरियला ॥ ७१ ॥ धरिला उफराटा आकासिं । येरु चुंचुपुटे पसरिला कैसि । बहुत केला कासाविसि । उदरि स्वास न सामाये ॥ ७२ ॥ मिचकावित नेत्रपाति । मुख पसरि काकुलति । मग भोवंडोनि दिसाप्रति । आणि उदकिं टाकियेला ॥ ७३ ॥ साटि सहस्र यौजनें दुरि । गरुड टाकिला ते अवस्वरिं । बहुत समुद्राचा लहरि । अति कासाविस होतसे ॥ ७४ ॥ दिसा न कळति गगनि गरुडासि । आंधारि पडिलि नेत्रांसि । ह्मणे काय जाले जि रुसिकेसि । कां कोपलासि स्वामियां ॥ ७५ ॥ क्रुस्णा क्रुस्णा हे वदनिं । का कोपलासि चक्रपाणि । केधवा स्वामि देखेन नयनिं । नाहि तरि हाणि जिवित्वासि ॥ ७६ ॥ आता या अंधकारापासुनि । केधवा नेसि मज उचलुनि । दृष्टि असावि तुझिया चरणि । तु गा जननि आणि जनकु ॥ ७७ ॥ म्यां असावे तुझ्या वोसंगा । येव्हडा निशेध केला कां गा । अनाथनाथा श्रीरंगा । आतां अंगिकारावे मज दिनाते ॥ ७८ ॥ तु भक्तजनकरुणाकर । सारंगधर कौसालमल । जानोन गरुडाचा अहंकार । केला अंगिकार भक्ताचा ॥ ७९ ॥ गर्वे देवासि वंचले । वय विद्या अभिमान गेलें । ते मृत्युसि सापडिलें । आधिन जाले संसारा ॥ ८० ॥ असो यैसिया गुरुड उमजला । दिसा अवलोकु लागला । मग तेजाचा झळाल पडिला । तेणें उडाला आकासिं ॥ ८१ ॥ उडतां होय कासाविस । उदरि न माय श्वासोश्वास । आला समुद्राचा तिरास । परि न पाहे वास कपिचि ॥ ८२ ॥

ऐसा आला नगराभितरि । प्रवेशला महाद्वारिं । वस्त्रें भुशणें ते अवश्वरिं । आंगावरि विसंचलिं ॥ ८३ ॥ लोळणि महाद्वारिं । सुधि नाहि गा सेरिरिं । प्राण व्याकुळ ते अवश्वरिं । मग मुरारितें जाणविति ॥ ८४ ॥ दुतिं लवलाहिं उचलिला । नेउन कृस्णाचिया चरणावरि घातला । चहुभुजि कुरवाळिला । मग जाला सावधान ॥ ८५ ॥ ह्मणे जय जय जी परम पुरुशा । बहुत कष्टविलें सर्वेशा । यव्हडे निर्वाण रुसिकेशा । कोन्हि भक्ताचे न पाहावे ॥ ८६ ॥ अनाथ येसिं ब्रिदें । हे तव आहेति जि प्रसिधें । तुझिया नामाचेनि प्रसादें । जिवासि चवण वळण जि दातारा ॥ ८७ ॥ तो तु आजि जालासि उदास । अव्हेरिलें मज दिनास । मग बोलिला परमपुरुश । गरुडाप्रति परियसा ॥ ८८ ॥ काय बोलतोसि रे पक्षेंद्रा । किं हाससि कोण्या मुद्रा । तुझेनि बळें न मनु ईंद्रा । आणि सुरगणा देवासि ॥ ८९ ॥ तुझेनि बळें समुद्राकांठिं । कोन्हातें नानु दृष्टि । तो तु पराभविलासि ये श्रृष्टि । वानरविरें रे कैसा ॥ ९० ॥ जेव्हां साकडें पडे आह्मा । तें तुज सागो गरुडोतमा । कीं धाडिलासि निनू कामा । ह्मणौनि आह्मा हाससि ॥ ९१ ॥ येरु ह्मणे देवा मुगुटमणि । का उबगलासि सारंगपाणि । मग अधोमुख करुनि । नेत्रि उदक डळमळि ॥ ९२ ॥ गरुडा तुं भक्तकाजकैवारि । ना भि ना भि गरुडा भय न धरी । मग आश्वासिला आपुला करिं । आणि श्रीहरिनें पुसिलें ॥ ९३ ॥ ह्मणे काय जाला रे समाचार । सांगता होय पक्षिविर । ह्मणे तो नर कि वानर । हा निर्धारु कळेना जि स्वामियां ॥ ९४ ॥ पाहाता त्याचा जि पराक्रमु । मज तो वाटे बहुत श्रमु । येसा कोण असेल विराचा विरधर्मु । तो त्यासि संग्रामि जिंकेल ॥ ९५ ॥ मज पाहाता होईल काळु । रागें तरि अग्निचा कल्लोळु । गरुडासि ह्मणे गा गोपाळु । काय बोल बोलतोसि ॥ ९६ ॥ हास्यें विस्मित कृस्णराणा । नारदासि दाखवितो खुणा । तव तो विनोदें करुनी जाणा । हरुशें सेंडि कांडोळितु ॥ ९७ ॥ ह्मणे जि कृस्णा कृपानिधि । बहुत त्याचि दिसताहे तामस बुद्धि । ह्मणे नाम सांडा कां युद्धि । मजासि तुह्मि यावें ॥ ९८ ॥ हासोनि बोले चक्रपाणि । कैसे साकडे मांडले येचि क्षणि । आम्हासि गरुडाचें बळ होते जाणोनि । त्याचेंहिं सत्व भंगिलें ॥ ९९ ॥ दादोजि काय करावा विचारु । कैसेनि टळेल तो वानरु । येसे बोलोनि सर्वेश्वरु । मग मौनचि राहिला ॥ २०० ॥ यैकोनि बोले बळिदेव विर । त्याचा कायेसा जि बडिवार । निमिश्यार्ध न भरतां वानर । धरुनि येथें आनिन ॥ १ ॥ काय साकडे पडिलें तुह्मां । मोठा विर ह्मणौनि भय दाखविसि आम्हां । हें काय सांगसि

गरुडोत्तमा । बहुत पुरुशार्थं वानिसि ॥ २ ॥ जित धरुनि आणिन त्या वानरा । का सतचुर्ण करीन मुशळधारा । यैसा कोप आला बळिदेव विरा । जैसा रुद्र कोपे ॥ ३ ॥ किं ईंद्र आसडू स्वर्गिंहुनी । धनुश्ये करावया लागुनी । किं स्वर्ग आनु धरणि । नेउनी पाताळिं घालुं ॥ ४ ॥ तेथें कायसे गोलांगुळ । काय धरिला नामाचा छेळ । केव्हडे असेल त्याचे बळ । येका विरासि नुपरे ॥ ५ ॥ यैकोनि बडिवार नामाचा । प्रद्युम्नु बोले वाचा । पाहो पराक्रमु तयाचा । आणि विराचा भरवसा ॥ ६ ॥ येकलें वानर तें काये । त्यासी इतुका लागला कां उपाये । निमिश्यार्धं न भरतां पाहे । तयासि धरुनि आणिन ॥ ७ ॥ केव्हडें असेल त्याचें बळ । काय धरिल नामाचें छळ । येकलाचि धरूनि आणिन गोलांगुळ । येसें प्रद्युम्न बोलिला ॥ ८ ॥ यैकोनि पुत्रांच्या बोलासि । हासोन बोले रुषिकेसि । जा रे सकळिक यादवेसिं । धरुनि तयांसी आणावें ॥ ९ ॥ तव निघाले क्रुस्णकुमर । प्रद्युम्न आणि सात्विक विर । शस्त्रें घेतलि जि अपार । सिंहनादे गर्जति ॥ १० ॥ धनुश्य बाण वोडण खड्गीं । मुद्गलाचिया परवडी । माहाविर चालिले प्रोढि । भूमि धणानि चालता ॥ ११ ॥ नवल रचना त्या भाराचि । किं गति वर्णावि तेजाचि । किं शोभा सांगावि लेणियांचि । तरि हा ग्रंथ नावरे ॥ १२ ॥ यैसे नगराबाहेरि आले । समस्त लोक पाहो ठेले । येक मंदिरीं उभे राहीले । कौतुक पाहातातिं नर नारि ॥ १३ ॥ यैसे आले समुद्रतिरा । तव हनुमंत देखति पाठिमोरा । जांभया देता मुख पसरि करकरा । नेत्र उन्मळित लावले ॥ १४ ॥ भुजा देंड असे कवळितु । करें पाठि असे कुरवाळितु । परतोनि विराकडे असे पाहातु । जांभया देतु कडकडां ॥ १५ ॥ देखुनि अवेस तयाचा । प्रद्युम्न बोले वाचा । पाहे पराक्रम या विराचा । आणि भुजाचा भरवसा ॥ १६ ॥ पाहे पां विराचि खंदळि । नाम सारुनि मांडिलि फळि । तु आपणा ह्मणवितोसि माहाबळी । तरि सन्मुख उभा राहे ॥ १७ ॥ नाम सांडवितोसि रामाचें । मोठें बळ धिट-पणाचें । तरि नगर देखसि आजि यमाचें । जे मुक्तिचे माहेर ॥ १८ ॥ हासोनि हनुमंतु बोलिला । नवल विर मोठा आला । यैसिया धिटपणाच्या बोला । कोण मान देईल ॥ १९ ॥ विरु यैसे जेणे बोलावें । तरि तुज काय चाड नांवे । नाम सारुनि यावें । युध्ये करावें पाडाचे ॥ २० ॥ तव क्रुस्णाचा नंदनु । माझें नाम रे प्रद्युम्नु । मि अरिराया पंचाननु । यैक पुरुशार्थ पितयाचा ॥ २१ ॥ बाळपणीचि किर्ति । दैत्य मारिले नेणों किति । शेरणागतां तरि भूपति । आपुलें करुनि स्थापिलें ॥ २२ ॥ काग बग पुतना ।

दैत्य आघासुर जाणा । वत्स्थासुर दैत्य जाणा । त्रुणावर्तहि मारिला ॥ २३ ॥ ख्याति केलि रे गोकुळि । नंदायेशोदेचा राउळि । नित्य सन सोहळा दिवाळि । येणें वनमाळिने भोगिलें ॥ २४ ॥ सवेंचि मथुरेचा पावाडा । तेथें केला मालखडा । चानुर मुष्टिक धडपुडा । कौंसासहिं मारिलें ॥ २५ ॥ उग्रसेनासि स्थापिलें । मायबापासि सुख दिधलें । जरासंदासि पराभविलें । आणि वधिलें काळयैनासी ॥ २६ ॥ मुक्तिक्षेत्र द्वारकापुरि । क्रुस्णे रचिलि क्षणाभितरि । भोमासुर वधुनियां नारि । सोळा सहस्र प्रणिलिया ॥ २७ ॥ आमुचि माता रुक्मिणी । ते आणिलि कौंडण्येपुरिहुनि । सिसुपाळासि अपेस देउनि । हिरोनी आणिले ते देखा ॥ २८ ॥ तैस्याचि आणिली सातजणि । आणिल्या सैवरि जिंकोनी । पांडव शरणांगत ह्मणौनि । राजि स्तापिले तेहिं ॥ २९ ॥ येकि येकि सांगतां किर्ति । तरि लेहता न पुरे गुणसृष्टि । यैसि किर्ति वर्णिता हिंपुटि । शेष सहस्रमुखे पैं जाला ॥ ३० ॥ तयाचे कुमर आह्मि जाण । तव हास्य करि पवनाचा नंदन । का रे आलेति इतुके जण । वायाचि मरण पावाल ॥ ३१ ॥ पितयाचे नांवें जि जे । हा मोठा पुरुषार्थ बोलिजे । बोलता माझें मनहि लाजे । तुमसि युध्य करावया ॥ ३२ ॥ तुह्मि आलेति हें जाणोनि । खंति करितिल तुमाचिया जननि । घरासि जारे या पुसोनि । मग मी नांव सांगेन ॥ ३३ ॥ तवं बोले महाविरु । तु वानर रे वनचरु । आता साहे माझा सरु । धनुसि बाण लाविला ॥ ३४ ॥ सणासणा सुटति बाण । माहातेजाचे दारुण । अवघे व्यापिलें गगन । कैसें संधान मांडलें ॥ ३५ ॥ ठाण मांडूनि माहेस्वरि । बाण सुटति पर्जण्येधारि । कोपे करुनि माहामारि । जैसा रुद्र कोपला ॥ ३६ ॥ धनुश्याहुनि सुटति सर । अग्नितेजाचे प्रचंड थोर । परि तो न मनिच हो वानर । शस्त्रा अस्त्रि वरुशति ॥ ३७ ॥ पर्वत खंडि नाहाणिजे । तेणेंहि काहिं दुख न मनिजे । तैसेचि क्रुस्णकुमरि देखिजे । ते न मनिजे हनुमंतें ॥ ३८ ॥ मग माव करुनियां हनुमंतु । कैसे पुंस असे पसरितु । लांबोनि आले द्वारकेआंतु । तें अवघे विरि देखिले ॥ ३९ ॥ ह्मणति सापडला । येक ह्मणति बोढा कि वहिला । अवघिया विरि गजर केला । दाटोदाटि झोंब्रति ॥ ४० ॥ नवल हनुमंतें करुनि । पुंस आसिं वाउनि । येकेचि वेळां उचलुनि । ह्मणे मी वदनी घालिन ॥ ४१ ॥ ह्मणौनि मुख पसरिलें । रुप विक्राळवाणें केलें । तैसेच आकासिं लाविलें । मग दात खादले करकरां ॥ ४२ ॥ विरि झांकिले डोळे । चरण जाताति बिबळे । कैसे सापडलों येक वेळे । या वानरासि खावया ॥ ४३ ॥ काळरुपि वानरु

आला । कि यमे येथें प्रेरिला । तयाचा ग्रास करु मांडिला । प्रळयो जाला
थोर आह्मां ॥ ४४ ॥ आता काय करावें । कि सांडवलो यशश्रि दैवें ।
किं सांडिलो देवाधिदेवें । ह्मणौनि वानरें प्रळयो मांडिला ॥ ४५ ॥ हा वानर
नव्हे साचार । दिसे मृत्युचें माहेर । अवघिया यादवांचे मरण साचार । पैं आलें
॥ ४६ ॥ का आह्मि पुरुशार्थ केला । गर्वाचा अभिमान धरियला । ह्मणौनि
जगद्बंधु कोपला । वानरवेशें परियसा ॥ ४७ ॥ वानराचि शक्ति तवं नव्हे ।
निर्वाण विचारलें केशवें । धांव घेतलि आमुच्यानि दैवें । ह्मणौनि वानर येथें आला ।
॥ ४८ ॥ आता हा भक्षिल समस्तांसि । काये विचारु करावा मानसिं । कैसे
रक्षावें प्राणासि । येकमेकासि बोलति ॥ ४९ ॥ हें देखोनि पवनाचा सुतु ।
मनि आश्चिर्ये असे करितु । ह्मणे तुह्मि बळवंत तरि बहुतु । का निवांत राहिलेति
॥ ५० ॥ बरवें केलें सदासिवें । कि पाठविलेति राघवें । मज भक्षावया
अवघे । देवें येथे पाठविलेति ॥ ५१ ॥ ऐसें बोलोनि आश्चीर्ये करि मनि ।
आक्रंदतील तुमच्या जननी । आकांत होईल द्वारकाभुवनिं । परम खेद
पावतिल ॥ ५२ ॥ समस्ती विरिं झाकिले डोळे । कोन्हि कोन्हासि न बोले ।
प्राण वाचवा रे येके वेळे । कृस्णचरणकमळें पाहावया ॥ ५३ ॥ वाचेचि
वळली बोबडि । येक समुद्रीं टाकिति उडी । मग पुसें भोवंडुनिया बापुडीं ।
अवघिं समुद्रिं बुडवितु ॥ ५४ ॥ उभे राहोनियां काठेंसिं । करें हेलकावितसे
कैसि । बहुत केलिं कासाविसि । मग रुसिकेसि स्मरिला ॥ ५५ ॥ बाप
सामर्थें कृस्णनामाचें । क्लेश गेलें यादवांचें । परि मुख न पाहाति वानराचें ।
भय धरुनि परियसा ॥ ५६ ॥ ऐसें आले नगराभितरि । प्रवेशले माहाद्वारिं ।
प्राणव्याकुळ शेरिरिं । मग मुरारिसि जाणविले ॥ ५७ ॥ चांचरि जाति
प्रुथविवरि । सकळहि व्याकुळ सेरिरिं । वस्त्रें अभरणें ते अवश्वरिं ।
आंगावरि विसंचलिं ॥ ५८ ॥ तवं यादव सामा देखोनि । अवघे आले
अधोमुख वदनिं । ह्मणति कृस्णराया मुगुटमणि । सिंहासनि बैसलासे ॥५९॥
हास्यें विस्मित सुंदर । नयेन विकासले उदार । कमळमाळा मनोहर । वरि
वैजयंति साजिरि ॥ ६० ॥ चंद्र जैसा तारागणिं । सोभा पावतसे गगनिं ।
किं कोवळा किरणिं । जैसा तरणि मिरवला ॥ ६१ ॥ किं श्रिकृस्णमुखासि
साम्यें । उपमे न दिसे समान । हें सुखसंपतिचें साधन । योगेश्वरिं जाणिजे
॥ ६२ ॥ द्रुष्टि पडिलि कुमराचि । जालि ममता मनाचि । काजलि गेली
अभिमानाची । कृस्णदरुशणें परियसा ॥ ६३ ॥ धावोनि आले लोटांगणि ।
माथा रुळविला कृस्णचरणि । ह्मणति श्वामि चक्रपाणि । क्षेमा करावें
स्वामियां ॥ ६४ ॥ आह्मी सर्व अपराधि ऐसे । लागलें अभिमानाचें पिसें ।

मग हृदईं धरुनि रुषिकेषें । आश्वासिले कुमरासीं ॥ ६५ ॥ मग तयांसि मातु । पुसता होय जगंनाथु । समस्त सांगति वृतांतु । कृस्णाप्रति परियसा ॥ ६६ ॥ ह्मणति जि कृस्णराया । ह्मणौनि पुत्र लागति पायां । वहुत कस्टलों जि स्वामियां । यादवराया परियसि ॥ ६७ ॥ नेणो जि काय आहे । हा तो वानर नोव्हे । वहुत केलि जि उपायें । परि तो नावरेचि स्वामियां ॥ ६८ ॥ बळें किं पुरुषार्थ वर्णावां । किं रूपें भयानकु सांगावा । अभिनव पातले जि देवा । हें कोणासि जाणवैल ॥ ६९ ॥ हाश्यें विस्मित कुस्ण राणा । नारदासि दावितसे खुणा । तव तो विनोदे करुनि जाणा । हरुश्यें सेंडि कांडोळितु ॥ ७० ॥ ह्मणति श्वामि चक्रपाणि । अवघे पडिलों होतों त्याचा वदनि । मग वोले नारदमुनी । बाळिदेवेंसी परियसा ॥ ७१ ॥ मग बोले नारदु । का येसा जी नामाचा छेंदु । हा तव वानर अगाधु । युध्ये करितां नावरे ॥ ७२ ॥ हा जुझारु रामअवतारिचा । वहुत जि पराक्रमु याचा । राजा मारिला लंकेचा । आणि श्रिरामाचा निजभक्त ॥ ७३ ॥ जानकीचि सुधि केलि । त्रिकुट लंका जाळिलि । अठरा कोटि वानर येणे रक्षिली । दुर्ग करुनि पृत्छाचें ॥ ७४ ॥ शक्ति लागलि लक्ष्मणा । तैं हा धाविन्नला माहावनां । सुर्यें न घालिता किरणा । द्रोणाद्रि आणिला ॥ ७५ ॥ बळिवंतु आणि तापसु । मोहावीरु आणि सुर्येवौंसु । यैसा कोण असेल जि पुरुशु । तो यासि संग्रामि जिकेल ॥ ७६ ॥ मग बोले हळधरु । यैसियासि काय करावा विचारु । मग बोले रुश्येश्वरु । हे सारंगधरु जाणे ॥ ७७ ॥ मग बोले गोपिनाथु । येक करावा जि येकांतु । जेणें वानर तो अद्भुतु । राहे यैसे करावे ॥ ७८ ॥ काहि कौशाल करावे । हे रुप पालटावें । आणि तयाप्रति दाखवावें । संपादावें कार्ये ॥ ७९ ॥ तरि तुह्मि नारदमुनि । सत्यभामेसि सांगावें कानिं । वेगि जानकिचें रुप घेऊनि । सभामंडपासि यावें ॥ ८० ॥ रुषि त्वरित निघाला । वेगि राणवसा पातला । ह्मणे वोहिनि चाला चाला । तुह्मासि देवें पाचारिलें ॥ ८१ ॥ निरोपु सांगितला देवें । ह्मणे जाणकिचें रूप घ्यावें । वेगि सभामंडपासि यावें । यैसे कृपालु बोलिला ॥ ८२ ॥ तवें ते शृंघारु करुनि । वेगि आलि नृपनंदिनि । कृस्णें सत्येभामा देखोनि । हाश्ये वदनेसि बोलिला ॥ ८३ ॥ ह्मणे हें रुप नव्हे वो जानकिचें । परतोनी पाहे तो साचें । कृस्णाचें रुप देखति श्रिरामाचें । मग लाजिलि नृपनंदिनि ॥ ८४ ॥ मागुता आणिक शृंधारु केला । सुध क्षिरोदकु वेढिला । साधाचि अळंकारु केला । मग आलि सभेसि ॥ ८५ ॥ हासोनि वोले नारदमुनि । ह्मणे हेहि नव्हे सिता जननि । अर्धांगिचि पुरविली

राणि । ते रुक्मिणि पाचारा ॥ ८६ ॥ मग लाजिलि नृपनंदिनि । वदन खालतें करुनि । खेद दाटलासे वदनि । नेत्र विव्हळ पैं जाले ॥ ८७ ॥ पाहाति राणिया सकळिका । सोळा सहस्त्र गोपिनायका । मग बोलिला यादवसखा । सत्य-भामेसि परियसा ॥ ८८ ॥ ह्मणे वो तुह्मि अवघ्या जणीं । जाउनी आणा ते रुक्मिणी । तवं निघालीया अवघ्या जणी । तवं ते रुक्मिणी देखिली ॥ ८९ ॥ पद्मासनी ते वेल्हाळा । आनंदे परिपुर्ण मुखकमळा । विडिया देति हडपिणि बाळा । देखति लीला जानकीची ॥ ९० ॥ रुपें गोरटी चांपेकळी । शुभ्र वस्त्र शुभ्र कांचोळी । देखोनि सत्येभामा बाळी । वदन करी खालते ॥ ९१ ॥ तवं ते ह्मणती वो साजणि । तुह्मासी बोलावितो चक्रपाणि । तवं ते निघाली नृपनंदिनी । हंसागती परीयसा ॥ ९२ ॥ वेगीं सभामंडपासी आली । येउनि अर्धांगि बैसली । तेथें काय शोभा वर्तली । ते महिमा वर्णु सके ॥ ९३ ॥ सिंव्हासनीं गोपाळु । माजी रुक्मिणि विजुचा कल्लोळु । तैसाचि रघुनाथ जानकिचा मेळु । समस्त लोक देखती ॥ ९४ ॥ ह्मणती हें रूप देवाचें । येक परी जाले दो ठाइचें । भंगने जाले गर्वाचें । येकरुप होउनीयां ॥ ९५ ॥ मग बोले सारंगपाणी । जावें गरुडा तत्क्षेणीं । तयासी गोष्टि सांगोनी । वेगीं घेउनी यावें ॥ ९६ ॥ ह्मणावे जानकी आणि रघुनाथु । तुझीये भेटीस उत्कंठितु । येरु ह्मणे पुरला अंतु । पुर्णानंदु पैं कोपला ॥ ९७ ॥ आतां येथुनी जावे । मागुतें चरणापासी यावें । थोर हाव घेतली दैवें । मग नेत्रीं उदक डळमळी ॥ ९८ ॥ मग कुरुण ह्मणे कुमरासी । जा रे पाचारुनी आणा तयासी । तवं ते ह्मणती रुशिकेसी । कां आह्मावरी कोपलासी ॥ ९९ ॥ उद्धव आणि अक्रुर । तयांसी ह्मणे सारंगधर । तुह्मि जाउनि तो विर । हळुचि करुनि समजाविजे ॥ ३०० ॥ ह्मणावें राभें आणि लक्ष्मणें । भरत आणि शत्रुघ्नें । जानकिचि भेटि घेउन । वेगि यावे कपिराया ॥ ३०१ ॥ जाउनि नमस्कार करावा । सांगातें गरुडहि न्यावा । मग नमन करुनियां देवा । तिघेजण निघाले ॥ २ ॥ आले समुद्राचिया तिरा । सन्मुख देखति माहाविरा । मग नमन करुनि वानरा । तयाप्रति बोलति ॥ ३ ॥ मग ह्मणति अगा अगा मारुति । तुज बोलावितो रघुपति । बहुत भेटिचे आर्त चितिं । सितापति करिताहे ॥ ४ ॥ तव तो उछिद वदनें परतला । उधवाजवळिकें पैं आला । चरणि मस्तकु ठेविला । मग मुरकुंडि घातलि ॥ ५ ॥ रुप लाहाण चरणि मिठि । उधवे धरिला पोटीसि । घालुनिया पितांबराचे वोटिसि । रघुपतिपासि आणिला ॥ ६ ॥ गोमति ते सरयु जालि । द्वारका ते अयोध्या मिरवलि । मुत्कमंडपि शोभा देखिली । द्वारपाळ श्रिरामाचें ॥ ८ ॥ राम-

नाम घरोघरिं । रघुनाथचरित्रें गाति नारि । आले राउळगणाभीतरि । तव नवलाव पैं देखति ॥ ९ ॥ पद्मासनी रघुनंदनु । निळोत्पल दळभंजनु । वदन वर्तुळ राजिवनयनु । उदारमुर्ति परियसा ॥ १० ॥ पितांबर असे पांघुरला । कमळमाळि असे पुजियला । येके दाखविता जाला । भु वैकुंठ ह्मणौनियां ॥ १० ॥ ज्ञानि पंडित माहामुनि । जे राहिले रघुनाथध्यानिं । त्यासि वैकुंठ ह्मणति धरणि । ह्मणौनि करें दाखवितो ॥ ११ ॥ राम निळवर्ण श्यामप्रभा । माजि जानकि जांबुनदाचा गाभा । इंद्रनिळाचि प्रभा । त्यासि देखोनियां लाजल्या ॥ १२ ॥ सम दृष्टि असे नासिकि । अर्धांगि बैसलिसे जानकि । बरवंट देखोनि हनुमंत जाला सुखि । उडि विशेषिं घालावि ॥ १३ ॥ रघुनाथचरणिचें आर्त । पुरलें हनुमंताचें मनोरथ । देखे जानकि आणि रघुनाथ । भरत शत्रुघ्नहि देखिले ॥ १४ ॥ देखे पवनाचा नंदनु । उदारकिर्ति रघुनंदनु । वदन वर्तुळ राजिवनयेनु । कनकदंडें ढळताति ॥ १५ ॥ छेत्र भरथाचा करिं । शत्रुघ्न चामर वारि । कर जोडोनि माहाविरिं । सन्मुख देखति समस्त ॥ १६ ॥ तेथें रुसिचि सभा दाटलि । ब्रह्मविद्या वोसंडलि । हनुमंताचि दृष्टि पडिलि । रघुनाथचरणिं परियसा ॥ १७ ॥ रघुनाथचरणिं नखाग्निचें किर्णं । तेंचि हनुमंतासि जालें भुशण । तनुमनु वेधलें प्राण । तटस्त होउनि राहिला ॥ १८ ॥ क्रुपासागरु रघुनंदनु । बोलाविला पवनाचा नंदनु । दोहिं भुजिं उचलुनि । उजवां अंकि बैसविला ॥ १९ ॥ मस्तकु कुरवाळिला हातें । क्रुपासागरें रघुनाथें । अश्वासिलें हनुमंतातें । हृदइंच्या आर्तकरुनी ॥ २० ॥ धेनु कुरवाळि वत्छासि । किं कुर्मि अवलोकि पिलियांसि । किं जननि बाळकासि । हेहि उपमा देतां न्युन वाटे ॥ २१ ॥ निरोपमासि उपमा देणें । न दिसे कोटिगुणें । भक्तालागि सगुण होणें । रघुनंदनें परियसा ॥ २२ ॥ देखोनि आर्त हनुमंताचें । आनंदलें हृदय रामाचें । भक्ति प्रेम वोरसलें दोहिचें । येकरूप होउनि ठेलें ॥ २३ ॥ किं जिव सिव येक जालें । परमानंदे वोसंडलें । येकमेकांतें बोलों सरलें । परस्परें आळिंगिति ॥ २४ ॥ काढुनि कंठिचि माळा । रामु घालि हनुमंताच्या गळां । श्रिराम परब्रह्मपुतळा । कोवळा करिं कुरवाळितु ॥ २५ ॥ असो वरुतें पाहे हनुमंतु । तव देखे चतुर्भुज गोपिनाथु । क्रिडा विनोद असे करितु । नारदासि परियसा ॥ २६ ॥ देखे उधव आणि अक्रुर । देखे बळदेव आणि गरुड । तेथें उगे पाहे पवनपुत्र । मग गोपिनाथु बोलिला ॥ २७ ॥ पाहे हनुमंता विचारुनि । वरद होता आठवि मनिं । द्वापारि तुजलागुनी । भेटि देईन

सर्वथा ॥ २८ ॥ तवं बोले भक्तराणा । पुरलिया जिविच्या खुणा । तेणेंचि रुपें जगजिवना । मज बोलवि स्वामियां ॥ २९ ॥ पाहे तंव तेचि सभा । राम कैवलेकोंदणिचा गाभा । देखे भरत शत्रुघ्न उभा । कनकदंडे ढळताति ॥ ३० ॥ यैसें आर्त हनुमंताचें । पुजन करुनि प्रेम भक्तिचें । तें सुख बोलता वाचे । मज तो मनि नुपरेचि ॥ ३१ ॥ राम सुखाचा सुखसागरु । सुखाचाचि कल्पतरु । सुखाचाचि रत्नाकरु । सुखरत्नि पिकला ॥ ३२ ॥ सुकाळु जाला कैवल्याचा । बोलता नोवलवे वाचा । जो प्रेमा वो हनुमंताचा । भोक्ता साचा रघुनाथु ॥ ३३ ॥ पाहा हो देवें नवल केलें । भक्तालागि रुप पालटिलें । हनुमंताचे आर्त केलें । रामरुप होउनियां ॥३४॥ मगें जोडूनी दोन्हि कर । उभा राहिला रामासमोर । ह्मणे मी स्वामिचा किंकर । हृदइं विसरु न पडावा ॥ ३५ ॥ हासोनि बोले सितापति । यैसे तो न घडे गा मारुति । परस्परें चित्तवृत्ति । हे खुण निरुति जाणावि ॥ ३६ ॥ हनुमंता तु तें विसरावें । तुवां उपकारु बहुत केलें आपुलेनि जिवें । ते काय ह्मणौनि आठवावें । कल्पकल्पांतरिं न विसरिजे ॥ ३७ ॥ मग साउमा बोलाउनि मारुति । रघुनाथें आळंगिला परमप्रिति । काढुनि कंठिचि वैजयंति । हनुमंताकंठिं घालुं पाहे ॥ ३८ ॥ ते वेळि हनुमंतु बोलिला । ह्मणे स्वामि मनोरथ पुर्ण केला । दृष्टिसि श्रीरामु देखिला । प्रसाद पावला स्वामिचा ॥ ३९ ॥ मज तो नाहि कासयाचि चाड । तुझें प्रेम तेंचि गोड । तुवां पुरवावें भक्तिचें कोड । आर्तदरुशण आणि स्मरण ॥ ४० ॥ यैकोनि हासिनला सिताकांतु । ह्मणे परिपुर्ण आहे तुझा मनोरथु । रघुनाथ-नामाचें बहुत आर्त । परिपुर्ण होईल ॥ ४१ ॥ मग हृदइं धरुनिया राममुर्ति । हनुमंतु निघाला तिर्थाप्रति । नारद बदरिकाश्रमा जाति । दोघे संवेग निघाले ॥ ४२ ॥ बोळावित चालिला रघुनंदनु । लक्ष्मनु भरत आणि शत्रुघ्नु । नगराबाहेर येउनु । हनुमंतु चरणि लागला ॥ ४३ ॥ ह्मणे जय जय जि रघुनाथा । स्वामि द्वापारि भेटलासि आतां । परि कृस्ण ह्मणे गा हनुमंता । सांगेन तें करावें ॥ ४४ ॥ कलयुगिं माझें दरुशण । जेथें रघुनाम संकिर्तन । तेथें संतुप्त होतें तुझें मन । सुख पावासि भेटिचें ॥ ४५ ॥ हेंचि भेटिचें आर्त । अखंड रघुनाथनामि चित । तेचि मुक्ति पावावयाचि पंथ । नाम तारक कलयुगिं ॥ ४६ ॥ हाचि वरद होता रामअवतारिचा । प्रसाद जाला नामाचा । जेथें प्रसंगु रामकथेचा । तेथे समाधिसुख पावसि ॥ ४७ ॥ हेचि होवे तुज प्रतिदिनि । येरु मस्तकु ठेवि कृस्णचरणि । ह्मणे स्वामि चक्रपाणि । हेचि मागें तुम्हासि ॥ ४८ ॥ म्हणोनि वोडविला मस्तकु ।

अभय हस्तु ठेवि वैकुंठनायकु । आनंदे निर्भय होय हनुमंतु । मग आज्ञा मागता जाला ॥ ४९ ॥ दोघे चालिले बद्रिकाश्रमा । जाले दरुशणाचा प्रेमा । थोर आनंदु भक्तोत्तमा । क्षिणक्षिणा उचंबळतु ॥ ५० ॥ नवल जालें द्वारकेसि । गाविसा आणि बळिदेवासि । नवल जालें रुक्मिणिसि । देवदुंदुभि लागलिया ॥ ५१ ॥ देविं केलि पुष्पवृष्टि । ह्मणति जालि आनंदावि श्रुष्टि । परमात्मा जगजेठि । लिलाअवतार धरियला ॥ ५२ ॥ देवासि भत्कांचि चाड । भक्ताचे प्रेम देवासि गोड । देव पुरवितसे कोड । आपुलें रुप देउनियां ॥ ५३ ॥ रघुनाथनामाचेनि गजरें । जिवासि जिवन नाम खरें । प्रेम प्रिति पडिभरें । दुसें काहिं नाठवे ॥ ५४ ॥ ज्यासि समाधिसुख ठेंगणें । कि वैकुंडसुखासि आणिलें उणें । किं भत्कालागुनि रघुनंदनें । सगुणरूप धर्येलें ॥ ५५ ॥ हेंचि तुह्मा मागे श्रि(रा)मा । श्रोता असों द्यावा प्रेमा । कथा येकावि मनोरमा । विनवि नामा पाठकु ॥ २५६ ॥

इति हनुमंतगरुडआख्यान संपुर्णमस्तु
शुभं भवतु ॥

## द्रौपदीचें बीरडें

श्रीरामकर्ता ॥ राजसूययज्ञाभितरी । कथा अभिनव कुसरी । तें मी बोलेंन अरुष उत्तरी । श्रोतेजनिं परिसावें ॥ १ ॥ ब्राम्हण द्विज रुषेश्वर । त्याचे पंक्ति जेविले अपार । सेवटीं कौरव यादववीर । दोनि पंक्ति बैसविल्या ॥ २ ॥ आणीक राजे थोर थोर । जे यज्ञासि मिळाले नृपवर । येक पंडुचे कुमर- । वांचुन आवघे बैसले ॥ ३ ॥ कृष्णजी राहिला पांडवाकारणें । पंक्ति बैसों आठहिं जणें । अन्नें आणुनि ठेविलीं भीमसेनें । वाढावया द्रौपदीसी ॥ ४ ॥ जेथें श्रीकृष्ण परमात्मा पुरविता । तेथें अनाचि काय नून्यता । वायांच वाढउं ग्रंथा । परिपूर्ण करिता श्रीकृष्ण ॥ ५ ॥ द्रौपदी वाढीतसे वेगें । यादववीर जेविताति अल्हादें । वाई भागलीस म्हणोनि स्वानंदें । पृष्टीवरुनि हात उतरीला ॥ ६ ॥ धर्म उभा मध्य भागें । अर्जुन चाले कृष्णामागें । द्रौपदी वाढीतसे वेगें । कृष्णरंगें रंगली ॥ ७ ॥ कीं ते ब्रम्हीचे तेज गोठलें । कीं कृष्णरूप हें सांवळें । कीं सौभाग्यसौंदर्य वाणलें । मोक्ष द्यावया हरिभक्तां ॥ ८ ॥ कीं लावण्याचें वन फळलें । कीं वरवेपणासि फळ आलें । किं आनंदें सुख माजलें । म्हणोनि कृष्णमूर्ति वोळगली ॥ ९ ॥ ऐसी कृष्णमूर्ति सांवळी । वस्त्रें नेसती सोनसळी । नेपुरें रुणझुणिति चरणकमळीं । सुंदर

रुळती साजिरीं ॥ १० ॥ सस्मित शोभत हास्यवदन । वोष्ट अरक्त अनुपम्य । दशन विराजति अतिरम्य । स्वेदें चंदन भीजलें ॥ ११ ॥ पंचकळिका खोविल्या शिरीं । परतोनि पाहे द्रौपदी सुंदरी । पुष्पें विखुरली कवरी । प्रेम हृदई फुटलें ॥ १२ ॥ क्षणक्षणा परतोनि पाहात । तव रूप अती साजिरें देखत । स्फुराणें बाहु तटतटीत । बिरडें अवचितें तुटलें ॥ १३ ॥ उघडे जाले वक्षस्थळ । कोमाइले मुखकमळ । नेत्र जाह्ले विव्हळ । ते कौरवें जाणितलें ॥ १४ ॥ मग खुणाविति येकमेकां । म्हणती फावली हें नायका । उणें आणुनिया देखा । गदारोळें हांसति ॥ १५ ॥ मग लगबग करिति सकळिक । येकासारिखें न मागति येक । म्हणति उठा रे सकळिक । अन्नें वेगीं पावेति ना ॥ १६ ॥ ऐसी केली कासाविस । लाजें टाकी स्वासोस्वास । श्वेद आला सर्वांगास । जिव्हा अधर वाळलें ॥ १७ ॥ पाउलें न पडति हारी । परतोनि पाहे द्रौपदी सुंदरी । मग बाप पीतांबरधारि । मुखावरूनि हात उतरीतसे ॥ १८ ॥ नेत्रीं पातलें अश्रुपात । वदन कृष्णजीचें न्याहाळीत । अवस्था दाटली अद्भुत । कंठी मिठी घालुं पाहे ॥ १९ ॥ तंव बोलिली द्रौपदी सुंदरी । कृष्णा ठाव दे गा आपुल्या उदरीं । ऐसे मन देखोनियां मुरारी । ते अवस्वरी काय बोले ॥ २० ॥ जे पुरुष मंद अभाग्याचें । आणि उणें पाहती हरिभक्तांचें । त्याचे शिरिं पापाचें । ब्रिन्हाड सर्वथां ॥२१॥ ते तंव पापाचेची धणी । भक्त सारथी चक्रपाणी । ना भि ना भि वो द्रौपदी बहीणी । दोनि भुजा उमटलीया ॥ २२ ॥ चोळिये ब्रिरडें निर्माण केलें । वाढित पात्र बिरडें मिरविलें । आणि दोंहीं हाति ब्रिरडें घातलें । तें देखिलें सकळिकी ॥ २३ ॥ बाप भक्तवत्सल रुषीकेसी । भुजा उमटलीया द्रौपदीसी । येक येक ठायांपासी । द्रौपदीमागें कृष्ण उभा ॥ २४ ॥ जें जें जयासी रुचत । तें तें दोनी हस्तीं वाढित । आणि दोनि हातिं ब्रिरडें घालित । बाप वाढीं म्हणतसे द्रौपदीसी ॥ २५ ॥ पाहा हो देवें नवल केलें । आपरुप भक्तासी दीधलें । द्रौपदीया विश्वरुप दाविलें । ते कळलें येक्या भीष्मासी ॥ २६ ॥ वरकड हे पामर जन । नेणति वस्तूचें महीमान । येकची द्रौपदी श्रीकृष्ण । मागें अर्जुन देखिला ॥ २७ ॥ ऐसी सकळसभा तटस्त जाली । द्रौपदी चतुर्भुज देखिली । मग म्हणति पोटें धालीं । उठते जाले सकळीक ॥ २८ ॥ ब्राम्हणांचि भोजनें जाली । शोडषोपचार पूजा केली । गंधाक्षता विडे घेतले सकळीं । मग आश्रमासी जाते जाले ॥ २९ ॥ द्रौपदी आली भाणवसा । सर्वेंचि कृष्ण आला सरिसा । धर्म म्हणे हृषीकेशा । किति उपकार आठउं ॥ ३० ॥ कृष्णा तुझेनि आम्ही

साजिरी । कृष्णा तुझेनि आम्ही संसारिं । कृष्णा तुं सभाग्य निर्धारिं । तुं आम्हां कैवारी म्हणोनियां ॥ ३१ ॥ कृष्णा तुं भागलीयाचा विसावां । कृष्णा तुं आधार सकळ जीवा । द्रौपदी म्हणे तुजसारीखा बंधु असावा । जन्मोजन्मी माहेरा ॥ ३२ ॥ मग धूप दीप आरती । पृथकाकारें वोवाळिति । मग बाप श्रीकृष्णमूर्ति । निराभिमानी वर्णिति ॥ ३३ ॥ मग बैसली आठहीजण पंक्ती । मध्यें बैसली कृष्णमूर्ति । सेजें बैसली कुंती । आरोगणा सारिली ॥ ३४ ॥ जे उपमा द्यावि न घडे । जेथें वेदासी मौन्य पडे । शेषा सांकड घडे । सहस्रमुखें वर्णितां ॥ ३५ ॥ साहाजणा दरुषणें जाली । मनें योगियांची विराली । पाहतां मुग्कुंडी वळली । मना आणि गुणाची ॥ ३६ ॥ परि या नामें नाम आर्ता । विनवी पाटक नामा शरणांगता । पुढें आहे रसाळ कथा । अैका चरित्र कृष्णजीचें ॥ ३७ ॥

इति श्री द्रौपदीचें बीरडें समाप्त ॥

## चेंडुफळी ( काळीयाची कथा )

कोण्ही येके काळी । यमुनेचे पाबळीं । उदक घेतां तत्काळी । निमाली गोपाळवछें ॥ १॥ तेथें आला गोपीनाथ । तंव तीं पावली मृत्य । मग होउनि विस्मित । विचार करि गोविंद ॥ २ ॥ कालीचा तिथीवारी । उदक घेतलें समग्रीं । आतांचि ये अवस्वरी । काय जालें ॥ ३ ॥ हे सौभरींचें स्थान । येथें कां दुष्ट जीवन । उदक घेतांचि प्राण । सांडिले सकळिकीं ॥ ४ ॥ मग मंत्रुनियां जीवन । संजीवनी मंत्रे करुन । सकळांचे आणिले प्राण । कृपाळुवें गोविंदें ॥ ५ ॥ परिसा परिसा चेंडुफळी । पवित्र कथा भूमंडळीं । भागवतीं बोलियली । व्यासदेवें समर्थें ॥ ६ ॥ मग वेघोन कलंबावरी । उडी घालुनि श्रीहरी । धांडोळुनि कालंदी वरी । पाताळगामिनीते ॥ ७ ॥ तंव तो कस्यपाचा सुत । काळया नाव विख्यात । फणी वसे मिरवत । शत येक ॥ ८ ॥ उदकीं प्रवेशला हरी । तंव देखती नागिणी नारी । वर्जिती नानापरी । श्रीहरीतें ॥ ९ ॥ तुं सावळा सुंदर । वयें दिसतोसि सुकुमार । तुं जाई रे विखार । न देखतां ॥ १० ॥ तंव तो नायके उत्तर । आला काळयासमोर । वेगीं पातला विखार । कृष्णाजवळिकें ॥ ११ ॥ कृष्ण तया न मनित । आला पुढे चालत । तंव तो उठिला घुधात । काळया तो ॥ १२ ॥ दोघां जाली समदृष्टी । येक येकातें दाटी । मग झोंबिला कंठीं । काळया तो ॥ १३ ॥ दोघां युद्ध जालें थोर । आंदोळलें चराचर । भीडताती महावीर । अद्भुत

ते ॥ १४ ॥ दोघे महा अतुबळी । परि कृष्णें सर्प आणिला तळीं । बैसला असे वनमाळी । तक्षकावरी ॥ १५ ॥ येकशतें फडा । वरि नाचे ब्रह्म गाढा । सर्पाचा केला घोडा । नारायणें ॥ १६ ॥ मग म्हणें अनंत । तुं काळरूपी समर्थ । तुवां केला होता घात । वछा बाळकांचा ॥ १७ ॥ तरि तुं सोडिलासि जित । म्हणउनि कश्यपाचा सुत । ब्रम्हबीजघात । करू नये ॥ १८ मग म्हणे कालियाण । मी भीतसें आपण । मज भक्षील तुझें वाहन । बाहीर निघतां गोविंदा ॥ १९ ॥ मग म्हणे नारायण । तुझें मस्तकीं माझे चरण । ते पद्म देखोन । न मारी गरूड ॥ २० ॥ तंव गोकुळीं होतसे कोल्हाळ । म्हणती बुडाला बुडाला गोपाळ । गोकुळीं कथिला सकळ । वृत्तांत ॥ २१ ॥ तवं जाहला हाहाकार । यशोदे न धरे गहिवर । सवें घेउनि बळिभद्र । आली यमुने डोहासी ॥ २२ ॥ जळीं निघाले समग्र । जाळी टाकिती ढिवर । शोधिती उभयतीर । यमुनेचें ॥ २३ ॥ थोर होतसे वळसा । यशोदा न संभाळी मानसा । पाहे दाही दिशा । अंधकार ॥ २४ ॥ ऐसी विकळ माता पिता । शरीरीं शुद्धि नाहीं सर्वथा । केव्हां भेटसी अनंता । मजलागीं ॥ २५ ॥ मग टाकिलें शरीर । कृष्णाविण ते अपवित्र । आतां न पाहे मंदिर । बाळकावीण ॥ २६ ॥ मग पडली भूमंडळीं । जैसी प्रचंडवातें केळी । जीवनाविण मासोळी । केवि राहे ॥ २७ ॥ ऐसा ज़ाहला हाहाकार । सकळा आला गहिंवर । तवं काय बोले उत्तर । बळिभद्र ॥ २८ ॥ आतां न करी गा रळी । माता होतसे विव्हळी । तंव निघाला वनमाळी । कळयासहित ॥ २९ ॥ मग करिती जयजयकार । म्हणती भेटला सारंगधर । मग तो पाठविला फणिवर । समुद्रासीं ॥ ३० ॥ ऐसे नाथिले काळयासी । कवतुक दाखविलें सकळांसी । तेथें पाठक नामयासी । महाप्रसाद लाधला ॥ ३१ ॥

## भरतभेट

श्रीगणेसाये नमः श्री सरस्वतीये नमः श्रीगुरुभये नमः ॥[१] अैसे राक्षेस नीर्दाळुनु : वीजई जाला रघुनंदनुः सरनागत बीभीसनुः कर जोडुनी पुढें उभा असे ॥ १ ॥ मंडपी सभा धनवटली : अर्धांगीं जानकी सोभली : देवी आनंदे पुस्पव्रुष्ट केली : जयेजयेकार प्रवर्तला ॥ २ ॥ वीमानीं दावीती[२] सुरवर : आनंदे नाचती वानर : प्रेमे करुनी देती भुभुकार : आनंदे अंबर गर्जत असे : ॥ ३* ॥ अैसा बहुत उछावो जाला : रावनु कुंभकर्णु

मारीला : रघुनाथु वीजई जाला : आनंदे वोंवाळती नरनारी : ॥ ४ ॥ मग रामु ह्मने गा जुत्पती : राजीं वैसवावा लंकापती : मग अभीसेकु करीतो : वेदे मंत्री करुनीयां : ॥ ५ ॥ नगरीं उभवीलीया गुढीया तोरने : लागलीं वाद्या दुंदुभी नीस्याने : रामपादुका बीभीसेने : धरील्या मस्तकी : ॥ ६ ॥ पुढे उभा राहुनी बधांजुळी : काये बोलीला तये वेळी : मी असेन स्वामी चरनाजवळी : तुझे पाये न वीसंभे दातारा : ॥ ७ ॥ मज राजें चाड नाहीं : असावें स्वामीं तुमचा पांई : अैसा मनोधर्म पाहीं : सकळ भक्तासांगातें : ॥ ८ ॥ ह्मनुनी चरनी ठेवीला माथा : बहुत पुन्ये जोडलेंती जी रघुनाथा : तुह्मासीं न वीसंभे जी आतां : जीवें भावें स्वामीया : ॥ ९ ॥ मग (राम) ह्मने हो लक्षीमना : हे काये आले हो याचीया मना : यासी म्यां केले लंकेचा राना : जै आह्मांसी भेटला : ॥ १० ॥ तेधवांची लंका यासी दीधली : अैसी नगरामधें जाली बोळी : मग लक्षेमनु बोलता जाला मंजुळी : अहो भीबीसना परीयेसी : ॥ ११ ॥ मग ह्मने या श्रीरामचें वचन : हें नव्हे जी असेते जान : येर ह्मने जी रामचरन : जोडले कवन सोडती : ॥ १२ ॥ ह्मने जी नेमुनी मनपवन : यौगी सेवीताती नीरांजन : परीसा श्रीरामाचे चरन : लाक्षा न येती सर्वथा : ॥ १३ ॥ तो जोडला स्वामीं श्रीरामु : मागुता चालवीजे राज्येधर्मु : तयासीं संसारस्त्रमाचा भ्रमु : भुमीभारु पै होईल : ॥ १४ ॥ वाचेसी श्रीरामची कारन : द्रुढ धरावे हृदई श्री चरन : हें सोडतां पातकासी कारन : जै न देषतां श्री रामासी : ॥ १५ ॥ तरी थोरे पुन्यों जोडला श्रीरामु : आनीं मी मागुता चलउ राजे धर्मु : ह्मनौनी दाटलासे उर्मु : क्षेण क्षेणा चरनावरी लोळत असे : ॥ १६ ॥ मग रामें तयाते उचलौण : प्रेमें दीधले आळींगन : सप्रेम जाले लोचन : हृदई परीपुर्न श्रीरामु : ॥ १७ ॥ रामु आनंदाची लेहरी : आली बीभीसेनावरी : तेनें प्रेमें हृदयाभीतरी : पुर्न आनंदे वोसंडला : ॥ १८ ॥ रामे लक्षीमनाकडे पाहीले : तंव त्याचे हृदये आनंदें उचंबळले : मग तयासीं काये बोलो आदरीले : आहो वीभीसना परीयेसी : ॥ १९ ॥ ह्मने रे बापा लंकेनाथा : चीत देई आमच्या बोला आतां : हृदई धरुनी रघुनाथा : राज्येभारु चालवीजे : ॥ २० ॥ श्रीरामु आपकु ३ पाहे : तरी तो सहजची येथें आहे : तुं जरी ह्मनसी हाची होये : तरी तुवां हृदयाभीतरी पाहावा : ॥ २१ ॥ राम आहे जवळी : हे भक्तांची नव्हाळी : मग

१ टीप पहा २ दाटले–पाठ. ३ व्यापकत्व–पाठ.

बीभीसनु बोले मंजुळी : कर जोडुनी परीयेसा : ॥ २२ ॥ ह्मने रामु सुरेषु सांवळा : स्त्रामी म्यां देषीला डोळा : यैसे जालेयां भाग्याचे फळा : तें सांडुनीया काये स्मरावे : ॥ २३ ॥ तंव लक्षीमनु ह्मने गा अवधारी : हा व्यांपकु आहे चराचरी : येरु ह्मने गा अवधारी : माझ्या मनेसी न कळे ॥ २४ ॥ यावरी रामें मस्तकीं ठेवीला हातु : तंव हृदई सदोदीतु : देषे रघुनाथु घनस्याम मुर्तीवंतु : सीतेसहीत देषीला : ॥ २५ ॥ मग उघडुनी डोळे : त्या आनंदाचे सुष सोहोळे : देही संचरले तये वेळे : हें अनुभवीये जानती : ॥ २६ ॥ मग रामे आज्ञा दीधली : भद्रीं पादुका लेहवीली : प्रधानवर्गाकी करवीली : सकळ सामग्री सीधी : ॥ २७ ॥ नाना वादें आनी मंत्रध्वनी : अभीसेकु केला सींहासनीं : भक्तराज चुडामनी : लंकाराजी बैसवीले : ॥ २८ ॥ यैसा भक्तांचा सोहोळा : करीत असे घनसांवळा : वैकुंठीहुनी आगळा : भक्ताकारनें भुक्ती मुक्ती दीधली : ॥ २९ ॥ मग बीभीसेनु कर जोडुनी वीनवीत : स्वामीनें दीनाते करावे संनाथ : सकळ परीवारासहीत : चालावे राजभुवना : ॥ ३० ॥ समस्त करीतल मार्जने : पंगती करावें भोजन : मग ह्मनीतलें रघुनंदने : झनी यैसे बोलसी : ॥ ३१ ॥ ह्मने तु आईक गा लंकेनाथा : अनसयेन असे गा राया भरथा : तेने जटा राषीलीया माथां : कंदंमुळें सेवीतु असे ॥ ३२ ॥ भुमी करीतु असे सयेन : आनी वसवीती माहावन : अभ्यंग तयावांचौन : न घडे आह्मां तीघां जनां : ॥ ३३ । अैसे ह्मणौनी कंठी दाटला : मनी भरथु भक्त आठवला : लक्षमनु व्याकुळ जाला : मुष देषोनी रामाचें : ॥ ३४ ॥ मग अपनची ह्मणे रघुनाथु : बीभीसना आज्ञा देतु : सुग्रीवादीक हनुमंतु : समस्त वानर घरासी न्यावें : ॥ ३५ ॥ या सकळांसीं करावें मार्जनें : पंक्ती करावीं भोजने : वस्त्रे अळंकार भुसने : देउनी समस्त वानर गौरवावे : ॥ ३६ ॥ मगं आज्ञा दीधली वीरां : आले बीभीसनाचीये मंदीरा : मार्जने सारुनीया वीरां : मगं भोजने सारीली : ॥ ३७ [४] ॥ वस्त्रे अळंकार भुसुनें : समस्तां वाईली बीभीसने : भुभुकारु देउनीयां त्रानें : आनंदे प्रेमें नाचती : ॥ ३८ ॥ वानर रत्नाचे हार लेती : आनी बाही मनगटी बांधीती : कटां [५] घाटे कासा घालीती : दीव्ये वस्त्राचीया : ॥ ३९ ॥ येक आभरने झेलीती : येक डोईस बांधीती : येक तोडुनी टाकती : जडीत कांकने कळाईचा [६] : ॥ ४० ॥ येक गौपुरें माडीया वरी वेघती : येक हीडती राजेमंदीरीं नीगती : येक भ्रमरपलंगा-

४ टीप ( धु. १५९ ) ५ कटितटि–पाठ. ६ कळाविया–पाठ.

वरी लोळती : सुषनीद्रेलागी ॥ ४१ ॥ यैसे सकळ वानरे पुजीले : आठहीं पुजीप्रती[७] नीवाले : पुढें वानरपुंगवे चालीले : नुतं करीती आनंदेसी ॥ ४२ ॥ यैसे आले रामाजवळी : मस्तक ठेवीती चरनाकमळी : रामें आळंगीले तये वेळीं : लाहान थोरां वांनरातें : ॥ ४३ ॥ रामु ह्मणे रे लंकेनाथा : यें कष्टली वनें हीडतां । मज सांगाते येतां जाता ॥ अने उदके वर्जीली : ॥ ४४ ॥ या सुग्रीवांचे उपकारु : बोलावयाकारने होये थोरु : ह्मणौनी त्यांसी रघुवीरु : आळींगन देता जाला : ॥ ४५ ॥ वाळीचा सुतु हा अंगधु ॥ याच्या पीतयाचा म्या केला वधु : सांडोनीया वैरसंमंधु : जीत्रें भावें आह्मां अनुसरला : ॥ ४६ ॥ [८]वै तारुन असे धाकुटा : परी याचा पुर्साथु असे मोटा : रावनासारीष या सुभटा : कैसीं उतरे दीधली : ॥ ४७ ॥ ह्मनुनी मागुता आळंगीला बाही : रामें प्रीतीनें धरीला हृदई : अंगदु मस्तकु ठेवीं पाई : ह्मने मी बाळक स्वामीया : ॥ ४८ ॥ जये जये जी रघुपती : दीधली तुवा पीतयासी मुक्ती : तुझीया चरनाची आर्ती : हा भवसींधु तरावया : ॥ ४९ ॥ रामे जांबुवतासी वोलावीले : नळ नीळ समस्तही आले : तया समस्तां आळींगन दीधले : तुह्मी मजकारने कष्टलेती : ॥५०॥ धांडोळीली माहावने : ह्मणौनी मागुती दीधली आळंगने : परी हनुमंताकडे न पाहे रघुनंदनु : तो रामसन्मुष उभा असे : ॥ ५१ ॥ रामु आनुषीकडे पाहे : तंवं अवस्ता वाटली जानकीये माये : आनी समस्त वानर आस्चीर्ये करीताये : हा थोर नवलाव पैं ॥ ५२* ॥ मुरकुंडी करुनी अधोमुषे : पाहे उभा राहुनी रामा संमुषे : होये तऱ्ही देवादीदेवो तयाकडे न पाहे : हे नीमीत्ये कोन्हांसी न कळे : ॥५३* ॥ यैसा हनुमंतु जाला कासावीसु : ह्मने रामें कां धरीलें उदासु : आतां जीवीत्वाची कायेसी आसु : चींतेन मानस व्यापीलें[९] ॥ ५४* ॥ ह्मने काये जाला अपराधु : कां कोपला दयासींधु : कां कोपला आनंदकंदु : यैसा नीषंदु पै कांपां केला : ॥ ५५ ॥ अवघ्या वीरामाझारी : मजवर बहुत कृपा करी : तें सांगुनीयां नीरंतरी : मजकडे न पाहातु पाहे आनीकीकडे : ॥ ५६ ॥ आतां धीरु न धरवे जीवा : रामाकारने जीउ द्यावा : मनीच नमस्कारुनी कसवा : मग माघारा पैं जाला : ॥ ५७ ॥ मग आला द्वाराबाहेरी । तवं रामे पाहीलें तये अवस्वरी : ते सांगीतले तये वांनरवीरीं : जे श्रीरामु तुज पाहातु असे : ॥ ५८ ॥ ईतुकें आईकुनी हनुमंतु : हृदयामाजी हरीषेला बहुतु : वेगी आला धावतु : रघुनाथासन्मुष उभा ठाके ॥ ५९ ॥

---

७ जुत्पती पाठ. ८ वय. ९ मुळांत 'अर्पिले' व्यापिले—पाठ.

तंवं रामु मुषाकडे पाहे : तंवं तेने द्रुष्टी चरनी ठेवीली आहे : रामे पसरुनी बाहे : ह्मने येरे येरे हनुमंता : ॥ ६० ॥ तंवं तो वेगें लवला्हे : राम पसरीत असे बाहे : हनुमंत धरीं दोन्हीं पाये : चरनी माथा ठेउनीयां : ॥ ६१ ॥ ह्मने जये जये जी रघुनाथा : मी तव अपराधी सर्वथा : ह्मनुनी चरनी ठेउनीयां माथा : आनंदे उचमळत असे : ॥ ६२ ॥ राम मस्तकु कुरवाळीत : मागुता पुना पुना प्रीतीनें आळंगीत : रामु ह्रदई असे धरीत : हनुमंत थोर जीवीं आनंदला : ॥ ६३ ॥ स्वेदु कंप दाटला ह्रदई : रोमांचळे उठीले देही : मुषीं न बोलवे काही : मौन्यो मुद्रा अवलंबुनी उभा असे : ॥ ६४ ॥ देव भक्त येक जाले : तें सुष न बोलवे बोले : तेथील आनंदाचे सोहोळे : ते अनुभवीये जानती : ॥ ६५ ॥ नेत्रीं अस्वपात उठींले : चरन जात अशती बेंवळे : राम परब्रह्म सांवळे : आळंगीत असे हनुमंतासी : ॥ ६६ ॥ मग रामु म्हने हनुमंतासी : बारे कष्टलासी वनवासी : समुद्र उतरुनी लंके गेलासी : सीतासुधी करावया : ॥ ६७ ॥ कीं आठउ स्त्रेतु बांधीला : कीं राक्षेसासी आड केला : कीं मार्ग तुवा दावीला : धाकें कांपताती तुझेनी : ॥ ६८ ॥ आगडु केला पुंसाचा : भारु राषीला वानरांचा : तुझा उपकारु बोलतां वाचा : लाजे मुषामाझारी : ॥ ६९ ॥ सक्ती लागली लक्षीमनासी : धाउनी झोंबीलासी माहावनासी : सुर्ये न घालीतां कीर्नासी : द्रोनागीरी आनीला : ॥ ७० ॥ यैसे उपकार असंख्यातु : बोलतां मन माझें असे संकतु : तुज द्यावया उचीतु : मज तंव काही दीसत नाही : ॥ ७१ ॥ वस्त्रें तांबोळे जरी द्यावे : तेनें उतराई काई व्हावें : तैसे तुजकडे पाहावे : ह्मणौनी मज संका वाटत असे : ॥ ७२ ॥ तंव तो मुरुकुंडी करीतु : सम चरनावरी लोळतु : मग माग रे माग ह्मनतु रघुनाथु : कुरवाळीतो माथा : ॥ ७३ ॥ तंव तो जोडोनी दोन्हीं कर : उभा राहीला समोर : बोल बोलत असे बेंवळ उत्तर : स्वामीं रघुनाथा परीयेसा : ॥ ७४ ॥ प्रसंन जालासी रघुनाथा : तरी जेथें होत असेल रामकथा : कर जोडोनी मी श्रोता : तुज सन्मुष म्यां उभें असावे । ॥ ७५ ॥ श्रवनी रामकथेतें आईकावे : वदनी राम राम ऐसें बोलावें : ह्रदई नीरंतर असावें : हेंची मागतो दातारा : ॥ ७६ ॥ ह्मणौनी चरनी ठेवीला माथा : हें तुज दीधेल रे हनुमंता : हार काहाडोनी कंठीचा : कंठीं घालीत असे जानकी : ॥ ७७ ॥ ऐसा भक्तीचा उछावो : करी राजाधीराजा रामरावो : हनुमंतासी प्रेमभावो : रामें चरनी दीधला : ॥ ७८ ॥ ह्मने हनुमंता अवधारी : आह्मासी हींडता वनांतरी : चौदा वरुसें जाली पुरीं : च्यारी दीवसही आगळे जाले

॥ ७९ ॥ आह्मीं संकल्प केला होता : नेमु केला राया भरथा : तरीं काये करीसील आता : हे मजप्रती सांग पां : ॥ ८० ॥ आह्मा येतां वनवासा : भरथे नेमु केला ऐसा : स्वामीं तुं न येसी वरुसा चौदा : तरी मी प्रानु तजीन : ॥ ८१ ॥ मग म्यां सांगीतले दीवस च्यारी : आणी पांचवे दीवसीची दुपारी : मगं राहीला माहावनातीरीं : अन्नं उदक वर्जुनीया ॥ ८२ ॥ आनी वल्कलें नेसला : नंदीग्रामी असे राहीला : तयासीं सुधी सांगो जाये वहीला : नाहीं तरी प्रानु तजील : ॥ ८३ ॥ आजीचा दीवसु पांचवां : तुज मार्गु असे बहुत कर्मावा : पीडा करुनीया आपुलीया जीवा : माझी वाट पाहेल : ॥ ८४ ॥ इतुकी आहे आह्मासीं चीता : काये करीशील हनुमंता : : भेटी करी मज आनी राया भरथा : बंधुदान मज देई : ॥८५॥ [१०] तुझ्या मागील कष्टाचें फळ : जीवीत्व राघावें बंधुचें केवळ : वाट क्रमणे असे सबळ : दोनी प्रहर न भरतां : ॥ ८६ ॥ तंव तो पुडुती कर जोडुनी : परीयेसीं स्वामी माझी वीनवनी : तेथें होती सीता जननी : ह्मणौनी समुद्रु उलंघीला ॥८७॥ ईकडे येतां उत्कंठा चरणाचीं : ह्मणौनी गती कळली त्या मार्गाची : आतां तैंची सक्ती कैंची : तुजवेगळें जावया : ॥ ८८ ॥ तरीं मज सक्ती घालीवी : ह्मनौनी चरनी माथा ठेवीं : पुन द्यावी बरवी : जेने माझा वीस्वासु मानैल : ॥ ८९ ॥ रामे मुद्रीका करीची दीधली : हनुमंताचे करीं घातली : मग आज्ञा चरनाची घेतली : उपरी गगनपंथें उडाला : ॥ ९० ॥ मग पुस्पेक वीमान आनवीले : जानकी राम लक्षीमनु आरुढले : नळ नीळ जांबुवंतु बैसले : सुग्रीवादीक समस्त : ॥ ९१ ॥ बीभीसेनु सहपरीवारी : आरुढला तया वीमानावरी : पहावया अजुध्या नगरी : समस्त वीरु चालीले : ॥ ९२ ॥ स्वर्गीं देव आनंदले : जयेजयेकार प्रवर्तले : पुस्पेवरसाव करीते जाले : अती आनंदे करुनीया : ९३*॥ जें जें वर्तलें जेथें जेथें : तें तें देवो दाषवी जानकीतें : रावनु कुंभकर्णु पाडीला जेथें : ते रनभुमी दाषवीली : ॥ ९४ ॥ दाषवी ते कटक बंधु आपुला : जेथें रघुनाथ होता राहीला : तेथें पुंसा आगडु होता केला : माहावीरें हनुमंतें : ॥ ९५ ॥ पैल सुवळागीरी पर्वतु : तेथें राहीला होता रघुनाथु : पैल बांधीला असे सीळे स्वेतु : माहावीरें हनुमते : ॥ ९६ ॥ स्थापना केली लींगाची : महीमा मोठी तेथीची : लुटी केली मुक्तीची : दरुसनमात्रें प्रानीयांसी : ॥ ९७ ॥ पैल रुद्रांगीरी पर्वतु : तेथुनी उडाला हनुमंतु : सीता सुधी करुनीया मारीला अषयासुतु : वेळ न

---

१० टीप ( धु. १५०० )

लगता : ।। ९८*।। लंका जाळुनी भस्म केली : सकळ राक्षेसा पलवीले : नगर वस्त्रें जाळुनी आले : सीघ्र आह्माजवळी : ।। ९९*।। यावरी तेथुनी निघाले : ते कीस्कंदे पर्वतासी आले : सुग्रीवाचें नगरें देषीले : तये वेळी : ।। १००*।। वीमान तेथें उतरवीलें : नीसाना घाये दीधले : आनंदेसी नेले : नगरामध्यें : ।। १*।। नगरी उभवीलीया गुढीया तोरने : वाजती वाद्ये वाधावनें : नारी करीताती अक्षेवने : मग वंवाळती त्रीवर्गासी : ।। २*।। मग तया वीमानावरी : बैसवीली सुग्रीवांची अन्तौरी : प्रधानवर्ग वसवीले ते अवस्वरी : मग वीमान चालवीलें : ।। ३ *।। अैसे चालत असे वीमान : क्रमीताती वन उत्पवन : तंव माहा वीस्रांतीचें स्थान : रुसीआश्रम देषीला : ।। ४ ।। तंव भारद्वाज माहामुनी : पुढंरे आले वीमान टाकुनी : तंव ते रघुनाथ आनी सीता जननी : आनी लक्षीमनासीं भेटले : ।। ५ ।। यावरी कर जोडुनी वीनवीत : स्वामीनें आह्मांसी करावें जी सनाथ : तंव वीमान उतरवीलें तेथ : रुसीआश्रमासीं आले : ।। ६* ।। रुसी ह्मनती जी रघुनंदना : आजी पाहावी आमचीया भुवनाची रचना: केली होती नाना पदार्थी रचना : ते दावीता पै जाला : ।। ७ ।। ते वीस्तारें उपचार सांगतां : तरी वीस्तार जाईल कथा : ह्मणौनी सकळीक वेवस्ता : सांगनी पडली : ।। ८ ।। [११] तंव येरीकडे राया भरथा : गनीतेचा नेमु जाला आता : तेव्हेळी काये अवस्था श्रोता : जाली तें परसने : ।। ९*।। रायें भरथें गनीतें होती केली : चौदा वारुसें आनी च्यारी दीवस जाले : ह्मणौनी पांचवे दीवसीं काये केलें : आयेध्यो नगरासी आला : ।। १०*।। तंव प्रातकाल होता जाला : मग लवलाहे भद्रासी आला : भद्रासी साष्टांगी नमस्कारु घातला : मग दाटला गहेवरे : ।। ११*।। बंधु सत्रघ्नु धांवीनला : तेने मस्तकु उचलीला : तंव तो व्याकुळ होता जाला : चींतीत पडला धरनीवरी : ।। १२*।। मग उदकें नेत्र प्रमार्जीलें : नावेंक प्राण सावचीत जाले : मग प्रधानवर्ग जवळी पातले : ह्मने त्यांसी नेमु गनीतचा जाला हो ।। १३*।। चौदा वरुसें च्यारी दीवस : ईतुके जाले हो रघुनाथास : आता वाटतसे उदास : का पां न पावेची रघुनाथ : ।। १४*।। आतां मजसी नेमु केला : मग रामु वनासीं गेला : नेमासी असेल वीसरला : म्हणौनी न येतीच रघुनाथ : ।। १५*।। [१२] त्यासीं सरनागत आहेत बहुसाल : म्हणौनी येषादे ठांईं असेल गुंतला : कीं रुसीचा आश्रमु असेल देषला : मग मन

---

११ टीप ( तं १०१२ ) १२ टीप ( धृ १५१ )

तेथेंची वीसांवले असैल : ॥ १६*॥ कींवा आनीके येपादें राज्यो असेल देषीलें : म्हणौनी मन तेथेंची गुतले : तरीची आम्हा अव्हेरीलें : येथें न येतीची रघुनाथ : ॥ १७*॥ कीं रामअवतार पुर्न केला : कीं वैकुंठ-भुवनासीं गेला : म्हणौनी रामु नेमु असेल वीसरला : आम्हा दीनाची सोये त्यासी कैची : [13]॥ १८ ॥ की ते सुकुमार सीता जननी : अपघातु केला असेल माहावनी : तीच्या स्नेहाची प्रीती करुनी : दुषे न येची रघुनाथ : ॥ १९*॥ कीं पुर्ण कर्म फळासी आले : ऐसे तरी मज गमले : ऐसयासी माझें काये चाले : जे न येतीच रघुनाथ : ॥ २०*॥ कीं आमची अभक्ती देषीली : म्हणौनि रामे सांडी केलीं : मजपासाव अवज्ञा घडली : यास्तव न येतीची रघुनाथ ॥२१*॥ कीं राहीला षीरसागरीं: म्हणौनी टाकीली अयोध्या नगरी : की गोवीला योगेस्वरी : त्याचे ध्यानी वीगुंतला : ॥ २२ ॥ की रामे योगनीद्रा केली : तरींच अयोध्या सांडीली : कीं अद्रुष्टें आमची फीरली: ह्मनोनी न येतींच रघुनाथ : ॥ २३ ॥ मजसीं नेमु केला ऐसा : मी येईन चौदा वरुशां : आतां नयेची ऐसा जाला भरवसा : तरी मी काष्टें भक्षीन : ॥ २४ ॥ तरी हा द्वारीं दीनु आजीचा : नेमु आहे दों प्रहराचा : रामु वीसावां अमुचा : त्यासी टाकौन जाईन : ॥ २५*॥ ह्मणौनी पादुका धरुनी सीगी : लोक राहावीले अयोध्ये नगरीं : भर्थ नीघाला तेने अवस्वरी : नंदीग्रामासी पै आला : ॥ २६ ॥ नीघतां अयोध्येसी वंदीतु : लवलाहे नीघाला पै भर्थु : बंधु सत्रघ्नु असे धावतु : चरना चाली पै आली : ॥ २७॥ प्रधान वर्ग सकळीक : नगर नगरीक लोक : येकापुढें धांवती येक : नंदीग्रामासीं पै : ॥ २८*॥ तव केकेयी माता धावत आली : ह्रदईं असे दाटीली : येउनी भुमीवरी पडली : मग सावरीलीं सकळीकां ॥ २९*॥ राजा भरथु स्णान करीतु : ह्रदईं राम असे ध्यातु : दोन्ही नेत्र अर्धोन्मीलीतु: आश्रुपात ढळताती : ॥ ३० ॥ दुतीं काष्ट भार रचीले : येरें स्णानवीधी सारीली : अग्नी लावा रे लावा ह्मणौनी अज्ञा दीधली : चन्दन काष्टें वैल काष्टोंसी : ॥ ३१ ॥ माहा अग्नु प्रजळीला : ज्वाळा आकासी लागला : गजबज जाली सकळा : येरु आसनीं बैसला : ॥ ३२ ॥ ईद्रीयेग्रामु पै नेमीला : प्रानायामु कुंभकु केला : मग स्मरीता जाला : रघुनाथासी : ॥३३॥ [14] ह्मने मज तुम्हीं कासया जी सांडीलें : कां जी स्वामीं अव्हेरीलें : येथें मज कां ठेवीलें : ऐसें कां केलें रघुनाथा : ॥ ३४ ॥ कां हे सरीर उपजवीलें : कां हे

१३ व १४ टीप (पु. १५९)

आयास वेर्थ गेले : मज कां सांडीले : बापा श्रीरंगा : ।। ३५*।। चौदा वरुसें वाट पाहाता : दीवस गेले या लेषीता : अैसें कासया केलें रघुनाथा : म्या अपराधु काई केला : ।। ३६ ।।[१५] काये मजपासाव भक्तीभाव चुकला : कां जी ईतुकें दीवस तुं अन्तरला : मज दीनाते टाकुनी कोठे राहीला : श्रीरघुनाथु : ।। ३७*।। की ते माता जानकी नीष्ठुर जाली : कीं लक्ष्मीमनेही कृपा सांडीली : म्हनौनी नीष्ठुरतेने अयोध्या टाकीली : न येतां रघुनाथ : ।। ३८ ।। म्यां तरी रघुनाथाचीं आज्ञा केलीं : चौदा वरुसें हो क्रमेली : आता न ठेवावा बोली : माहावनी टाकीलें : ।। ३९ ।। कां हो हे मज माता जाळीं :[१६] कासया मज प्रसवीली । कां रामासी बोलीली । अंतर पाडीले मजसी । ।। ४०*।। परी माझे धने जीने आजी : जें हा प्रानु वेचीन रामकाजी । म्हणौनी नेत्र उघडुनीं सहजीं । दाहा दीसा अवलोकीतु : ।। ४१ ।। तव सत्रुघ्न बंधु आला । तेनें चरनावरी माथा ठेवीला । आजीचा दीवसु माझीया बोला : चीत दीधलें पाहीजे स्वामीयां : ।। ४२ ।। मग जे होईल तुम्हांसीं गती : तेची होईल आम्हांसी संगती : जरी न येईल सीतापती : तरी हे देंहे काईसया राषांवें : ।। ४३ ।। मग ह्मणे राजा भरथु : राम नव्हे मनुस्यो प्राकृतु : तो अंतर्यामींचें असे जानतु : वरकडासारीषा नव्हे तो : ।। ४४*।।[१७] यें तरी जवळीच आहे : नये तरीच कहीच नये : रामु नीर्वीकारु होये : गुनातीत परब्रह्म : ।। ४५*।। राम गुणातीत नीर्वीकारु : राम पुर्नब्रह्म नीर्धारु : येरु ह्मने यैशा आहे वीकारु : तरीं देहे काईसया जावे : ।। ४६*।। भरथ ह्मने पुर्न चैतन्ये गोठलें : आनी रामरुप प्रगटले : तेंची रुप द्रुष्टी असे देषीले : ह्मणौनी मन येथे स्थीर नव्हे : ।। ४७ ।। वैराग्या भक्ती ज्ञान : त्याच्या रुपाचें ध्यान : परब्रह्म नीर्गुन : परी द्रुष्टी न दीसे काही : ।। ४८ ।। रामु चैतने घनसांवळा : माहा मुक्तींचा सोहोळा तो रामु प्रतेक्ष देषीला जेव्हां : जीवनकळा मुराली : ।। ४९ ।। योगी ध्याताती ध्यानीं : येक आईकती श्रवनीं : येक रामराम ह्मनती वदनी : ह्मनतां ह्मनता मुक्तीपंथे ते पावले ।। ५० ।। तो राम जवळुनी अंतरला : आनी आझुनी प्रान कां वाचला : येरे मस्तकु चरणावरी ठेवीला : स्वामीं मजही न्यावें सांगाते : ।। ५१ ।। येरु ह्मने धन्ये धन्ये गा जीने[१८] : जें रामालागीं प्रानु देनें : देहे हे रामेवीन राषने : अमंगळ काईसया हें :

१५–टीपा ( धु. १५९ ) १६–पाठ. १७ टीप ( तं–१०१२ व धृ. १५०० ) १८ जीणे.

॥ ५२ ॥ परी मज रामाची आज्ञा आहे ऐसी : तुवां रहावे अयोध्येसी : वंदन करुनीया पादुकासी : राजेभारु चालवावा : ॥ ५३ ॥ तरी हा सकळ वीचारु : म्यां केला नाही अविचारु : होउनी नंदग्रामी स्थीरु : त्याचे चींतन करीत असे ॥ ५४*॥ ऐसा नेमासीं होता : आनी मजवरी कोपला भ्रांता : आतां काष्ठे भक्षुनीयां सत्य : त्या रामासी पावनें ॥ ५५*॥ तव माता आली धावती : भरथा मजही धरीं रे हातीं ॥ तुह्मी जे वीचारीली गती : तेही मज करावी : ॥ ५६ ॥ मी अपराधीनी ऐसी : जें अंतर पडलें श्रीरामासीं : ह्मणौनी आपुलीया देहासी : प्रायेस्चीत देईन : ॥ ५७ ॥ तरी भरथा तुझीये संगती : भेटती मजलागी रघुपती : पुत्रुपनाची गती : इतुके उतराई हो आवें : ॥ ५८ ॥ येरु म्हने उपकारु जाला : तुझीये उदरासी मी आला : म्हनौनी राम डोळा देषीला : मग अनुसरलों तयास ॥ ५९ ॥ सार्थक जालें संसारीचें : जें दरुसन जालें श्रीरामाचें : सार्थक जाले या प्रानाचें : आतां हे देहे रामकाजी वेचीन : ॥ ६० ॥ मग बोलती प्रधान : थोर थोर अयोध्येचे माहाजन : तुम्हांवांचुनी आमुचे प्रान : काये करावे वांचौनीं : ॥ ६१ ॥ येरु म्हने बहुत बरवें : रामालागी प्रानु द्यावें : रामेवीन कैसे असावे : हें तयाप्रती बोलीला : ॥ ६२ ॥ ईतुके बोलुनीया भरथु : उगाची राहीला नीवांतु : मौन्यें धरुनी जाला नीचींतु : मग कवन्हांसी न बोले : ॥ ६३ ॥ ईद्रीयेग्रामु नेमीला : प्राणायामु कुंभकु केला : हृदई श्रीरामु स्मरीला : बीजाक्षेर मंत्रें पैं ॥ ६४*॥ अष्टदळ कमळीके-भीतरी : राम लक्षीमन सीता सुंदरी : कनक दंड चंवरे करी : आपन तेथें वारीत असे : ॥ ६५*॥ ऐसा राम राजीव लोचनु : नीळोत्पळदळस्याम-घनु : परम पुरुष जगजीवनु : हृदई देषु नीवाला : ॥ ६६*॥ राम ध्यानाचे सोहोळे : तेथील सुष कवना बोलपैल बोले : त्या आनंदाचे सुप सोहोळे : अनुभवीये जानती ॥ ६७*॥ ऐसा समाधी नीवाला : कीं रामें भरथु आळंगीला : ऐसा राम हृदयांसी आला : भेटावया भरथासी : ॥ ६८*॥ कीं रामें वीश्रांती दीधली : कीं अवस्ता रामरुप जाली : कीं मनव्रुती फुलली : रामरुप होउनीया ॥ ६९*॥ ऐसा पावला वीस्रांती : वीचळ राहीला रामव्रुत्ती : तव दो प्रहरांची नीगुती : महुर्त येक उरले असे : ॥ ७० ॥ यैसा येवा [१९] हनुमंताचा : बोलता न बोलवे वाचा : वीस्तारु सांगता कथेचा : पारु न लभे सर्वथा : ॥ ७१ ॥ रामापासुनीं उडान केलें :

१९ यावा–पाठ.

तेनें गुहक नगर टाकीले : तया हनुमंतासी देषीले : आकासमार्गे उतरतां ।। ७२ ।। त्यासी रामाची आज्ञा होती : जें गुहकासी सांगावी सर्वस्थीती : ह्मणौनी उतरला तो कपीपती : अवघा व्रतांतु सांगावया : ।। ७३ ।। हनुमंते सांगितली रामउतरे : तेने श्रवनद्वारें आईकीली आदरे : उचंबळावा प्रेमे थोरे : मग कंठी नीगाला [२०] रुद्राचीये : ।। ७४ ।। सकळ सांगुनीया व्रतांतु : आता येईल जी रघुनाथु : इतुके बोलुनीया हनुमंतु : भरथभेटीसी चालीला ।। ७५ ।। तेने वेगें अयोध्या टाकीली : तव ते उद्वास देषीली : परीसोनी ग्रामवार्ता बोली : मग नंदग्रामासी पै आला : ।। ७६ ।। तवं परीवारु देषे पसरला : जनु उद्वेगे असे पातला : तेथें भरथु असे बैसला : दुरुनी हनुमंतें देषीला : ।। ७७ ।। तंव तो असे ध्यानस्तु बैसला : पुढें अग्नु प्रजळीला : तो तापसु कैसा मीरवीला : जानु दुसरा प्रमकु रामुची : ।। ७८ ।। वल्कलातें पांघरुन : सर्वांगीं वीभुतीचे उदळन : लल्हांटी त्रीपुंड रेषीला जान : मस्तकीं जटाजुट साजीरे : ।। ७९ ।। तव हनुमंतु भयभीतु जाला : ह्मने मंजपुढे रघुनाथुची आला : ह्मणौनी मुरकुंडी करुनी बैसला : वरी तटस्थ होउनी पाहातु असे : ।। ८० ।। आता नयेन उघडीती : मजकडे राम पाहाती : जरी होती सीतापती : तरी ह्मणती येरे येरे हनुमंता : ।। ८१ ।। अैसें वीचारुनी बैसला : तव भरथ रावो सावध जाला : रामरुपे असे सुषावला : होतो आनंदभरीथ पैं ।। ८२ ।। दोन्ही नेत्र उघडीले : द्रुष्टीनें दाही दीसांकडे अवलोकीले : मग अवस्थेन हनुमंतासी कळले : मग भरथ माहामत्तु होईल : ।। ८३ ।। प्रेमहरुषें रामाचेनी दाटला : उडौनी गगनासीं गेला : अद्भुत वानर देषीला : तव अवघे पाहाताती तयाकडे : ।। ८४ ।। तव तो आवेसे असे गर्जतु : ह्मनती पैल आला रे रघुनाथु : अैसे आईकोनी राजा भरथु : देह भुमीवरी टाकीले : ।। ८५ ।। लोटांगनीं हनुमंतासीं गेला : आपनयातें वीसरला : भरथा रायासीं हनुमंतु भेटीला : तें सुष कवनें अनुवादावे : ।। ८६ ।।[२१] धाउनीं झोबीनला कंठीं : प्रेम न सावरेची पोटीं : कपीने धरीला बाहुवंटी : तंव तो सरीरीं वीकळ गेला : ।। ८७ ।। सत्रघ्नु लोटीला पांई : तंव त्यासींही सुधी नाहीं : प्रधान लोक झोंबती पाई : हनुमंतासी कवळीती : ।। ८८ ।।* आधीच जीवीं होते आर्त : त्यावरी आईकीलें जे आले रघुनाथ : तेने सुषी राजा भरथ : अष्टांगी नीवाला : ।। ८९ ।।* भरथसुषाचा संवादु : हा

---

२० मिठी घातली–पाठ. २१ टीप (तं. १०१२) २२ उपासका वाटे मनी–पाठ.

तवं कवना न कळे अनुवादु : राम अनंतगुण आगाधु : तयावरी लोटला : ॥ ९० ॥* संभु ह्मने सैलबाळे : तुज होताती श्रवनसुषाचे डोहोळे : परी माझी वाचा बोलतां पांगुळे : बंधुद्वयाचे भेटीचें सुष : ॥ ९१ ॥*२२ उपसंका वाटे मनी : आर्त उपजे बैसावया ध्यानीं : कथा आईकतों श्रवनी : परी प्रीती कोन्हाचेनी बोलवेना : ॥ ९२ ॥ वछ मंदीरी असतां : आनी वनासीं चरावया जाये माता : सब्द कानी मातेचा पडतां : जैसें आर्त वछाचे : ॥ ९३ * ॥ कां कुरंगनीचें पाडस : क्षुधेनें पीडलें असे बहुवस : सब्द आईकता उलास मनास : न सावरत धांवत ये : ॥ ९४ * ॥ तरी हे उपमा असे सुन्य : ह्मणौनी धरीले मौन्य : दोन्ही नेत्र लाउन : आनन्दे पूर्ण होउनी बैसला : ॥ ९५ * ॥ प्रेमें ढळताती अश्रुपात : आंगी रोमांचळ दाटत : महेस पंचवगत्रेसीं डोलत : तंव सैळबाळा काये बोलीली : ॥ ९६ * ॥ ह्मने जया जयेजी जगंनाथा : तंव दोन्हीं चरन वंदीले माथां : तुह्मी असा राम ध्याता : मज आर्त श्रवण कथेचें : ॥ ९७* ॥ आह्मांस त्रृप्ती नाहीं त्रीपुरारी : हे कथा राम (कथा) म्रुतलहरी : सांगावी जी मदन मुरारी : श्रवनद्वारें सुष पावैन : ॥ ९८ * ॥ ऐसा कवनु असेल ये संवसारी : जो ये रामकथेम्रुतेसी अव्हेरु करी : रामु गुणसमुद्रीची अम्रुतलहरी : बहुत पुन्ये प्राप्त होये : ॥ ९९ * ॥ ह्मनौनी सांगा जी मजपासीं : भरथ भेटी जाली कैसी : राम आले अयोध्येसी : हाही व्रतांतु मजपासीं सांगा जी : ॥ २०० * ॥ मग ह्मने संभु देवो : तु माझया श्रुतयाचा रावो : रामनाम हा आनंदाचा डोहो : तेथें तुंची राहो जानसी : ॥ १ * ॥ ऐसे भरथें नेत्र उघडीले : हनुमंतासी अवलोकीले : पुडती मागुतें आळींगन दीधले : उचंबळला ह्रदई : ॥ २ ॥ बोवडी वळीली वाचेची : हनुवंटी धरीली हनुमंताची : गोष्टी पुसीली श्रीरामाची : बहुत प्रीती करुनीया : ॥ ३ ॥ भर्थ सत्रुन्घु पुढे जाले : समस्त लोक मागे उभे राहीले : मग राये भरथे पुसीले : समुळ वीस्तार वेवस्ता : ॥ ४ ॥ ह्मने कोठुनी आलासी गा कपीराया : कीं तुवा दाषवीली माया : कींवा आलासी वीघ्न करावया : मजो[23] दोसीया लागुनीयां : ॥ ५ ॥ मग बोलीला हनुमंतु : मीं जी रघुनाथाचा दुतु : वेगी आलो जी धावतु : तुह्मासीं सुधीं सांगावया : ॥ ६ ॥ ह्मनुनी पुन दाषवीली : मुद्रीका करीची दीधली : येरे मस्तकीं वंदीलीं : ते दापवी समस्तासी ॥ ७ ॥ जेये-जेयेकार श्रष्टी (शब्द) : समस्ता जाला आनन्द : भरथ मनी बहुत अल्हाद :

२३ मज दोष लाउनियां—पाठ.

आनन्दे वोसंडतुसे : ॥ ८ ॥ माहावादे लागलीं : नादे भुमंडळ दनानीली : रामे मुद्रीका पाठवीली : आनंदले सकळीक : ॥ ९ ॥ सत्रघ्नु सांगे प्रधाना : वेगी धांडावे सेवक-जना : अयोध्येच्या राजभुवना : स्रुंगारु सांगावे राजेग्रुहे आनी नगरासी : ॥२१०॥ धाडीले सेवक अगनीत माहावीर : स्रुंगारीली राजेग्रुहें आन नगर : आनी हनुमंतासीं पुसे भरथुवीर : तुजसीं भेटी कैसी कोठें जाली : ॥ ११ ॥ मग ह्मने कपीरावो : काही न धरावा संदेहो : सांगीन भेटीचा उछावो : चीत देउनी परीयेसावे स्वामी : ॥ १२ ॥ राम गेले वनवासा : तेथें वधीले राक्षेसा : आले दंडकारन्ये देसा : षर दुसन वधीयेले : ॥ १३ ॥ सुर्पनषा वीटंबीली : ते रावना सर्न गेळी : मगं तेने माव रंचीली : हरावया जानकीते : ॥ १४ ॥ म्रुग केला मावेचा : त्यासी सुवर्नमये त्वचा : मनु धानीवला जानकीचा : चोळी करावया लागौनी : ॥ १५ ॥ रामे धनुसबान घेतले : म्रुगापाठी लागले : तव शेब्द कानी पडलें : धाव धाव रे लक्षीमना : ॥ १६ ॥ तव तो सीता राषत होता : त्यासी बोले जगन्माता : ह्मने काये जाले हो रघुनाथा : वेगी धाव धावा हो लक्षीमना : ॥ १७ ॥ तंव तो नीघाला धावतु : संवेची आला लंकेनाथु : भस्मरा डंबरु त्रीसुळ असे सोभतु : जोगरुप धरीलें : ॥ १८ ॥ भीक्षा मागे राक्षेसु : तव ते रेघेआड न घली पदलेसु : परांगमुष जातां टळेल सत्वासु : म्हनुनी रेषा उलंघीली : ॥ १९ ॥ तव ते उचलीली करें : स्कंदीं वाहीली नीसांचरे : नीघाला लंकेचे मोहोरे : तंव जटायो धांवीनला : ॥ २२० ॥ त्यानें संग्रामु पै केला : पक्षी जटायो भंगीला : मगं लंकेसी घेउनी गेला : ते सीता सुंदरीसी : ॥ २१ ॥ तंव रामु आले आस्त्रमा : तेथे न देषतीच ते सती स्नेहप्रेमा : मगं बहुत दुष वाटले रामा : ते अवस्वरीं : ॥ २२ ॥ मग नीघाला सुधी : उलंघीलीया पर्वता महानदी : मग कीस्कंदेसीं क्रुपानीधी : सरोवरीं राहीले : ॥ २३ ॥ मज देषीले व्रुक्षावरी : ह्मने गा लक्षीमना अवधारी : वानर आनी सरीरी : पाहे कासोटी सोनीयांची ॥ २४ ॥ मज आज्ञा होती अंजनीमातेची : जो वोळपेल तुझीये कासोटींसी : तुवां सेवा करावी त्याची : असे दीधलें होतें वरुदान : ॥ २५ ॥ मगं म्या धरीले दोन्ही पाये : रामे ह्मनीतलें तुझे नांव काये : थेरु ह्मणे मी हनुमंतु होये : दास्वीत[२४] करीं सुग्रीवाचे ॥ २६ ॥ वाळीनें घातलेंसे वाहीरी : हीरोनी घेतली असे त्याची अंतुरी :

२४ दास्यत्व-पाट.

मगं ह्मणे जाये झडकरी : त्यासी आनी वेगीं भेटावया : ॥ २७ ॥ मगं म्या जाउनी सुग्रीउं आनीला : रामाचे चरनावरी घातला : मगं तो सरनागतु जाला : काई केले तयाचे : ॥ २८ ॥ वाळी वधीला संग्रामीं : सुग्रीव बैसवीला राज्याधर्मी : ऐसे आठही सेवा करु आह्मीं : श्रीरघुनाथाचे : ॥ २९ ॥ प्रुथुकांकारें सांगतां : तरी वीस्तारा जाईल कथा : मगं आज्ञा दीधली समस्तां : सीतासुधी करावया : ॥ ३० ॥ आलो समुद्राचीये तीरा : साकडे पडले माहावीरा : संयाती नावे पक्षीयीरा : तयासी मार्गु पुसीला : ॥ ३१ ॥ मग गेलों लंकेसी : भेटलों माते जानकीसी : फीरुनी आलों स्वामीपासीं : तेथें माहातीर्थ पै केले : ॥ ३२ ॥ [२५] येक येक चरीत्र पै सांगतां : तरी प्रुथ्वी न पुरे जी लीहीता : अनंत गुन त्या रघुनाथा : मज वर्नीता न वर्नवेची : ॥ ३३ ॥ आईकोनी प्रतापु रामाचा : सरन बंधु आला त्या रावनाचा : ह्मनुनी तो राजेधरु केला लंकेचा : माथा अभयेकरु ठेउनीया : ॥ ३४ ॥ अंगदु धाडीला लंकेसी : तो रावनु न मनीची सीष्टाईसी : तो वधीला सहपरीवारेसी : राजे दीधले बीभीसेना : ॥ ३५ ॥ जानकीसहीत रामुराना : आरुढ होउनी वीमाना : वेगीं येताती अयोध्ये भुवना : मज पुढें तुह्मांप्रती पाठवीलें : ॥ ३६ ॥ गुह्कासीं कुसळ क्षेम सांगितले : मग तुमचे चरण देषीले : ऐसें ह्मणौनी मस्तकु ठेवीले : चरनावरी राया भरथाचीये : ॥ ३७ ॥ तो ह्मने धन्ये धन्ये गा कपीराजा : तुं तंव प्रानुसषा माझा : वेगीं बोलावा वीरराजा : जाउं रघुनाथासीं सामोरे : ॥ ३८ ॥ करीं धरुनीया ह्नुमंतासीं : वहुत उलासु मानसीं : गोष्टी पुसीतो पुना पुना कपीसी : जीवीचें आर्त न पुरे : ॥ ३९ ॥ [२६] जे जे साधक माहामुनी : राहीले रामनाम सेउनी : करुनी स्वर्गसुषाची पाठवनी : वैकुंठभुवनासी पै गेले ॥ २४० ॥ [२६] साधका करीतां साधन : कीं सीधाचे परमजीवन : की उपासकांचें समाधान : परम जीवन भक्ताचे : ॥ ४१ ॥ वीसेंसें रायो भरथा : आर्ती न पुरे पुसता : ह्मने माझें स्मरन रघुनाथा : होतें कीं न होते : ॥ ४२ ॥ मगं ह्मनत असे ह्नुमंतु : रात्री दीवस हेची मातु : सुमीत्र आनी रघुनाथु : नीत्ये ध्यान करीताती : ॥ ४४ ॥ [२७] ऐकु भक्त चुडामनी : राम योध्यो करीतां रनी : अउर्घी पाठीसीं घालुनी : कपी वाहीनी (रक्षीतु) : ॥ ४५ ॥

---

२५ टीप (धु. १५००). २६ टीप (तं. १०१२ व धु. १५९) २७–२४३ ओवी नाही पण इतर प्रतीवरून ओवी गळलेली दिसत नाही.

योध्ये करीता रघुवीरा : पाठीसीं घातले वानरां : माता जेवी राषे लेकुरा :
तैसा रघुनाथ रापत असे : ॥ ४६ ॥ क्रुपासींधु रघुनंदनु : भक्तवछळ
करुनाघनु : धनुसबान करी घेउनु : अवघी वानरें राषतु असे : ॥ ४७ ॥
तुह्मी त्याचेसषे बन्धु : केवी वोसरैल तो क्रुपासींधु : अषंड वाचा छंदु : कधीं
भरथु भेटैल : ॥ ४८ ॥ राज्ये दीधले भीबीसेना : तै तेने प्रार्थीला रामुराना :
स्वामी चालावें राज्येभुवना : ह्मणौनी कर जोडोनी वीनवीलें : ॥ ४९ ॥
अभ्यांग भोजन करावे : जानकीसहीत मन्दीरासी यावे : माझें सुष द्रुष्टीसीं
पाहावें : ह्मनुनी चरनासी लागला : ॥ २५० ॥ रामु ह्मने लंकेनाथा : मज
नेमु आहे सर्वथा : भेटी जालयावीन राया भरथा : अभ्यांग भोजन आह्मां
तीघां नाही : ॥ ५१ ॥ तेधवां जे अवस्ता जाली रामा : ते तव बोलवेना
आह्मां : आला हनुमंतासीं प्रेमा : सद्गदीतु कंठ पैं जाला : ॥ ५२ ॥ जी
भरथा धन्योधन्ये जीने : येव्हडे व्रत जयाकारने : ऐसें भक्तीचेनी रुनें :
राम रुनीयां करावा : ॥ ५३ ॥ अनुसरलेयां ईतुकेंची पुरे : मगं नावडे
दुसरे : स्वरुप वीसरौनी येकसरे : नीत्याध्यान भक्तांचें : ॥ ५४ * ॥ जैसें
वछ वांधींजे घरीं : धेनु चरे वनांतरी : अषंड चीता करी : क्षेनभरी न
वीसंबे : ॥ ५५ * ॥ तैसेची वनी असतां रामा : अषंड स्वामीं तुमचा प्रेमा :
वीचारता पुरुसोतमा : रुपा येनेंची न घडे : ॥ ५६ * ॥ राम रुपगुणातीत:
चैतन्ये येकपुर्न भरीत : अनन्तभक्तापरमीत : सचीतानन्दघन पैं :
॥ ५७ * ॥ भक्ती प्रेमाचेनी आवेसे : चैतन्ये मुसावलें मुसे : तें पुन्येरुप
वीसरौनी कैसे : नीत्ये आर्त भक्तांचें : ॥ ५८ * ॥ ऐकोनी हनुमंताचें
वचन : भरथासीं आनंद परीपुर्न : धरुनी कपीचे चरन : भुमीवरी लोटला :
॥ ५९ ॥ मगं बाहुदंडीं धरुनी : उचलीला ततक्षनी : भरथा ह्रदईं
आळंगुनी : नीडळा नीडळ मेळवीले : ॥ २६० * ॥ नेत्रीं ढळताती
असुपात : सद्गदीत जाला कंठ : रावो ह्रदईं उचंबळत : प्रेमे करुनी :
॥ ६१ * ॥ ह्मने धन्ये धन्ये जी कपीराया : अनुसरलासी रामुराया : मी
अपराधी म्हनुनीया : भुमी अष्टांग टाकीले : ॥ ६२ ॥ ह्मने काही न घेउची
रामसेवा : अन्तर पडले जीं देवादीदेवा : तुह्मां सारीषीयां सदैवा :
नीत्ये संनीधी रामु असे : ॥ ६३ ॥ पावलीया मनुस्येजन्मा : अषंड चीती
धरींजे श्रीरामा : अषंड मनी क्रोधु कामा : तो अभक्तु जानीजे : ॥ ६४ * ॥
द्रुष्टीं देषीलीया नीधान : लक्षीं लक्षीतां जाये पळौन : जयासीं अभीद्रो[२८]

२८ अभद्र.

परीपुर्न : तो दैवांचा जानावा : ॥ ६५ ॥* मगं न घडे सरीरसंबंधु : कैचा रामभक्तांचा अनुवादु : तरी मीं भाग्यो बहुत मंदु : जो रामासीं अंतरलें : ॥ ६६ ॥* तऱ्हीं काहीं सार्थक जालें माझे : जें दरुसन जाले कपीराया तुझे : नीज भक्ता मज भेटला सहजें : मगं काये होईल : ॥ ६७ ॥ हे गुढीये सांचीं : भेटी जाली तुजसारीषया भक्तासी : जाना तेची उजरी हे दैवाची : सकुनगांठी पदरी बांधली ॥ ६८ ॥ रामु जवळी यैसें जानावे : कीं धाव घेतली असे माझेनी दैवें : ह्मने हनुंमता क्षेमाळींगने द्यावे : अष्टांगे नीवतील माझी : ॥ ६९ ॥ ह्मनुनी प्रेमाचेनी अवेसें : आळींगन दीधले कैसें : रामकथेचेनी उलासें : क्षेना क्षेना उचंबळतु असे : ॥ ७० ॥ यैसे जात असती तया मार्गी : पांये चालु देती वेगी : उत्कंटीत रायालागी : वेगें मनाहीपरीस अधीक जाती : ॥ ७१ ॥ सत्रुघ्नु पांई असे धावतु : मागें दळभारु असे येतु : पुढें भरथु आनी हनुमंतु : लवलाहें जाताती : ॥ ७२ ॥ असे येरीकडे रामुराना : जाला रुसीचा पाहुना : बहुत आर्त रघुनंदना : सोडस उपचारी पुजीयेले : ॥ ७३ ॥ रामु नसतां रामायेन : केलें वल्मीक रुसीनें कथन : तें करीता श्रवन : बहुत आर्त उपजते : ॥ ७४ ॥ ह्मने होईल राम अवतारु : या कारने रुसेस्वरु : ईकडोनी येतील रघुवीरु : ह्मनुनी मार्गी राहीले : ॥ ७५ ॥ तपे केलीं चीरकाळ : ह्मनुनी जालें तपाचें फळ : आजी जाली दरुसनाची वेळ : ह्मनौनी राउळासी देषीले : ॥ ७६ ॥ जाला घरोघरीं सोहोळा : प्रुथुकारें पुजीला रामु सावळा : लक्षीमन आनी जानकीबाळा : समस्त वानर पुजीले : ॥ ७७ ॥ तयांचे सांगता उपचार : तरी कथा वाढेल वीस्तार : वीमानी बैसुनीया रघुवीर : मग समस्त रुसेस्वर बैसवीले ॥ ७८ ॥* वीप्र करीताती स्तवने स्तुती : जयेजयेजी मंगळमुर्ती : अपरमीता उदारकीर्ती : तुझी आर्ती उपजावी : ॥ ७९ ॥ औकतां श्रवनासीं सुष : तो तुं देषीलासी प्रतेक्ष : श्रीरामा देषतां तुझें मुप : अन्या नाठवे काही : ॥ २८० ॥ तुझीया चरनाध्रुत[२९] करा : पारने होये भक्तचकोरा : कां ते चरनांबुज मधुकरां : सुख वीस्रांती पै जाली : ॥ ८१ ॥* जे अधीकारी मोक्षाचे : त्यासीं चरन आवडती रामाचे : बीडार करुनी जीवनकळेचे : त्यासी पाउटनी जाली स्वर्गींची : ॥ ८२ ॥* येथें स्रोते ठेवीती दुसन : जे रामपाद ते निर्गुन : ते हृदई धरावे सगुन : तेथें जीवनकळा उरली असे ॥ ८३ ॥*

२९ चरणामृत—पाट

ह्मनौनी त्या रुपाचा संवादु : घेती चरनाचा मकरंदु : बोधाचा आनंदकंदु : सुषसंवादु भोगीती : ॥ ८४ ॥* पुर्ण जाले परी उरले : घालेची परी नाहीं धालें : जीवनकळेसी मीळाले : परी उरले, सुषासी : ॥ ८५* ॥ ह्मनौनी याची भक्ती : हेची राहील येकांती : ह्मणौनी सांगत असें तुह्मापती : जे रघुपती अनुसरले : ॥ ८६ ॥* ऐसे चालीले वीमान : रुसी आनंदे परीपुर्न : तव बोलीला रघुनंदन : रुसी हो परीयेसा : ॥ ८७* ॥ ह्मने बाहे फुरते उजवी : आनी नेत्र पाते लववी : बहुत उलास वाटतो जीवी : कवनु लाभु होईल ॥ ८८*॥ येरु म्हने जी रघुनंदना : भक्तजन करुनाघना : भेटी होईल बंधु सजना : सत्रुघ्ना आनी भरथासी : ॥ ८९*॥ ऐसे मनवेगें वीमान चालत : तंव देषीले सामोरे येत : म्हणे होये राजा भरथ : हरुसे नीर्भरें रघुनाथु : ॥ ९०* ॥ तंव तेंहीं वीमान देषीले : दुरुनी हनुमंते भरथासी दाषवीले : तेने लोटांगन घातलें : देहे-भाव वीसरला पै : ॥ ९१*॥ दंडीचीये परी पडला : मग हनुमंतु उठवीला सावध होई गा वहीला : आता भेटतील रघुनाथ : ॥ ९२*॥ पैल पाहे कैसें सोभतु : वीमान असे गगनी झळकतु : तेथें जानकी आनी रघुनाथु : रुसी आनी पवंगम असती : ॥ ९३*॥ उत्कंठा वाटे ऐसी जान : जे पाई वेधावे गगन : ऐसी अवस्ता देषुनी रघुनंदन : वीमान षालीं उतरवीले ॥ ९४ ॥ श्रीराम चरनचाली नीगतु : भरथ लोटांगती येतु : धाउनी राम आळंगीतु : भरथ महाभक्त म्हनुनीया : ॥ ९५ ॥ सकळही वीमानाषालीं उतरले : जानकी लक्षीमनु पुढें धावीनले : भरथा रायासी अळींगन दीधले : न स्वरीत [30] आपनयातें ॥ ९६*॥ सत्रुघ्न आला लवलाहीं : लोटांगन घातले रामपाई : रामे आळंगीला दोंही बाही : अती स्नेह करुनीया ॥ ९७ ॥ प्रेम उचंबळीत असे कैसे : आळींगन दीधलें जैसे तापसें : कुरवाळीलें राजसें : परब्रह्म रायें : ॥ ९८* ॥ तवं तो सद्गदींतु जाला : रामे भरथु बोलाविला : सावद होई गा वहीला : [31] सुधीवां समस्तां भेटावया : ॥ ९९ ॥* म्हनौनी उचलतु असे हातु : कुरवाळीतु असे रघुनाथु : तंव डोळे उघडुनी भरथु : रघुनाथासी नीहाळीतु असे : ॥ ३०० ॥ करीतु असे प्रानाची कुरुवंडी : मन वोवाळुनीया सांडी : पुना पुना पायापासौनी मुष नीहाळी : जीवीची आर्त न पुरे म्हणौनीया ॥ १ ॥ चीतव्रुत्ती वोवाळीली : मनसुमनें पुजा केली :

३० मावरीती – पाठ ३१ सुग्रीवा – पाठ

प्रेमरसें दुनावली : ऐसा भक्तीरंग परीयेसा : ॥ २ ॥ जैसें चकोरासीं पारनें : देषौनी तें नीमळ चांदने : कीं वीपरीत जाले साधनें : ते सकळ रुसी परीयेसा : ॥ ३ ॥ कीं ग्रीस्मरुतुचां काळी : जेवी मेघु वोळे अवकाळी : तेथें चातकपक्षकुळी : मुख पसरुनी राहीजे : ॥ ४ * ॥ की वरुसत नसता वसंतु : तेथें कोकीळा अळापु असती करीतु : का अवकाळी मेघ असे गर्जतु : तेथें नाचती मयोरें : ॥ ५ * ॥ कीं नसतां योगाचा आभ्यासु : नेनीता सेवीजे ब्रम्हरसु : तैसा भरथा मनीं संतोसु : प्रेमरसें असे वोळला : ॥ ६ * ॥ श्रीरामभेटीची उपमा : कवना वर्नवे तेथींची महीमा : तेथीचा भक्तीरसु प्रेमा : अनुभवीये जानती : ॥ ७ * ॥ हें बोलवया काये कारनु : भरथ आनी सत्रुघ्नु : हे दोघै यैक्यरुपपुर्नु : भक्ता प्रेम दाषवीले : ॥८*॥[३२] सक्ती हे रूप देवाचे : येकची परी दों ठाई साचे : सुष पावावया भक्तीचें : दोनी रुपे धरीलीं : ॥ ९ * ॥ तऱ्ही अरुपासी रुप येने : हे स्रुतीसी बोलतां लाजीवांने : ऐसा राम भक्ताकारनें : परब्रम्ह अवतरला असे : ॥ ३१० * ॥ सुग्रीव बीभीसेनु भेटले : वानरासी आळंगन जाले : जय जये शब्द प्रगटले : देवीं दुंदुभी वाजीनलीया : ॥ ११* ॥ देव वीमानी सकळ : आरुढ दोउनी प्रबळ : सुर्यो देषुनी अंतराळ : जैवी मेघ आकासीं दाटले : ॥ १२ * ॥ करीती पुस्पाचा वरुसावो : वीजई जाला रघुरावो : जये जये शब्दें ब्रम्हकटाहो : माहाध्वनी उमटीलीया : ॥ १३ * ॥ प्रधान दळाधीपती आनी लोक : नगर नागरी सकळीक : रामभेटीचें कौतुक : जालें अपार तयांसी : ॥ १४ ॥ अवघयासी दीधली आळींगने : माहा सुष तयासीं जाले पारणे : क्रुपावंते जगजीवने : लाहान थोर न ह्मनेची : ॥ १५ ॥ तवं गुहके आईकोनी कानी : भेटीसीं आला ततक्षेनी : मीठी घालुनी रामचरनी : मग नयेनी वोसंडीला : ॥ १६ ॥ आनी गुहकावरी रामकर : हे तरी नवल वाटे थोर : ब्रम्हादीकांसी आगोचर : तो भत्कांचा मस्तकी : ॥ १७ ॥ न पाहे जाती कुळ : वीद्यावंत आचरन सीळ : भोक्ता भक्तांचा केवळ : नवल कां न म्हनावें : ॥ १८ ॥ मग आरुढला वीमानीं : वामांगी माता जाणकी जननी : दक्षीनभागी वैसउनी : कुरुवाळीतो भरथासी ॥१९[३३]॥ सुमीत्र उभा दक्षीन-भागीं : सत्रुन्घु असे वामभागीं : करीं चामर घे वेगीं : रघुरायासी जानवीती ॥२०॥ सुग्रीव आनी बीभीसेनु उभे असती जोडोनी करू : परीवारु आनी

---

३२ भक्त—पाठ. ३३ टीप (धु. १५९)

हनुमंतु वीरु : आपुन दृष्टीसमोरु : तयांसीं प्रसाद लाधला : ।। २१ ।।[३४] गुहक आडवांगीं असे उभा : दाटली रुसेस्वराची सभा : राम कैवल्याचा गाभा : तयामाजी सोभतु असे : ।। २२ ।।* ऐसें वीमान चालीलें : ते नंदीग्रामासीं आलें: स्थळ राहातें भरथाचें देषीले : तेथें उतरवीलें वीमान : ।।२३।। तव माये आली धांवती : तीनें आळंगीले सीतापती : तो उछावो लीहीता क्षीती : ग्रंथु नावरैल : ।। २४ ।।[३५] जो जींवांचें जीवन : त्यांसी उपमा द्यावी कवन : नींबलोन उतरुन : जींवीं भेटी घेतली : ।। २५ ।।* कल्पद्रुमाचा तळवंटी : अर्धांगी जानकी गोमटी : तेथें रघुनाथ जगजेठी : आसन घालुनी बैसले : ।। २६ ।। माहावाद्यांचे गजरी : वोवाळीती नरनारी : रुसी आसीर्वादु मंत्राते अवस्वरीं : वाद्यें गगन गर्जी : ।। २७ ।।[३६] ऐसें अळंकार भुसने : भरथा लेववीलें लेनें : आपुलेनी हातें जगजीवने : चौदा[३७] जना लेववीलें : ।। २८ ।।* भरथु आनी सत्रुघ्नु : जानकी आनी लक्षुमनु : मज पाहातां राम जगजीवनु : तयांसी अळंकारु पै जाला : ।।२९।।* ईंद्रु सोमु आदी सुर वरुनु : येमु वायो आनी त्रीनयेनु : पुस्पव्रसाव करुनु : जयेजयेकार गर्जीती : ।। ३३० ।।* ऐसा उछाव जाला : आनंदे ब्रह्मकटाहो धाला : वीजई रघुनाथु जाला : प्रसादु दीधला भक्तांसी : ।। ३१ ।। तने प्रसादें मजमती : मन बुधी चीतव्रुती : तो बोधवीता रघुपती : ऐसा प्रसादु मज होआवा ।। ३२ ।। जिव्हे रामनाम ठसा : अषंड चींती रे तुं मानसा : हें द्यावेजी परम पुरुसा : आपुलेनी वैभवें करुनी : ।। ३३ ।। भलते कुंसी जन्मावें : परी रामनाम न संडावे : नीरंतरी हृदई असु द्यावें : ईतुके द्यावे रघुनाथा : ।। ३४ ।।* वीनवी नामा पाठकु : भरथासी भेटला रघुनायेकु : तो आनंदाचा येकु : सेवीती संतजन स्रोते : ।। ३३५ ।। येती श्री नामापाठकवीरचीत : वोवीप्रबंधे भरथभेटी समाप्त : ।। ६० ।। सके १५५६ भावा नाम संवत्सरे तीथी पुंस सुधी ४ तदीने समाप्त ।। ६० ।। स्वहस्त क्रुस्णाजी रजपुत : सुभमस्तु : ।। ६० ।।

## ।। काव्ये नामा पाठक ।।

हरी सुनीळ सावळा । बाळ नीळतेजाळा । देखोनी देवकी वेल्हाळा । स्वये जाली वीस्मीत ।। १ ।। देवकीने देखीली वसुंधरा । ती न पाहे

---

३४ टीप ( धु. १५९ ) ३५ टीप ( धु. १५९ ) ३६ टीप ( धु. १५९ )
३७ चौधा–पाठ

दशकरा । उभी राहीली देवकी समोरा । येरी घातले दंडवत ॥ २ ॥ तव देवकी धरीले करी । म्हणे देव अवतरला तुझीया उदरी । उछा(व) होईल त्रीभुवणाभीतरी । देवादीक करुनी ॥ ३ ॥ तव देवकी म्हणे माये । ऐसे पुने केले काये । जे परब्रम्ह उदरा ये । आमुचीया ॥ ४ ॥ मग म्हणे धरत्री । तुम्ही ब्राम्हण अग्नहोत्री । परी होते नीपुत्री । ते कथा ऐक समुळ ॥ ५ ॥ सुतपा नाम ब्राह्मनाचे ॥ प्रस्नी नाम ब्राह्मीनीचे ॥ येकचीते तयाते ॥ होती वज्रपुर नगरी ॥ ६ ॥ प्रस्नी म्हणे ब्राह्मनासी ॥ पुत्र व्हावा आपणासी ॥ तो म्हणे मागो देवासी ॥ मग अणुस्टानासी नीघाले ॥ ७ ॥ म्हणोनी ब्राम्हन गेला अनुस्टानासी ॥ दोघेही राहीले वनवासी ॥ हृदई चींतीती देवासी ॥ पुत्रालागी ॥ ८ ॥ ते नगरीचा क्रुपेक राजा ॥ तयाची रानी क्रुप सहजा ॥ तो व्याहाळीचीया काजा ॥ तया वनांतरी ॥ ९ ॥ तेथे देखीले ब्राह्मण आणी ब्राह्मीनी ॥ रावो लागे त्याचे चरनी ॥ मग पुसे दोन्ही कर जोडुनी ॥ तुह्मा ये वणी काये काज ॥ १० ॥ मग बोलीला ब्राह्मण ॥ राया आम्ही करीतो अनुस्टान ॥ जव देव होये प्रसंन ॥ तव परीयंत ॥ ११ ॥ मग बोलीला रावो ॥ जव तुम्हासी प्रसंन होये देवो ॥ तव आम्ही तुम्हासी अंन पुरवावो ॥ चालोव नगराप्रती ॥ १२ ॥ मग बोलीला ब्राह्मण ॥ राया करीतो अनुस्टान ॥ जरी उभयेता आणाल अंण ॥ तरी अंगीकारु ॥ १३ ॥ परी न धाडावे आनीख्या हाती ॥ दोघे आणावे धर्म प्रीती ॥ ऐसी बोलीली नीती ॥ धर्मशास्त्री ॥ १४ ॥ मग राणी सहीत ॥ नीत्ये भोजन आनीत ॥ ऐसे क्रमले दीवस बहुत ॥ तये ठाईका ॥ ॥ १५ ॥ तवे कोन्ही येके दीवसी ॥ क्रुपा उपजली ब्रह्मीयासी ॥ तवे व्यक्त होवोनी ब्राह्मनासी ॥ प्रसंन्न जाला ॥ १६ ॥ दोघे करुनी नमस्कारू ॥ देवासी मागीतीला वरू ॥ तुची व्हावा आम्हासी कुमरू ॥ देवराया ॥ १७ ॥ देखोनी चेतुरभुज सुर ॥ ब्राह्मण करीती जयेजयेकार ॥ देसी मागीतीला वर ॥ प्रसंन्न होई स्वामीया ॥ १८ ॥ देव म्हणे ब्राह्मणासी ॥ मी अवतरेण तुमचीया वौसी ॥ पुत्रपणे तुम्हासी ॥ सुख देईन ॥ १९ ॥ ऐसा दीधला वरू ॥ तव रावो आणी सुन्दरू ॥ भोज्येण आनीती तव परमेस्वरू ॥ देखीला द्रस्टी ॥ २० ॥ देव म्हणे तुम्हा जालो प्रसंन्न ॥ राजा म्हणे आम्ही काये केले अनुस्टाण ॥ देव म्हणे तुम्ही पुरवीले अन्न ॥ तीतुकेची पुन्ने दोहीचे ॥ २१ ॥ राजा आणी राणी ॥ पुडती लागती देवाचे चरनी ॥ जो वरू मागीतीला ब्राह्मणी ॥ तोची आम्हा देईजे ॥ २२ ॥ तव जगन्नीवास बोलती ॥ तुह्मा ज्यन्म असे पुडती ॥ तुमचे घरी वाडेन

भुपती ।। ब्राह्मणाघरी जेन्म होईल ।। २३ ।। अैसा दीधला होता वरू ।। आनी धरत्री करि नमस्कारू ।। परब्राह्मासी ।। २४ ।। देवकीस म्हणे आईके ।। आताची तुम्हापुडा वर वृंदावणी खेळे कवतुके ।। अैसी बोलीली भुमिके ।। देवकीसी ।। २५ ।। अैसी धरत्री बोलीली ।। तुमची अवदशा येथुनी गेली ।। ब्राम्हण होता तो क्षेत्रीं जाला ।। वसुदेव की ।। २६ ।। राजा जाला नंद गौळी ।। अैसी बोलली भुतळी ।। आता अवतरेल वनमाळी ।। तुझीये उदरी ।। २७ ।। अैसे देखोनीया कृस्णासी ।। माये आछ्यादी जाये त्यासी ।। तव तो प्रकाश तयेसी ।। कैसा आवरेणा ।। २८ ।। ।। छ ।।

परिशिष्ट १ :

# संतमालिका

मस्तकी चीदांबराचा हस्त । पडता मन जाहाले मस्त । स्वरुपी राहीलो स्वस्त । आखंडीत ॥ १ ॥ नींवृती ललाटी स्थापिला । सोपान मुक्ताई वेल्हाळा । ज्ञानदेव तीसरा डोळा । प्रकाशेक ॥ २ ॥ मछेंद्र गोरक्ष हे कर्ण । ईडा मृत्युंजय आपण । पींगळा येका जनार्दन । सुषुम्नेसी ॥ ३ ॥ चांगा मुक्ता दोन्ही कर । कुक्षी मी आणी खेचेर । नामा पाठक (अ)क्षर । पास्त [२] नामा कवी रळती फाहे होटी । जीव्हाचा सानंद घाटी । वटेस्वग कर्मा भेटी । दंतावळी ॥ ४ ॥ भानुदास हनुवटी । सोळा सीध पाहा कंठी । नवनाथ माहारूढी । हृदयामाजी ॥ ५ ॥ उदरी वडवाळ नागेश । तुका तुकीला नाभीस । नरहरी सोनार कटीस । कडदोरा ॥ ६ ॥ गुंहेश्वर गुव्हेस्थानी । रेणुकानंदन आपानी । मुरकीनाथ पीतवसनी । प्रभासला ॥ ७ ॥ मुदगळ मुकुंद उरु साजे । जामु गोसावी गण वीराजे । चोखामेळा पादांबुजे । वंदियेले ॥ ८ ॥ आणीक आसती थोरथोर । आदी अंती न कळे पार । नाना मती अगोचर । वर्णवेना ॥ ९ ॥

* * *

---

१ तंजावर वही २०७९।४१. हें काव्य नामा पाठकांचें दिसत नाहीं. यांत नामा पाठकांचा उल्लेख आहे.

२ हा चरण अशुद्ध असून येथें एक ओवी संपून दुसरी सुरू झाली पाहिजे.

## स्फुट पदें

या पदांतील पहिलें व पांचवें पद ही धुळ्याच्या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरांत बाड क्रमांक १७७ व १५१९ यांत व दुसरें, तिसरें आणि चवथें पद ही तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयामधील वह्यांतून घेतली. दुसरें पद वही क्रमांक २१२६।३२९ व २१०९।६० या वह्यांत आढळतें. दोहोंत किरकोळ फरक आहेत. तिसरें व चवथें पद वही २०६९।५० व २०३४।७ यांत मिळाली. चवथें व पांचवे पद कांहीं फरकानें नामदेव गाथेत आहे. (तुकाराम तात्या प्रत, १८९८)

## वस्त्रहरण पदें

ही पदें औंध येथील सरकारी ग्रंथालयांत मिळाली. त्यांच्या ३ प्रती आहेत. पहिली प्रत १–६२ पदांची, दुसरी १४–६४ पदांची व तिसरी ४९–६१ पदांची आहे. तिन्ही पोथ्यांचें हस्ताक्षर एक आहे. याच हस्ताक्षरांत शके १६२० मधें लिहिलेलें विष्णुदास नाम्याचे सभापर्व आढळलें. कंसांतील पदें व शब्द प्रथम प्रतींत नाहींत. याखेरीज २१ पदातील 'यैसे समयि...पवसि' हा चरण, ४७ पदातील 'मंजुळु' शब्द व तिसाव्या पदातील 'ते वेळि द्रुपदिने केला हाकारा' हा चरण प्रथम प्रतींत नाहींत. २८ क्रमांकाची दोन्ही पदें मिळून प्रथम प्रतींत एकच पद आहे—

'पाहे हडति तवं येरु वेणिये धरी : वरती द्रुस्टी जंव पाहियेली : तव देखिले सखा बंधु नारायेणु : सींतरुनी बाळा जात्रो पाहे : परि करील काये : धरिली आहे दुखासने ॥ २८ ॥

५० व पुढील कांहीं पदें पहिल्या प्रतींत खालीलप्रमाणें आहेत :—

'आतां राया आम्हासिं खेलिजे : पनु निकटाचा बोलिजे : जरी पाचा पांडवासि राहाटे यथाभक्ति : तरि माझा डाव जैत्य हो ॥ ५० (हा आकडा चौपनसारखाहि दिसतो) ॥ हेच वचन समस्ता मानलें : मं. षा फासे आणविले : द्रुपदि दुर्योधन षेळति : द्रुपदिनें फासे घतले : हृदई चीतीले : ॥ ५१ ॥ सत्य आतुरा हृसिकेसि : सर्वा अंतर्यामीं तुं नांदसि : मिं असेन निर्मळ मानसिं : तरि मज येश देनें ॥ ५२ ॥ सखा बंधु होसि नारायेणु : तरि ये वेळे सत्वर पावने ॥ ५३ ॥ ५४ पद नाहीं व ५५, ५६ मिळून ५६ आकडा आहे. ५८ पदात 'ईपासि' नंतर

'पाहे रे' हे शब्द प्रथम प्रतीत आहेत. तिसाव्या पदात 'दुखासनु'बद्दल 'दुखासने' शब्द पाहिजे. ४६ वे पदाचा प्रथम चरण 'नवसे नव्यानउ सतपदरि' असा असावा. बरीच पदे ओवीवजा आहेत.

## सुदामचरित्र

तंजावर M S. क्रमांक ८९१ मधून सुदामचरित्र हे प्रकरण घेतलेलें आहे.

## चंद्रहास्याख्यान

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर बाडांक ५६४ मधें हें आख्यान प्राप्त झालें. कोणी-तरी मूळ आख्यान संक्षिप्त केलें असावें. मंदिरांतील ३५९ क्रमांकाच्या बाडांत चंद्रहासकथा असून तींत ४७५ (१७१+१७५+१२९) ४७५ ओव्या आहेत. लेखनकाल शके १७०० आहे. बाडांक १६२० मधील चंद्रहासआख्यान अपुरें आहे. आतांपर्यंत आढळलेल्या हस्तलिखितांत संक्षिप्त आख्यान हें एकच दिसतें.

## वस्त्रहरण

तंजावर M. S. ८६८ मधें ही कथा आहे. मुक्तेश्वरांनीं भारतामधील सभा-पर्वांत द्रौपदीवस्त्रहरण प्रसंग वर्णन करतांना नाना तऱ्हेच्या वस्त्रांचें वर्णन केलें, ('नवें नवनीत' पृ. १८४-१८५) व तसेंच वर्णन या प्रकरणांत आढळतें.

## नामरत्नमाला

प्रस्तुत प्रकरणाचा धुळ्याचा बाडांक २१७४ असून हें हस्तलिखित तंजावरहून नकलून आणलें. त्याचा तंजावर क्रमांक M. S. १८२१ आहे. याशिवाय धुळें येथें समर्थ वाग्देवता मंदिरांत, बाडांक १५२९ (ओव्या ११०), बाडांक १२०४ (ओव्या १०८), बाडांक १३६२ (११२ ओव्या) यांत नामरत्नमाला प्रकरण आहे. पैकीं बाडांक १२०४ मधील हें प्रकरण जीर्ण स्थितीला गेलेलें आढळतें. एका ९९ ओव्यांच्या नामरत्नमालेचा उल्लेख आढळतो (नामरत्नमाला भा. इ. सं. इ. श १८३६, गं. ना. मुजुमदार).

बाडांक १५२९ मधील नामरत्नमालेशी तुलना केल्यावर खालील फरक आढळले—

(१) १३ व १४ ओव्या तींत एक केल्या आहेत.
(२) ७३ ओवीच्या ७२ व ७३ अशा दोन ओव्या झाल्या.
(३) ७५ ओवीनंतर खालील ओवी येते—

आनीक येक भक्त राया । जे हिंडती निसंग होउनिया । वैरभाव नाही जया । सुख निष्ठेसी रातले ॥ ७६ ॥

( ४ ) ८७, १०२ व १०५ या ओव्या १५२९ बाडांकांत नाहीत.

( ५ ) ८८ नंतर जादा ओवी येते—

'अर्चुता अनंता परमानंदा । माधवा मदसूदना मुकुंदा । ऐसा घोस करीताति सदा । संतसंगीं बैसोणी ॥ ८९ ॥

## हनुमंत गरुडाख्यान

हें आख्यान तंजावर Ms. ६४४ मधून घेतलें. हें काव्य धुळ्याच्या समर्थ-वाग्देवतामंदिरातील बाडांत थोड्या फार फरकानें विष्णुदास नाम्याच्या नांवावर आढळतें.

## द्रौपदीचें बीरडें

प्रस्तुत प्रकरण तंजावर वही २०७७।३ मधें प्राप्त झालें. या प्रकरणाचा शेवट वस्त्रहरणासारखा आहे.

## चेंडूफळी

तंजावर वही २१४०।२८७ मधें ही कथा आढळली. चेंडूच्या निमित्तानें श्रीकृष्णानी डोहांत उडी घातली व कालियाचें दमन केलें त्याची ही कथा आहे.

## भरतभेट

'भरतभेट' हे प्रकरण धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिरात उपलब्ध झालें. 'भरतभेट' प्रकरण अनेक ठिकाणीं सांपडते. या सर्व प्रकरणांत जुन्यांत जुनें शके १५५६ मध्यें लिहिलेलें प्रस्तुत प्रकरण आहे. दुसरें एक जुनें प्रकरण तंजावर येथें आढळतें ( M. S. १०१२ ) त्याचा लेखनकाल शके १६२२ असून शेवटीं 'चोलमंडळी कावेरी तीर । असे प्रसिद्ध नामें चंदावर । ते स्थळीं हे भरत भेटीचें सार । रत्नाकरें लिहिलेसें ॥' असें लेखक लिहितो. हींत ३ प्रसंग असून ओव्या ३०८ आहेत. हे प्रसंग दुसऱ्या प्रतींत आढळत नाहीत. याखेरीज अन्य प्रती धुळें येथील श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातलें बाडांक १५०० ( ओव्या ३२० ), बाडांक १३१ ( ओव्या ३३३ ), बाडांक ३८७ ( ओव्या ३२४ ), व बाडांक १५९ ( ओव्या २६७ ) आणि तंजावर M. S. १०१४ ( ओव्या ३३४ ) या होत. विजापूरचे श्री. ना. ब. जोशी यांच्या संग्रही एक या प्रकरणाचें हस्तलिखित असल्याचें समजतें. तंजावर M. S. १०१४ च्या शेवटीं 'ईति श्रीरामायणी

कथा । भरतभेटी सांगता । उल्हास श्रोतीयाच्या चीता । ' असें म्हटलेलें आहे. राजवाडे मंदिरातली प्रत सर्वांत जुनी असल्यानें तीच छापली आहे. ज्या ओवीच्या क्रमांकावर* ही खूण आहे ती ओवी तंजावेर १०१२ धुळे बाडांक १५००, अथवा धुळे बाडांक १५९ यापैकी एका किंवा अधिक प्रतीत नसल्याचें समजावें.

धुळे बाडांक १५०० व १५९, तंजावर बाडांक १०१२ व १०१४ या प्रतींत सुरवातीला ५ जास्त ओव्या खालीलप्रमाणें आहेत. इतर प्रतींतहि त्या असाव्यातः—

" रामकथेचे आस्त बहुत । तेणें उत्कंठित माझें चित्त । रामनाम हें प्रेम अद्भूत । तेणें जीवित्व सुफल ॥ १ ॥ सुफल संसारु जाहला । वाचेसी श्रीरामु आला । जन्ममरणा आंतरळा । उद्धरिला भवसिंधु ॥ २ ॥ तुज विनंती करीन आतां । शरण आलो गा रघुनाथा । हृदईं राहावी रामकथा । वाचेसी राम असावा ॥ ३ ॥ हेची द्यावे जी जीवन । श्रोते व्हावे जी सावधान । तेणें (जीवित्व) पुण्यपावन । विनवी नामा पाठकु ॥ ४ ॥ आइका रामायणी कथा । लंका दीधली शरणांगता । अयोध्येसी पाठवीले हनुमंता । भरतभेटीकारणें ॥ ५ ॥

(M. S. १०१२)

### राजवाडेमंदिर प्रत व तंजावर M. S. १०१२ यांची तुलना

२७ व २८ ओव्या यांची एक ओवी, ६२,६२,६४ मधील मजकुराच्या दोन ओव्या, १०८–१०९ मिळून एक, १५८–१५९ यांच्या मजकुराची एक ओवी, १८५ च्या दोन ओव्या, व २३२ च्या दोन ओव्या आहेत.

खालील ओव्या नाहीत—५२–५४; ९८–१०३, १०६. ११०–११३, १३५ १५४, १५५, १९८, २६०, २८१–२९३, व ३०३.

१०८ ओवीनंतर—' इति श्रीयुद्धकांड पवित्र । त्यांत भरतभेटी अति विचित्र पाठकनामा कथी चरित्र । प्राकृतें ते परियेसा ॥ १०२ ॥ प्रसंग १ ला.

१४४, नंतरची ओवी—

आत्माराम तो व्यापकु । सर्वा देवांत तोचि येकु । राम वैकुंठ नायकु । लीला अवतार पूर्ण केला ॥

१८६ नंतरची ओवी—इतिश्रीयुद्धकांडे पवित्र । भरतहनुमंतभेटी विचित्र । ते कथी पाठकनामा जगदोद्धार । ते श्रोती परिसावे ॥ ७२ ॥ प्रसंग २ रा.

२३९ नंतर—

म्हणे कोण आहे ऐसा संवसारी । जो अमृतातें अव्हेरी । रामनामकथामृत- लहरी । परमानंदानें ॥

शेवटची ओवी—

कर जोडुनि विनवितु । पाठकनामा शरणागतु । पुढे ऐका रसाळ ग्रंथु । अयोध्याप्रवेशु सांगेन ॥

### राजवाडे मंदिर प्रत व धुळें बाडांक १५०० यांची तुलना

६३–६४ मिळून एक ओवी व ११६ ओवीऐवजीं दोन ओव्या आहेत.

३, ९९, १०१, ११४, ११५, १३५, १५४, १५५, १६६, १९६, १९८, २५७, ३३४ या ओव्या नाहींत.

८५ ओवीनंतर—

'मागील तुझिया उपकारा । सार्थक होइल गा दातारा । भरतप्राण राखे साचारा । दोन्ही प्रहर न भरता' ॥

१४४ ओवीपुढें—

'आत्मारामु व्यापकु । सर्व देही तोचि येकु । ऐसा तो रघुकुलटीलकु । लीला अवतार घेतला ॥'

२३२ नंतर—

तव वानरशेन्यासी रघुनाथु । तेथुनी झाला येतु । शीळा बांधिला स्वेतु । माहातीर्थ पै केले ॥

शेवटची ओवी—

नामा पाठक चरणागतु । अयोध्या प्रवेश सांगतु । श्रीरामभेटीचा आर्तु । सांगावया समर्थ कोण ऐसा ॥

### राजवाडे मंदिर प्रत व धुळें बाडांक १५९ यांची तुलना

६२, ६३ व ६४ मिळून मजकूर दोन ओव्यांत येतो. ९६ व ९८, १०० व १०१ मिळून एकेक ओवी आहे. १३०–३२ मिळून दोन ओव्या होतात. २३२ ओवीऐवजीं दोन ओव्या होतात.

१३८ ओवी ११५ नंतर, १३९ ओवी ११८ नंतर, ३१६–१८ ओव्या ३२१ नंतर, व ३१४।३१५ या ३२४ नंतर असा मागेंपुढें क्रम आढळतो.

३७ नंतर खालील ओवी येते :—

समस्ता जाली भोजने । वीडे दीधले त्रयोदश गुणें । मग वस्त्रें आणी आभरणे । समस्ता देता जाला ॥

३१९ पूर्वी —

वीमान उतरलिया क्षीती ॥ लक्षुमण जानकी धावती । भरथ राया आलंगीती । परमानंदे प्रीतीनें ॥

३२७ नंतर—तेणें आनंदें गर्जना । कोण उल्हास भक्तजना । भेटी जाली भरथ रघुनंदना । ते सुख कवण अनुवादे ॥

१३३ ओवी अशी आहे—येरू आसन घालुनि बैसला । हृदईं रघुनाथ चींतिला । आवच्छेचा पूर आला । मग मुर्छीगत क्षण येक ॥

२४० ऐवजी—ऐसा कोण संसारि । जो अमृतातें आव्हेरी । रामनाम अमृत-लहरी । परमानंद पीयुष्यें ॥

९३, ९९, ११६, ११७, ११९ ते १२१, १२५, १२८, १२९, १३५, १३७, १४०, १५४, १५५, १४४ ते १४६, १६४–१६९, १८८–२०१, २५४–२५८, २६०, २६१, २६४–२६६, २७८, २८३–२८६, २९०, २९६, २९८, २९९, ३०४–३१३, ३२२, ३२५, ३२८–३३० या ओव्या बाडांक १५९ मध्यें नाहीत.

बाडांक १५९ मध्यें २६९ ओव्या असल्याचें नमूद आहे. तथापि त्या बरोबर २६७ भरतात. शेवटची ओवी तंजावर बाडांक १०१२ प्रमाणें आहे.

प्रस्तुत काव्य छापताना अनेक अशुद्ध पाठ अन्य प्रतींच्या आधारे दुरुस्त केले. त्यापैकी कांही फेरबदल खालील आहेत—

| ओवी | मूळ पाठ | दुरुस्त पाठ |
|---|---|---|
| २४० | पाटउनी | पाठवनी |
| २४२ | पुसावया | पुसता |
| २८१ | सुक | सुख |
| ३०४ | मेरु | मेघ |
| ,, | आकाशमाळी | अवकाळी |
| ३११ | सष्ट | शब्द |

## काव्यें नामा पाठक

हें प्रकरण धुळे येथील श्री समर्थ वाग्देवतामंदिरांत बाडांक १५४२ मध्यें आहे. या प्रकरणांत नामा पाठकांचा कुठेंच उल्लेख नाहीं. फक्त कवनाला सुरुवात करण्यापूर्वी वरील शीर्षक आहे. एल्हनसुत विद्वांस कवीच्या बाळक्रीडेच्या दुसऱ्या अध्यायात या गोष्टीसारखी कथा वर्णन केली आहे. सुतप व सुतपी आणि कुपक व कुपिका अशी त्यांतील नांवें आहेत.

अगडु–तट, तटाचें आवार
(सं–आगर्त)
अतिपाडे–अतिशय
अतुर्बळी–बलाढ्य
अदट–अजिंक्य, पराक्रमी
अधर–खालीं
अनारिसें–भलतें, विलक्षण
अपदती–आपद्गती ?
अपंगणें–सांभाळणें, स्वीकार करणें
अरुवार–कोमल, मृदु. कोमल शय्या
अरुष–आर्ष, वेडेवांकडे
अर्चि–ज्वाला
अलंग–रांगेनें (सं–अलंघ्य)
अवता–अवधी, अवकाश
आइति–तयारी
आइणि–इच्छा
आट–त्रास (सं. आर्त)
आनुषीकडे–दुसरीकडे (सं–अन्यत्)
आतळणें–स्पर्श करणें, भेटणें
आतुडणें–प्राप्त होणें
आरोगण–भोजन
आवंतणे–बोलावणे
उछिद–उन्नत (उच्छ्रित)
उजरि–तेज, सहाय्य
उत्तर–नंतर, मागाहून
उन्मनी–जागृती, स्वप्न, सुषुप्ति व तुरीया यांपलीकडील पांचवी अवस्था, लय
उन्मेष–प्रकाश, ज्ञान
उपरमणें–आनंद पावणें
उपरवाळ्या–वरती, उंच
उपायन–देणगी, भेट
ॐ पुण्य–पुण्याहवाचनावेळीचा मंत्र
औटपीट–त्रिकूट, श्रीहर, गोल्हाट व औटपीठ ही महाकारणस्थानें आहेत.
कटाकटा–हायहाय
कणिका–सूक्ष्म कण
कबरी–वेणी
करळ–महाग, कडक
कराल–भीषण, रुंद
कल्मु–मूर्च्छा
कलंब–कदंब
कांडोळणे–खाजवणें
काचोळी–चोळी (सं–कंचुलिका)
कुडावा–रक्षण, पाठपुरावा
कुश्चल–ओंगळ, किळसवाणा
कुळकुट–कुळकथा
कूर्मि–कासवीण, तिच्या नुसत्या मायेच्या दृष्टीनेंच पिलें वाढतात.
केवा–सामर्थ्य, पाड
केळवला–केळवण झालेला
कोवसा–आश्रय
कोसला–रेशमाचा किडा
कोसाल–कपट, मसलत
खय–गर्व, ताठा
खादणें–खाणें
खिदक्षिण–खेदक्षीण
खुडसण–रुखरुख, खेद
खोप–केसाचा झुपका

खंदळी—धांगडधिंगा
गदारोळ—गोंगाट
गव—ताकद, योग्य वेळ
गोधुली—गोरज, सायंकाळ
गोलांगूल—एक वानर
गोल्हाट—प्राणवायूचें स्थान
गौल्यता—गोडी
ग्लांति—ग्लानि
चांद्रायण—एक व्रत. एकेक घास कमी केला जातो.
चीत्रीव—चितारलेलें
चुबचुबणें—थबथबणें
चोखट—शुद्ध, निर्मळ
चोलखंड—एक चोळी होईल एवढा तुकडा
छळ—ढोंग
छांदस—लहरी
जवादी—कस्तुरी ( मांजराची )
जांबूनद—सोनें
ठाव—ठिकाण
डंबर—विस्तारणारी
ढाळ—निशाण
तगट—भरजरी वस्त्र
तमाल—एक वृक्ष
तेइल—तैल, तेल
थार—थारा
थोक—ठोक, मोठ्या प्रमाणांत
थोकणें—थांबणें
दडवादडवी—लगबगीनें
दानकु—दांडका ?
दामोदर—हवेली, इमारत
दुरील—दूरचें
देव्हडा—वक्र
दोर्दंड—खांद्यापासून कोपरापर्यंत हात
धडफडा—धडधडीत, खरोखर
धणानि—दणाणून टाकले
धारवट } —किनारीदार किंवा
धारी } कांठ असलेले
धाले—तृप्त झालात
धुधात—मोठा आवाज करणारा
नव—नच ( नैव )
नग्नजयंती—कृष्णाच्या अष्टनायिकापैकी एक ( भागवत १०।५८ )
नाथणें—नाश करणें
नाभिकार—भिऊं नको असें आश्वासन
नामसरी—नामसादृश्य
नावेक—क्षणभर
निच—नित्य
निजगड—झोपाळू
निधा, निधी—प्रतिध्वनी
निनू—न्यून, लहान
निपादु—निःपात
निर्वाण—कठीण अवस्था, अंत
नीडळ—कपाळ
नीरवणें—स्वाधीन होणें
पडदणी—स्नान करताना आडवे घेण्याचें वस्त्र
पत्रवेली—विड्याच्या पानांची वेल
परवडी—समृद्धी, रांग
परिकर—सुंदर, मधुर
पर्यंक—मंचक

पश्यंती–परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाचांतील एक वाचा

पाउटणी–पायरी

पागोरा–घोंस, समूह, अंकुर

पाबळ–तीर, किनारा

पालव–पदर, आच्छादन

पुतळी–कांठातील नक्षी

पुरत्रील–पूर्वीची

पोखरिणी–तळें ( पुष्करिणी )

पौलिका–आवार, आवाराची भिंत

प्रमकु–परमक, श्रेष्ठ

प्रक्षक–पोहे ( पृथुक )

फळी–झोंब्री, युद्ध

फाटा–बडबड

फाटा फुटणें–वेड लागणें

फावणें–प्राप्त होणें

पोफळी–चौकटीचें वस्त्र

बनकर–वनकर, माळी

बरवंट–चांगलें ( वरम् )

बहुसाल–पुष्कळ, वारंवार

बाहुवट–दंडावरील दागिना

बीढार–बिऱ्हाड

बीरडें–चोळीची गांठ

बुझणें–जाणणें, समजावणें

बेंबळ–क्षीण, निःशक्त

बोभाइणें–हांक मारणें, ओरडणें

बोटधारी–बोटाच्या रुंदीइतकी किनार असलेले

ब्रीद–व्रत, प्रतिज्ञा

भरोवरी–गर्दी, सामुग्री

भस्मरा–( भरत भेट २१८ ) वस्त्रादिकांचा अस्ताव्यस्त ढीग. 'भस्म डौर' असा पाठ असल्यानें येथें लेखन प्रमाद असण्याचा संभव आहे.

भाणवस–स्वयंपाकघर

भूमिका–पृथ्वी

भोज–आनंद, उल्हास

भोवणें–वाटोळें फिरणें

भौमासुर–प्राग्जोतिषाधिपती ( भागवत ५९ )

मलियौद–मल्लयुद्ध

मा–नाही, नको

मालखडा–आखाडा, युद्धभूमी

मेचक–एक उपरत्न, काळा

मेचु–आवड

म्हणियारा–दास, चाकर

यदन–दश

याती–जाती

यावा–योग्यता, आगमन

येधवां–या वेळीं [ यावत् वा ]

रणशोंड–युद्धकलानिपुण

रळी–थट्टा, विनोद

राऊळ–श्रेष्ठ पुरुष, राजा

रातणें–अनुरक्त होणें, भुलणें

राणिवसा–अंतःपुर

लवडसवडी–लगबगीनें

लेहणें–लिहिणें

वर्जणें–प्रतिबंध करणें

वहिला–प्रथम, तावडतोब

वळकणें–चढणें, हिंडणें

वळवट–वोटवे, सेवे यासारखे पदार्थ
वळसा–धामधुम
वाजट–वाचाळ
वाधावणें–आगमनसूचक वाद्यवादन
वास–वाट, आसरा
विसंचणें–नाश करणें, बिघाड करणें
विसंवणें–विसरणें
वीरगुंठी–वीराला शोभणारी डोक्यावरची केसांची गांठ
वेगाडें–वेगानें
वेंघणें–चढणें, शंकित होणें
वेणुदंड–वेणीदंड, शेपटा
वेव्हारा–व्यापारी
वेळाइत–कैवारी
वोडण–ढाल
वोडवणें–पुढें करणें
वोरस–स्नेहाचा पान्हा
वोवरी–कोठार, पडवी, समूह
वोसंग–मांडी
वोहवर–वधूवर
वोळगणें–सेवा करणें
शहाडा–सिंह
शाळा–घर, शाळा
श्वेतबंधु–श्वेतबंध, श्वेतवन मळांत 'श्वेतबहु' असा शब्द आहे. हाच शब्द चंद्रहास कथेच्या एका हस्तलिखितांत आढळतो.
श्याम–एक राग

संकासुर–शंखासुर. विष्णूनें त्याला मारून शंख घेतला
संजोगणी–तयारी, सामुग्री
सत्रावी–जीवनकला, कुंडलिनी
संपुष्ट–पात्र, डबी
संप्रधारु–निश्चय
संव्हान–चपणें (संवाहन)
सांकडें–संकट, भार
सांगावा–निरोप
सामा–समोर, साउमा
सितरणें–भूल पाडणें, फसविणें
सीराणी–आवड
सुनंदा–चेदि देशाच्या वीरबाहु राजाची कन्या
सुरंग–चांगल्या रंगाचें रक्तचंदन
सुरयंद्रु–सुरेंद्र
सोकणें–सवकणें
सौरसु–प्रसाद
हडकि–गळ्याखालील खळगीचा भाग. हडौति हा शब्द ज्ञानेश्वरीत सहाव्या अध्यायात येतो.
हडपिणी–विडा देणारी नोकर
हाट–सोनें, मंत्रा
हाटवटि–बाजारपेठ
हारि–जवळ, पुढें
हेळण–अवहेलना
हेळामात्रें–सहज
हिंपुटि–खिन्न, कष्टी

REFBK 0014060
REFBK-0014060